सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १६ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३१७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# विधानसभेची निवडणूक नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात

**● मुख्यमंत्री शिंदे यांचे सुतोवाच**

**मुंबई, १५ सप्टेंबर**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात घेतली जाऊ शकते, असे सुतोवाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी केले.

या निवडणुकीत महायुतीतील घटक पक्षांमध्ये कोण किती जागा लढविणार, याबाबतचा अंतिम निर्णय येत्या आठ ते दहा दिवसांत जाहीर करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. २८८ सदस्यीय राज्य विधानसभेसाठी दोन टप्प्यांत निवडणूक घेतली जाऊ शकते, असे शिंदे यांनी आपल्या शासकीय 'वर्षा' निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक वार्तालाप करताना सांगितले.



शिवसेना, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश असलेले महायुतीचे सरकार सातत्याने विकास आणि कल्याणकारी योजनांवर काम करीत आहे आणि या योजनांना राज्यातील जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळत आहे. आम्ही जागा वाटपावर चर्चा सुरू केली आहे. यासाठी गुणवत्ता आणि विजयाची खात्री हा महत्त्वाचा निकर्ष असणार आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. लाडकी बहीण योजनेमुळे राज्यातील महिलांचा महायुतीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. माझे सरकार सर्वसामान्यांचे आहे. विकास आणि कल्याणकारी योजना यात आम्ही अचूक समतोल साधला आहे. कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाचा भाग म्हणून आमच्या सरकारने दीड लाख युवकांना नियुक्तिपत्रे दिली असून, त्या अंतर्गत त्यांना ६ ते १० हजार स्टायपंड दिले जात आहे. या योजनेंतर्गत राज्यातील १० लाख युवकांना समाविष्ट करण्यावर आमचा भर असणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

**● अडीच कोटी बहिणींना लाभ देणार**

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेत आतापर्यंत १.६० कोटी महिलांना लाभ मिळत आहे. ही योजना अडीच कोटी महिलांपर्यंत पोहोचविण्याचे आमचे उद्दिष्ट असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना



पुणे : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले व श्रीगणेशाची पूजा व आरती केली.

## महत्त्वाचे

### आरोग्य विम्यासाठी मंत्रिगटाची स्थापना

**नवी दिल्ली** : विविध आरोग्य आणि जीवन विमा पॉलिसींच्या प्रीमियमवर किती टक्के जीएसटी आकारला जावा, यावर सल्ला देण्यासाठी जीएसटी परिषदेने रविवारी १३ सदस्यीय मंत्रिगटाची स्थापना केली. बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी या मंत्रिगटाचे संयोजक आहेत. ९ सप्टेंबर रोजी झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत जीवन आणि वैद्यकीय विम्यावरील जीएसटी कर रचनेचा आढावा घेण्यासाठी मंत्रिगट गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार, आज हा मंत्रिगट गठित करण्यात आला, अशी माहिती या बैठकीशी संबंधित सूत्रांनी दिली. सध्या या दोन्ही विमा पॉलिसींवर १८ टक्के जीएसटी आकारण्यात येत आहे.

### आजपासून यूपीआय व्यवहार मर्यादा बदलणार

**नवी दिल्ली** : नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) यूपीआय व्यवहारांची मर्यादा वाढवून देशातील करदात्यांना मोठा दिलासा दिला आहे. आता १६ सप्टेंबरपासून यूपीआयच्या माध्यमातून एका व्यवहारात ५ लाख रुपयांपर्यंत कर भरणा करणे शक्य होणार आहे. यापूर्वी ही मर्यादा फक्त १ लाख रुपये होती. एमसीसी-९३११ या श्रेणीतील कर भरणा करणाऱ्या व्यापाऱ्यांना या नवीन मर्यादेचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. नवीन मर्यादा यूपीआय पेमेंटसाठी सक्षम करणे हे सर्व व्यापाऱ्यांचे कर्तव्य आहे. एनपीसीआयने आणखी एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. 'यूपीआय सर्कल' नावाचे नवीन फीचर आणले आहे. या सुविधेमुळे विश्वासू व्यक्तींना व्यवहाराची जबाबदारी सोपविणे शक्य होणार आहे.

### मुसळधार पावसात ताजमहालला गळती

**आग्रा** : गेल्या तीन दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे ताजमहालच्या मुख्य घुमटातून पाण्याची गळती होत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या वास्तूच्या आवारातील बागेतही पावसाचे पाणी साचले होते. या घुमटातून गळत होत असली तरी, त्यामुळे यात वास्तूचे कोण

# केजरीवाल उद्या देणार राजीनामा

**● १५ दिवसांनी शासकीय निवासही सोडणार**



**नवी दिल्ली, १५ सप्टेंबर**

मद्य घोटाळ्यात सीबीआयने केलेली अटक कायदेशीर ठरवत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सशर्त जामिनावर बाहेर आलेले मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल रविवारी भावनिक खेळी खेळून गेले. आजपासून दोन दिवसांनंतर म्हणजेच मंगळवारी मी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आहे आणि त्याच्या १५ दिवसांनंतर शासकीय निवासस्थानही सोडेल. माझी जागा पक्षातील अन्य कुणी घेईल, अशी घोषणा केजरीवाल यांनी केली.

दिल्ली विधानसभेची निवडणूक पुढील वर्षाच्या सुरुवातीला होणार आहे. मात्र, मी मुदतपूर्व निवडणुकीची मागणी करणार आहे. राजीनामा दिल्यानंतर मी आणि मनीष सिसोदिया दिल्लीकरांना आपली भूमिका समजावून सांगणार आहोत. मी बेईमान असेल तर पुन्हा निवडून देऊ नका आणि प्रामाणिक असेल तर पुन्हा मला सेवा करण्याची संधी द्या, असे आवाहन मी दिल्लीकरांना करणार आहे, असे केजरीवाल यांनी आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितले.

दिल्लीतील जनता मला जोपर्यंत प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र देत नाही, तोपर्यंत मी मुख्यमंत्रिपद स्वीकारणार नाही. एक-दोन दिवसांत मी पक्षाच्या नेते आणि कार्यकर्त्यांची बैठक घेणार आहे. या बैठकीत नव्या मुख्यमंत्र्याची निवड केली जाईल. मी नुकताच कारागृहातून आलो आहे. त्यामुळे मला अग्निपरीक्षा द्यावीच लागणार आणि मी ती देणार आहे, असे केजरीवाल म्हणाले. भाजपाचे नेते मला भ्रष्टाचारी ठरविण्याचा प्रयत्न करीत आहे. भाजपेतर मुख्यमंत्र्यांच्या विरोधात त्यांनी असंख्य खटले दाखल केले आहेत. माझे आवाहन आहे की, अटक झाल्यानंतरही त्यांनी पदाचा राजीनामा देऊ नये, उलट कारागृहातून सरकार चालवावे, असा सल्लाही केजरीवाल यांनी दिला.

**दोन दिवसांचा वेळ कशाला हवा?; भाजपचा सवाल**

राजीनामा देण्यासाठी दोन दिवसांचा आणि शासकीय निवासस्थान सोडण्यासाठी १५ दिवसांचा वेळ हवाच कशाला? अरविंद केजरीवाल यांना त्यांच्या पत्नी सुनीता यांना मुख्यमंत्री करायचे असेल आणि त्यासाठी पक्ष नेते व कार्यकर्त्यांची सहमती मिळविण्याकरिता दोन दिवस लागणारच. शिवाय, शासकीय निवासस्थानात भ्रष्टाचाराचे काही पुरावे लपवून ठेवले असू शकतात, ते बाहेर काढण्यासाठीही वेळ हवाच असतो, असा खोचक सवाल भाजपाने केला. दिल्लीतील जनतेच्या दरबारात केजरीवालांना जाण्याची काहीच आवश्यकता नाही. कारण, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ते कारागृहात असताना, दिल्लीकरांनी लोकसभेच्या सर्व सातही जागा भाजपाच्या पदरात टाकून आपला निर्णय कळविला आहे, अशा शब्दांत भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी केजरीवालांवर हल्ला चढविला.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत राजस्थानच्या अलवरच्या भेटीवर आले होते. 'एक झाड आईच्या नावाने' या मोहिमेचा भाग म्हणून सरसंघचालकांनी मातृ वन येथे वृक्षारोपण केले.

### पंतप्रधान होणे माझे ध्येय नाही : गडकरी

**नागपूर, १५ सप्टेंबर**

विरोधी पक्षातील एका मोठ्या नेत्याने मला पंतप्रधानपदाची ऑफर दिली होती, असा गौप्यस्फोट केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नागपुरात एका कार्यक्रमात बोलताना केला.

मला अजूनही चांगले लक्षात आहे. मी कुणाचेही नाव घेणार नाही. मात्र, त्या व्यक्तीने मला सांगितले होते की, तुम्ही पंतप्रधान होणार असाल तर आम्ही पाठिंबा देऊ. मी त्यांना विचारले की, तुम्ही मला पाठिंबा का देता तसेच मी तुमचा पाठिंबा का घ्यावा, पंतप्रधान होणे हे माझ्या आयुष्याचे ध्येय नाही. मी माझी मूल्ये, विचार आणि माझी संघटना यांच्याशी प्रामाणिक आहे. मी कुठल्याही पदासाठी तडजोड करीत नाही. मला माझ्या मूल्यांवर विश्वास आहे. भारतीय लोकशाहीचा आधार असलेली ही मूल्ये आहेत, असे नितीन गडकरी यांनी स्पष्ट केले. ही चर्चा नेमकी कशी आणि कधी झाली, या बाबतचे तपशील नितीन गडकरी यांनी दिले नाहीत. मात्र त्यांचे हे वक्तव्य आता चर्चेत आहे.

# धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेशासाठी सरकार सकारात्मक

**मुंबई, दि. १५ सप्टेंबर-**

धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील. कायद्याच्या चौकटीत टिकणारा आणि अन्य कुठल्याही समाजावर अन्याय करणारा नसेल असे प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीत समावेश करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल धनगर जमात समन्वय समितीच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपोषणकर्त्या आंदोलकांशी दुरध्वनीवरुन संपर्क साधून त्यांना आश्वासन दिले. बैठकीला राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ आय. एस. चहल, आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव गणेश पाटील उपस्थित होते. इतर मागास बहूजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, धनगर समाजाची अनुसूचित जमातीच्या समावेशाची मागणी खूप वर्षे प्रलंबित आहे. हा समावेश व्हावा यासाठी कायद्याच्या विहीत पद्धतीचा अवलंब करावा लागेल. त्यासाठी सचिव स्तरावर तातडीने पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न केले जातील. यात राज्याचे महाधिवक्ता, विधी व न्याय विभाग यांचा सल्ला घेतला जाईल. आदिवासी विकास विभागासह संबंधित अन्य विभागांचे सचिव तसेच समन्वय समितीच्या सदस्यांचा सक्रिय सहभाग घेऊन अन्य मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही व्हावी. यावेळी धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या समावेशाबाबत स्थापन करण्यात आलेल्या डॉ सुधाकर शिंदे समितीलाही लवकर अहवाल देण्याचे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

शिष्टमंडळात आमदार गोपीचंद पडळकर, माजी खासदार विकास महात्मे, माजी आमदार सर्वश्री प्रकाश शेंडगे, रामहरी रुपनवर, रामराव वडकुते तसेच समन्वय समितीचे पांडुरंग मेरेगळ, विजय गोफने, पंकज देवकते, मधु शिंदे यांनी मुद्दे मांडले.

# सोमनाथ वैद्य यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद

**● धर्मराज काडादी : अप्पासाहेब काडादी यांना अभिवादन**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १५ सप्टेंबर-**

सोमनाथ वैद्य यांनी स्वयंम् शिक्षा फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजूंना विविध वस्तूंचे वाटप व शैक्षणिक साहित्य वाटपाचे कार्य कौतुकास्पद असून समाजासाठी आदर्श असल्याचे प्रतिपादन सिद्धेश्वर साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी केले.

कर्मवीर अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त साखर कारखाना कार्यालयात अभिवादन करताना ते बोलत होते. यावेळी चेअरमन पुष्पराज काडादी, स्वयंम् शिक्षा फाउंडेशनचे अध्यक्ष सोमनाथ वैद्य, व्हाईस चेअरमन सिद्धाराम चाकोते, शिवशंकर बिराजदार, महादेव जम्मा, गुरुराज माळगे, विद्यासागर मुलगे, कार्यकारी संचालक समीर सलगर यांच्यासह कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी वैद्य यांच्या हस्ते काडादी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करण्यात आले.

काडादी पुढे म्हणाले की, सामाजिक बांधिलकी म्हणून सोमनाथ वैद्य यांनी समाजातील गरीब व गरजूंना छत्री, पर्स, टी-शर्ट व शालेय साहित्य वाटप करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. गुरूपोर्णिमेला २५ हजार लाडूंचे वाटप करून प्रसादाची सोय केली आहे. सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर राहून समाजाप्रति ऋण व्यक्त करीत आहेत. प्रशासकीय सेवेत कार्यरत असूनही दक्षिणमधील जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असतात. दहीहंडीसारख्या कार्यक्रमांमधून तरूणांना प्रोत्साहन देण्याचे वैद्य यांचे कार्य वाखणण्याजोगे आहे. शिवाय विविध संघटनांचे आंदोलन व कार्यक्रमांमध्ये सोलापुरी स्पेशल झुणका भाकर देऊन अन्नदानाचे महान कार्य करीत आहेत.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे शैतकऱ्यांना भरपाई मिळावी म्हणून वैध्य यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. वैद्य यांच्या कार्याला सदैव सहकार्य असून वैद्य यांच्या कार्याची प्रेरणा घेण्याचे आवाहन काडादी यांनी केले.



**अप्पासाहेब काडादी यांच्या विचारांचे अनुकरण**

कर्मवीर अप्पासाहेब काडादी यांनी समाजाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात त्रास व कष्ट सहन करून सिद्धेश्वर साखर कारखान्यासह विविध संस्था व मंदिराच्या उभारणीसाठी प्रयत्न केला. अप्पासाहेब काडादी यांनी त्याग केल्यामुळेच त्या संस्था भरभराटीला आल्या आहेत. त्यांच्या सामाजिक बांधिलकी व समाज विकासाचे विचार घेऊनच प्रशासकीय व समाजकार्य करीत आहे. जनतेंनी सहकार्य केल्यास दक्षिणमध्ये विकासाची गंगा आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. जीवनात अप्पासाहेब काडादी यांच्या विचारांचे अनुकरण करीत आहे.

**- सोमनाथ वैद्य,** अध्यक्ष, स्वयंम् शिक्षा फाउंडेशन



# मराठा समाजासह इतर समाजातील सर्व घटकांना सर्व प्रकारचे शिक्षण (शालेय, उच्च व व्यावसायिक) १०० टक्के मोफत करण्याची आमदार राजेंद्र राऊत यांची शासनाकडे आग्रही मागणी

महाराष्ट्र विधानसभा | विधानसभा महाराष्ट्र सत्यमेव जयते

**श्री. राजेंद्र विठ्ठल राऊत**
विधानसभा सदस्य,
बार्शी.

पत्ता - ३८०९, राऊत चाळ, अरणगांव रोड, बार्शी जि. सोलापूर ☎:(०२१८४) २२१८११, मो. ९८५०३३३३८८

जा.क्र. MLA/RR/१८५२/२०२४ दि. १३/०९/२०२४

**प्रति,**
**मा.ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब,**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.**

**विषय :– मुलांना व मुलींना व्यावसायिक अभ्यासक्रमासह सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणास प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ करणे व सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे मराठा मुलांसाठी व मुलींसाठी पूर्ण क्षमतेने वसतिगृह योजना सुरु करणे बाबत....**

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये विनंती की, चालू वर्षी शासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमासह सर्व उच्च शिक्षणास प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ केले आहे. त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन. तसेच वरील मराठा व इतर समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झालेली आहे. त्यांना मुलांचेही उच्च शिक्षण पूर्ण करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे समाजात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

तरी मुलींप्रमाणेच मुलांच्या शिक्षणाकरीता वरील मराठा व इतर समाजातील सर्वांचे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क १०० टक्के माफ करुन त्यांनाही उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी, तसेच सर्व विद्यार्थ्यांप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तर व जिल्हास्तरावर देखील पूर्ण क्षमतेने स्वतंत्र वसतीगृह योजना सुरु करुन संपूर्ण महाराष्ट्रात मुलांना शालेय शिक्षण व उच्च शिक्षण विनामुल्य देण्याची सोय उपलब्ध करावी, ही विनंती.

आपला,
(राजेंद्र विठ्ठल राऊत)

**प्रत :–**
१. मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. अजित (दादा) पवार साहेब, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा. चंद्रकांत (दादा) पाटील साहेब, उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, तथा, पालकमंत्री, सोलापूर,
४. मा. विजय वडेट्टीवार साहेब, विधानसभा विरोधी पक्ष नेते.
५. मा. अंबादास दानवे साहेब, विधान परिषद, विरोधी पक्ष नेते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://epaper.dainiktarunbharat.com/

# बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करणे सर्वांची जबाबदारी

## श्रीलंका येथील भंते सुमनरत्न यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे भारतात बौद्ध धम्माचे पुनर्जीवन झाले. धम्म वाढला. डॉ. आंबेडकर यांचे भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न साकारण्यासाठी धम्माचा प्रचार आणि प्रसार करणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असे आवाहन श्रीलंका येथील भंते सुमनरत्न यांनी सोलापुरात केले.

तथागत गौतम बुद्ध , भंते सारिपुत्त, भंते महामोग्लायन, त्याचे आचरणही करतो. भारतात विश्वरत्न डॉ. आंबेडकर यांच्यामुळे बौद्ध धर्माचे पुनर्जीवन झाले. डॉ. आंबेडकर यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये बौद्ध धम्माची रुजवात केली. भारत बौद्धमय करण्याचा संदेश त्यांनी दिला होता. डॉ. आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्याचे आज सर्वांचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही यात्रा काढण्यात आली आहे, असे ते म्हणाले. याप्रसंगी भंते सुमनरत्न यांनी बौद्ध धम्मातील शील, नैतिकता आणि आचरण यावर भाष्य केले. लोकांनी अंधश्रद्धा झटकून टाकली पाहिजे. धम्म शिकवणीप्रमाणे आचरण करण्याची गरज आहे. धम्म वाढीसाठी सर्वांनी तन-मन-धनाने पुढे आले पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले.



प्रास्ताविक व सूत्रसंचालन निमंत्रक अण्णासाहेब वाघमारे यांनी केले. याप्रसंगी समितीचे निमंत्रक धम्मरक्षिता कांबळे , नागसेन माने, कामगार नेते अशोक जानराव, केरू जाधव, सुभानजी बनसोडे,

डॉ. सुरेश कोरे, डॉ. ज्योत्स्ना कोरे , शारदा गजभिये, निर्मला कांबळे, मीनाक्षी बनसोडे, प्रा. संघप्रकाश दुड्डे , विनोद इंगळे, श्याम शिंगे, शेखर शिवशरण, जनार्दन मोरे, सचिन गायकवाड आदींसह विविध समित्यांचे पदाधिकारी, उपासक - उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, रविवारी सकाळीही डॉ. आंबेडकर उद्यान येथे अस्थिकलशाचे अनेकांनी दर्शन घेतले. त्यानंतर ही अस्थि कलश यात्रा तुळजापूर (धाराशिव) कडे मार्गस्थ झाली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अस्थि कलश दर्शन यात्रा सोलापुरात आली असताना डॉ. आंबेडकर उद्यान येथे आयोजित धम्म प्रवचनात ते बोलत होते. यावेळी भंते बी. सारिपुत्त आणि भिक्षुणी धम्मचारीणी , भिक्षुणी खेमा महाथेरो, भिक्षुणी संघमित्रा यांची मंगलमय उपस्थिती होती. तसेच इंडो एशियन मेत्ता फाउंडेशन इंडियाचे प्रमुख नितीन गजभिये (नागपूर), आयोजक स्मिता वाकडे, सत्यजित जानराव आदींसह पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या धम्म प्रवचनात भंते सुमनरत्न पुढे म्हणाले, आम्ही श्रीलंकेतील लोक तथागत गौतम बुद्धांचा धम्म जिवापाड मानतो.

# राज्यघटनेबाबत जागृतीसाठी संविधान मंदिर प्रेरणादायी

## उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे प्रतिपादन

## ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिरांचे लोकार्पण



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ सप्टेंबर -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असून भारतीय राज्यघटना ही सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारतीय राज्यघटनेबाबत नवीन पिढीत जागृतीसाठी संविधान मंदिर नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज येथे केले.

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे कौशल्य विकास विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'संविधान मंदिर लोकार्पण सोहळा झाला. यावेळी उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन नागपूर येथून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ई- उपस्थित), कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, विकास आयुक्त प्रदिपकुमार डांगे, कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी उपस्थित होते.

उपराष्ट्रपती धनखड म्हणाले की, भारतीय संस्कृतीचे सार आपल्या संविधानात सामावले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये खूप मोठे योगदान आहे. भारतीय राज्यघटना सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण असून राज्यघटनेचा गाभा आपण समजून घेणे गरजेचे आहे. वंचितांच्या विकासासाठी डॉ. आंबेडकर यांनी आयुष्यभर परिश्रम घेतले. सामाजिक न्याय हा आरक्षणाचा आधार असून वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकर यांचे योगदान नव्या पिढीला समजणे गरजेचे असून त्यादृष्टीने संविधान मंदिर उपक्रम अतिशय उपयुक्त ठरेल. जागतिक लोकशाही दिवस सर्वत्र साजरा होत असताना आपल्याला अभिमान आहे की भारत हा सर्वात मोठा लोकशाही असलेला देश असून जो विविधतेतही एकता जपून आहे. याचे सर्व श्रेय आपल्या संविधानाला जाते. भारतीय हीच आपली पहिली ओळख असून राज्यघटनेप्रती आपण सदैव आदर बाळगणे गरजेचे आहे. या संविधानाचे महत्व नव्या पिढीला समजावे यासाठी असे उपक्रम खूप गरजेचे आहेत, असेही त्यांनी सांगितले.

राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन म्हणाले की, आपल्या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १९०४ ते १९०७ या काळात जेथे शिक्षण झाले त्याठिकाणी आपण उभे आहोत याचा अभिमान वाटतो. एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल ही पहिली शाळा आहे ज्या शाळेने देशातील आजच्या कौशल्य विकास विभागाचा पाया घातला. राज्यात सुरु असलेली मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, रोजगार मेळाव्याचे आयोजन यासारख्या अनेक नाविन्यपूर्ण योजना कौशल्य विकास विभागाने सुरू केल्या आहेत ज्यामुळे बेरोजगारी कमी होण्यास मदत होत आहे.

महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिरे स्थापन केली जात आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या संविधानाची निर्मिती व त्या अनुषंगाने सर्व माहिती समजून घ्यावी. कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना २१ व्या शतकासाठी तयार करणे, शिक्षण पद्धतीत परिवर्तन घडवून आणण्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे.

यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांच्या डॉ. भदंत राहुल बोधी (महाथेरो), भदंत बोधिशील स्थंविर, राजकुमार त्रिमुखे, बाळू अहिरे, हनुमंत लोंढे यांचा सत्कार करण्यात

उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी राष्ट्रनिर्माणाचा हा उपक्रम हाती घेतल्याबद्दल कौशल्य विकास विभागाचे अभिनंदन केले. केंद्रीय राज्यमंत्री आठवले म्हणाले की, राज्याच्या विकासामध्ये कौशल्य विकास विभागाचे मोठे योगदान आहे. राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'संविधान मंदिर लोकार्पण होत आहे याचा अभिमान आहे. सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी मंत्री लोढा यांचेही भाषण झाले.

# पितृपक्षानंतर भाजपाच्या उमेदवाराची पहिली यादी जाहीर होणार

## मित्रपक्षांना सांभाळून घेण्याचे नड्डांच्या सूचना



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ सप्टेंबर :**

गणेश दर्शनाच्या निमित्ताने शनिवारी मुंबईच्या दौऱ्यावर आलेल्या भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री यांनी राज्यातील सध्या परिस्थिती व विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी राज्यातील प्रमुख भाजप नेत्यांची बैठक घेऊन विधानसभेच्या तयारी बाबत सूचना केल्या पितृपक्ष संपल्यानंतर पहिल्या टप्प्यातील उमेदवारांची यादी जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले समजते त्याचबरोबर महायुतीतील मित्र पक्षासमवेत मतभेद टाळून मोठ्या भावाच्या भूमिकेतून त्यांना सांभाळून घ्या, अशा सूचनाही त्यांनी केल्या असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात जे.पी.नड्डा यांनी आज लालबागचा राजा, चिंचपोकळी येथील चिंतामणी गणेशोत्सव मंडळ व बांद्रा पश्चिम येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणेश मूर्तीचे दर्शन घेतले.

तत्पूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवासस्थानी प्रमुख नेत्यांची बैठक घेऊन राजकीय परिस्थितीचा पक्षाचा विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. वेळी फडणवीस यांच्यासह प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार पंकजा मुंडे,आदी उपस्थित होते. पितृपक्षा नंतर पक्षाचे विधानसभेची उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली जाईल राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघातील सध्याची स्थिती अंतर्गत सर्वेचा अहवाल याबाबत सूक्ष्म निरीक्षणे नोंदवून अहवाल बनविण्यात यावा.

# नायर रुग्णालयात विद्यार्थिनींचा लैंगिक छळ; प्राध्यापक निलंबित

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.१५ सप्टेंबर:**

कोलकत्ता येथील डॉक्टरावरील लैंगिक अत्याचार व हत्येच्या घटनेमुळे देशभरातून संताप व्यक्त होत असताना मुंबईत महापालिकेच्या बीआयएल नायर धर्मादाय रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टरचा लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे .याप्रकरणी प्रशासनाने संबंधित सहाय्यक प्राध्यापकाला निलंबित केले आहे.हा प्रकार घडला आहे. नायर रुग्णालयात विद्यार्थिनीचा लैंगिक छळ झाल्याने एकच संताप व्यक्त होत आहे. प्रकरणात सहाय्यक प्राध्यापकाला निलंबित करण्यात आले आहे. संपूर्ण तपास पूर्ण झाल्यानंतर आणि चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आरोपी-निलंबित सहाय्यक प्राध्यापकाविरुद्ध पुढील कारवाई केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. या डॉक्टरची बदली होणार होती, त्यापूर्वीच त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. सहा महिन्यांपूर्वी मार्चमध्ये ही घटना घडली होती. त्याबाबत प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या तक्रारीनंतर महाविद्यालय प्रशासनाने आता संबंधित सहाय्यक प्राध्यापकावर कारवाई केली आहे. त्याने तिच्या खेळाविषयी विचारणा करीत लगट साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिला एकदा केबिनमध्ये बोलावून तिला अप्रेन काढण्यास सांगितले. तिचे ओठ सुंदर असल्याचे सांगत तिच्या मानेला व कानाला अयोग्यरित्या स्पर्श केला. नाकातील लिफ्म नोड्सची सूज तपासण्याच्या बहाण्याने त्याने हे कृत्य केले होते.त्यामुळे घाबरलेल्या विद्यार्थिनीने लागलीच याविषयीची तक्रार केली. प्राथमिक तथ्य आणि घडलेल्या प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेत या सहाय्यक प्राध्यापकाला तातडीने निलंबित करण्यात आले आहे. या डॉक्टरची नायर रुग्णालयातून केईएम रुग्णालयात बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण त्यापूर्वीच या प्रकरणात त्याच्यावर शनिवारी निलंबनाची कारवाई करण्यात आली.



# प्रगल्भ लोकशाहीसाठी कायद्याची अंमलबजावणी अत्यावश्यक

## ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांचे प्रतिपादन

## जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळातर्फे बौद्धिक व्याख्यानमाला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

लोकशाही प्रगल्भ होण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची कठोर अंमलबजावणी आणि जनतेचा सहभाग अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांनी केले.

जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प रविवारी श्री. तोरसेकर यांनी गुंफले. कायदा, व्यवस्था आणि लोकशाही असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. व्याख्यानमालेचे यंदाचे ४८ वे वर्ष आहे. प्रारंभी दीप प्रज्वलन आणि श्री गणेश पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक प्राचार्य गजानन धरणे, मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर म्हणाले, गेल्या अनेक दशकांपासून भारतात व्यवस्था कुजविण्यात आली आहे. परिणामी, सत्तेतील आणि प्रशासनातील कित्येक मंडळींची मानसिकता आपण जनतेचे सेवक नसून राज्यकर्ते आहोत अशी झाली आहे. नवे कायदे आणण्याची आवश्यकता नाही. असलेल्या कायद्यांची ठोस अंमलबजावणी केली तरी सामाजिक सुधारणा होईल.

कायद्याची दहशत न उरल्याने कायदे तोडणाऱ्यांचे फावते. दुसरीकडे कायदे राबवणाऱ्या मंडळींनाही जनतेच्या हिताशी देणे घेणे नसून कागद रंगवण्यात आणि वेळ काढूपणा करण्यातच रस असल्याचे अनेकता दिसते. मुंबईतील टिळक पुलाजवळ झालेल्या अपघातातील मृत व्यक्तीचा मृतदेह उचलण्याऐवजी हा अपघात कोणत्या हद्दीत घडला यावर पोलीस प्रशासनाचा तब्बल १२ तास खल सुरु होता. दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी भारत पाकिस्तान सीमेवर असलेल्या कच्छ गावात असलेली गॅसच्या फुग्यावरची बंदी २००२ पर्यंत सुरू होती. ही कायद्याची अंमलबजावणी नसून एक प्रकारे विटंबनाच आहे. हे थांबवण्यासाठी जनतेलाही प्रसंगी रस्त्यावर उतरावे लागेल, असेही श्री. तोरसेकर यांनी सांगितले. अध्यक्ष सुनील पेंडसे, संचालक सी. ए. गिरीश बोरगांवकर, संचालिका चंद्रिका चौहान, संचालक राजेश पवार, जगदीश भुतडा, पुरूषोत्तम उडता, विनोद कुचेरिया, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य डॉ. अजितकुमार देशपांडे, जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार आदी उपस्थित होते. नीला गताटे यांनी सूत्रसंचालन तर मंडळाच्या उपाध्यक्षा प्रीती चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केले.

### माजी पोलीस महासंचालक भूषणकुमार उपाध्याय यांचे आज व्याख्यान

जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचे चौथे आणि शेवटचे पुष्प महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक आणि सोलापूरचे माजी पोलीस आयुक्त भूषणकुमार उपाध्याय सायंकाळी ७ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात गुंफणार आहेत. ताण तणाव आणि मानसिक स्वास्थ्य असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. या व्याख्यानास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जनता बँक सांस्कृतिक मंडळाने केले आहे.

# मामाच्या घरी गेल्यावर घरात चोरी; दागिनेसह रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**



पती-पत्नी शेजारी असलेल्या त्यांच्या मामाच्या घरी गेल्यावर अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून कडी-कोयंडा उचकटून घरातील कपाटामधील सोन्या-चांदीच्या दागिण्यासह रोख रक्कम २५ हजार, ५० हजाराचे २० ग्रॅमचे सोन्याचे लॉकेट, ९ हजाराचे २ ग्रॅमचे लॉकेट, २ हजाराचे पैंजण असे रोख रक्कम असा एकूण ८६ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.१५ सप्टेंबर रोजी पहाटे घडली.याप्रकरणी अभिजीत भिमाशंकर कांबळे (वय-३५,रा.रविवार पेठ,जुना बोरामणी नाका) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहायक पोलीस निरिक्षक पडसळकर हे करित आहे.

# सिव्हिल इंजिनियर्सचा सोलापूरच्या विकासात सिंहाचा वाटा

## इंजि. राजेंद्र पवार : अभियंता दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

समाजहिताचे भान राखून अभियंत्यांनी इमारतींची पर्यायाने समाजाची उभारणी करावी असे अपेक्षित असते. हे भान राखून असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्सने सोलापूरच्या विकासात सिंहाचा वाटा उचलला आहे, असे प्रतिपादन पुणे विभागाचे नगर रचना विभागाचे जॉईंट डायरेक्टर इंजि. राजेंद्र पवार यांनी केले.



असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सतर्फे रविवारी अभियंता दिन हेरिटेज येथे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त इंजि. संदीप कारंजे होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त इंजि. संदीप कारंजे, अल्ट्राटेक सिमेंटच्या टेक्निकल सर्विसेसचे रिजनल हेड शितल सिंदखेडे, मार्केट हेड इंजि. दीपक किंगर, असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे, उपाध्यक्ष इंजि. भगवान जाधव, सचिव इंजि. मनोहर लोमटे उपस्थित होते.

प्रारंभी दीपप्रज्वलन आणि भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जॉइंट डायरेक्टर इंजि. पवार म्हणाले, भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी आपल्या अभियांत्रिकी क्षेत्रातील महान कार्यामुळे स्थापत्य अभियंत्यांना समाजात मानाचा दर्जा मिळवून दिला. पारतंत्र्याच्या काळात स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणे हे आव्हानात्मक होते.

असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत मोरे यांनी प्रास्ताविक केले. मंगेश लामकाने यांनी सूत्रसंचालन तर असोसिएशनचे सचिव मनोहर लोमटे यांनी आभार प्रदर्शन केले.

# भाजपाकडून उमेदवारीसाठी ॲड. वैद्य यांनी दिला शहराध्यक्ष काळेंकडे अर्ज

## भाजपच्या माजी सभागृह नेत्यांसह ६ माजी नगरसेवकांनी दिले पाठिंब्याचे शिफारस पत्र



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक ॲड. सोमनाथ वैद्य यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी सर्व स्तरातून पाठिंबा मिळत असून भाजपच्या माजी सभागृह नेत्यासह सहा नगरसेवकांनी पाठिंबा दर्शवला आहे. दरम्यान, रविवारी ॲड. वैद्य यांनी भाजपकडून उमेदवारी मिळावी म्हणून भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांना अधिकृत अर्ज दिला.

गेल्या १९ वर्षापासून प्रशासकीय कामाचा तगडा अनुभव असलेले स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक ॲड वैद्य हे दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी गेली काही महिन्यापासून या मतदारसंघात विविध सामाजिक उपक्रमांचा धडाका लावला आहे. दरम्यान, ते नेमके कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढविणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर रविवारी सायंकाळी ॲड. वैद्य यांनी भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांना दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून उमेदवारी मिळावी यासाठी अर्ज सादर केला. अर्जाबरोबरच त्यांनी कार्य अहवाल दिला आहे. यावेळी भाजपचे माजी सभागृह नेते श्रीनिवास करली, अनिल चव्हाण, श्रीनिवास पुरुड, अशोक बिराजदार आदी उपस्थित होते. सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून या निवडणुकीत सामाजिक, धार्मिक कार्यात अग्रेसर असलेले तसेच प्रशासकीय पातळीवर कामाचा प्रचंड मोठा अनुभव असलेला नवा चेहरा म्हणून सर्व परिचित झालेले ॲड. वैद्य यांना भाजपाकडून उमेदवारी देण्यात यावी यासाठी माजी नगरसेवकांनी पाठिंब्याचे पत्र दिले आहे. या शिफारस पत्रासह अहवालासोबत वैद्य यांनी भाजपचे शहराध्यक्ष काळे यांच्याकडे इच्छुक म्हणून उमेदवारी अर्ज दिला आहे.

### या माजी नगरसेवकांनी दिले शिफारस पत्र

एड. सोमनाथ वैद्य यांना दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून भाजपने उमेदवारी द्यावी यासाठी भाजपचे माजी सभागृह नेते श्रीनिवास करली, माजी नगरसेविका वरलक्ष्मी श्रीनिवास पुरुड , राजेश्री अनील चव्हाण, संतोष भोसले , जुगनबाई अंबेवाले, राजश्री अशोक पाटील - बिराजदार यांनी शिफारस पत्र दिले आहे. हे शिफारस पत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पाठविण्यात आले आहे.

### वैद्य यांचा अर्ज प्रदेशाध्यक्षांकडे पाठविणार : नरेंद्र काळे

एड. सोमनाथ वैद्य यांनी भाजपकडून दक्षिण सोलापूर मतदारसघातून उमेदवारी मिळावी यासाठी रितसर अर्ज माझ्याकडे दिला आहे. शिफारशीही जोडल्या आहेत. त्यांचा अर्ज भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि वरिष्ठ बोर्डाकडे पाठविण्यात येईल अशी माहिती भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी पत्रकारांना दिली.

### भाजपचे माजी नगरसेवक आणि सरपंचांची आग्रही मागणी

दक्षिण सोलापूर मतदार संघातून मी भाजपकडून निवडणूक लढवावी यासाठी विविध घटकांकडून आग्रही मागणी होत आहे. भाजपच्या सुमारे १२ नगरसेवकांनी लेखी व तोंडी पाठिंबा दर्शवला आहे. त्यापैकी सहा जणांनी लेखी शिफारसही दिली आहे. त्याचबरोबर या मतदार संघातील अनेक सरपंचही तशी मागणी करीत आहेत. ॲड. वैद्य यांना प्रशासकीय कामाचा तगडा अनुभव असून मतदारसंघाच्या विकासासाठी नवा चेहरा देणे गरजेचे आहे. एड. सोमनाथ वैद्य यांना भाजपाने उमेदवारी दिल्यास निवडून आणू असा निर्धार अनेक जण व्यक्त करत असल्याचे इच्छुक उमेदवार ॲड. सोमनाथ वैद्य यांनी यावेळी सांगितले.

## अग्रलेख...

# आर्थिक व औद्योगिक आघाडीवरील यश

आनंद, सुख-समृद्धी तसेच ऐश्वर्य, प्रेरणा व ऊर्जा प्रदान करणाऱ्या मंगलमूर्ती विघ्नहर्त्याचा गणेशोत्सव देशभरात सर्वत्र उत्साहात साजरा केला जात आहे. एकीकडे चैतन्य व उत्साहाचे वातावरण असतानाच दुसरीकडे आर्थिक, औद्योगिक आघाडीवरदेखील सकारात्मक व देशाच्या विकासाच्या दृष्टीने अनुकूल बातम्या समोर आल्या आहेत. त्यातील पहिली बातमी ऊर्जा क्षेत्रातील आहे. एनएचपीसी म्हणजे नॅशनल हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर कॉर्पोरेशनने प्रतिष्ठित नवरत्न दर्जा प्राप्त केला आहे. जगातील आघाडीच्या दहा जलविद्युत कंपन्यांच्या श्रेणीमध्ये सहभागी होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू केलेल्या एनएचपीसीची विकास यात्रा १९८१-८२ मध्येच सुरू झाली. केवळ १८० मेगावॅटचा प्रकल्प हाती घेऊन कंपनीची वाटचाल सुरू झाली आणि आता एनएचपीसी ही १०० टक्के हरित ऊर्जा प्राप्त करणारी ७१४४ मेगावॅटची प्रभावशाली कंपनी बनली आहे. दुसरी आनंददायी वार्ता म्हणजे गेल्या चार महिन्यांत भारताच्या कृषी उत्पन्नाची निर्यात वाढली असून त्यात बासमती तांदळाचा मोठा वाटा आहे. सर्वांना आवडणाऱ्या, लोकप्रिय, चवदार, सुगंधी बासमती तांदळाची निर्यात १५ टक्क्यांनी वाढली आहे. विशेष म्हणजे भारत हा जगातील बासमती तांदळाचा मोठा उत्पादक आहे. देशाच्या आर्थिक आघाडीवरील तिसरे महत्त्वाचे सकारात्मक वृत्त म्हणजे २०२७ सालापर्यंत भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता ख्यातनाम आंतरराष्ट्रीय संस्था 'जेफरीज'ने वर्तविली आहे. तर, २०२४ ते २०३१ या काळात या दशकाच्या अखेरपर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचा वेग ७.६ ते ७.८ टक्के राहणार असल्याचा अंदाज नामवंत क्रेडिट रेटिंग संस्था डेलॉईटने वर्तविला आहे. या सर्वच बातम्या समस्त भारतीयांच्या दृष्टीने निश्चितच समाधानकारक आहेत. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच जागतिक पातळीवर जे बदल होत आहेत, ज्या संधी उपलब्ध होत आहेत, त्याचा फायदा भारताने घेऊन विकसित राष्ट्राच्या दिशेने वेगाने वाटचाल केली पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी युवकांच्या एका कार्यक्रमाला संबोधित करताना म्हटले होते. पंतप्रधानांच्या या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत भारतातील सळसळत्या चैतन्याची तरुणाई प्रयत्न, सातत्य व इच्छाशक्तीने आपल्या स्वप्नांचा पाठलाग करीत आहे. परिणामी देशातील अनेक तरुण उद्योजक प्रगती व विकासाचे ध्वज उंच फडकवत आहेत. काही दिवसांपूर्वी नीती आयोगाच्या पार पडलेल्या गव्हर्निंग कौन्सिल अर्थात प्रशासकीय परिषदेत मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करणे ही प्रत्येक भारतीयाची महत्त्वाकांक्षा आहे,' हे प्रामुख्याने अधोरेखित केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे उद्‌गार म्हणजे सामर्थ्यशाली व विकसित भारताचे जणू संकल्पचित्रच आहे. प्रखर इच्छाशक्ती, दुर्दम्य आशावाद, भव्य स्वप्ने व जबरदस्त आत्मविश्वास या साऱ्याच गोष्टींचे प्रतिबिंब पंतप्रधानांच्या प्रत्येक मार्गदर्शनात उमटते. एकीकडे विरोधी पक्ष सातत्याने नकारात्मक व द्वेषमूलक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असताना दुसरीकडे केंद्रातील मोदी सरकार प्रगती व विकासाचे मुद्दे सकारात्मक दृष्टिकोनातून मांडत त्या दिशेने प्रत्यक्ष कृती करीत आहे. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे अग्निवीर योजना. रालोआ सरकारच्या अग्निवीर योजनेला विरोधी पक्षांनी प्रामुख्याने काँग्रेसने प्रखर विरोध केला होता. या योजनेविषयी गैरसमज निर्माण करण्याची एकही संधी काँग्रेसने सोडली नव्हती. मात्र, आता मोदी सरकारने अग्निवीर योजनेची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविण्याचा निर्णय घेऊन काँग्रेससह सर्वच विरोधकांचे दात त्यांच्याच घशात घातले आहेत. अग्निवीरचा कार्यकाळ चार वर्षांवरून सात वर्षांपर्यंत वाढणार आहे. याशिवाय त्यांचा एकरकमी पगारही वाढणार आहे. फेब्रुवारी २०२४ नंतर अग्निवीर योजनेंतर्गत भरती झालेल्या सैनिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. नवीन योजनेंतर्गत आता 'अग्निवीर' सात वर्षे सैन्यात सेवा करणार असून त्याला २२ लाखांऐवजी ४१ लाख रुपये दिले जाणार आहेत. आता त्यांचे प्रशिक्षण २२ आठवड्यांऐवजी ४२ आठवड्यांचे असेल. ३० दिवसांची रजा ४५ दिवसांपर्यंत वाढणार आहे. तसेच आता २५ टक्के ऐवजी ५० टक्के सैनिक कायम होणार आहेत. म्हणजेच या वाढीव म्हणजे ५० टक्के सैनिकांना लष्करात कायमस्वरूपी नोकरी मिळेल. तिसऱ्यांदा देशाची सत्तासूत्रे हाती घेणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय आर्थिक व औद्योगिक आघाडीवर घेतले आहेत. २०१४ पूर्वीच्या भारतात म्हणजेच काँग्रेसप्रणीत संपुआ सरकारच्या राजवटीत प्रचंड भ्रष्टाचार, राष्ट्रवादी भावनेचा अभाव, घराणेशाही व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव यांच्यामुळे देशाच्या विकासात अनेक अडथळे आले. मात्र, याच्या अगदी उलट व कार्यक्षम आणि धडाकेबाज निर्णय घेणारे सरकार अशी मोदी सरकारची प्रतिमा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगमनानंतर देशातील व्यवस्थेमध्ये चैतन्य निर्माण झाले, ही वस्तुस्थिती असून गेल्या १० वर्षांत अर्थव्यवस्था गतिशील ठेवण्यात सरकारने यश प्राप्त केले आहे. पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारत आता वेगाने वाटचाल करीत असून यामुळे देशातील तरुणांसाठी अनेक जागतिक संधी उपलब्ध होत आहेत. जगातील सर्व आधुनिक पायाभूत सुविधा साध्य करण्यासाठी केंद्राचे सर्वच स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. कुठेही निव्वळ स्वप्नरंजनात न वावरता उलट त्या स्वप्नांचा यशस्वीपणे पाठलाग करून व त्याला प्रयत्न, सातत्य आणि परिश्रमांची जोड देऊन गेल्या दहा वर्षांपासून मोदी सरकारची वाटचाल सुरू आहे. गतिशीलता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर हे मोदी सरकारचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या दहा वर्षांच्या कार्यकाळात केंद्रातील मोदी सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय प्रभावीपणे व अतिशय गतीने राबविले. परिणामी २०१४ पासून अनेक मोठमोठ्या व महत्त्वाकांक्षी योजना मार्गी लागल्या. आता तिसऱ्यांदा पुन्हा केंद्रात भाजपाप्रणीत रालोआ सरकार सत्तारूढ झाले आहे. त्यामुळे जनतेच्या आशा-अपेक्षा-आकांक्षा उंचावल्या आहेत. त्यामुळे केंद्र सरकारला शाश्वत व दूरगामी विकासाच्या दृष्टीने सर्व राज्यांना सोबत घेऊन प्रभावी धोरणांची अंमलबजावणी करावी लागणार आहे. आर्थिक व औद्योगिक आघाडीवर नव्याने धोरणे आखण्याचे मोठेच आव्हान केंद्रापुढे आहे. सर्वच स्तरांवर अर्थात आर्थिक, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व अन्य सर्वच क्षेत्रांत व्यापक व गुणात्मक परिवर्तन करण्याचे केंद्रातील मोदी सरकारचे ध्येय आहे. हे कार्य मुळीच सोपे नसले, तरी पंतप्रधान आणि त्यांच्या सहकाऱ्यांची इच्छाशक्ती व क्रियाशक्ती दांडगी आहे. त्यामुळे व्यापक परिवर्तनाचे हे आव्हान ते निश्चितच आत्मविश्वासाने स्वीकारतील, याची खात्री आहे. मात्र, यासाठी केवळ राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनी प्रयत्न करून चालणार नाही तर याकरिता नोकरशाही व संबंधित सर्वच घटकांचे सहकार्य आवश्यक आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विकसित भारताचा संकल्प साध्य होण्यासाठी देशातील तरुण उद्योजक, स्टार्टअप्स यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारण 'विकसित भारत' ही केवळ आकर्षक अथवा लक्षवेधी घोषणा नाही, तर तो आपल्या सर्वांचा समान उद्देश आहे. हे आपणच म्हणजेच देशवासीयांनी स्वत:ला दिलेले एक लक्ष्य आहे. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी देशवासीयांची सामूहिक इच्छाशक्ती, क्रियाशक्ती एकवटण्याची व त्याचे प्रकटीकरण होण्याची आवश्यकता आहे. विकासाचा हा संकल्प पूर्णत्वास नेण्याची शक्ती आम्हा सर्व देशवासीयांना मिळो, अशी श्रीगणेशाला नम्र प्रार्थना आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# हरयाणात तिरंगी लढत!

हरयाणा विधानसभेचे निवडणूकपूर्व चित्र स्पष्ट झाले असून राज्यात भाजपा, काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात तिरंगी लढत होईल. काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात जागा वाटपाचा समझोता होऊ न शकल्याने तिरंगी लढतीची स्थिती तयार झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या सूचनेवरून काँग्रेसने आपशी जागा वाटपाची चर्चा सुरू केली. आम आदमी पक्षाने प्रारंभी २० जागांची मागणी केली. नंतर या पक्षाने आपली मागणी १५ जागांवर खाली आणली. मग १० जागांवर समझोता करण्यास हा पक्ष तयार झाला. शेवटी शेवटी तर आप नेत्यांनी ५-७ जागांवरही समझोता करण्याची तयारी दर्शविली. पण, राज्यातील काँग्रेसचे प्रमुख नेते भूपिंदरसिंग हुड्डा यांनी या समझोत्यास जोरदार विरोध केल्याने हा समझोता झाला नाही व आता दोन्ही पक्षांनी आपल्या उमेदवारांची घोषणा केली असून त्यांनी सर्व म्हणजे ९० मतदारसंघांत उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे.

**२०१९ ची स्थिती** : २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आपने राज्यातील ४६ मतदारसंघांत आपले उमेदवार उभे केले होते आणि या सर्व उमेदवारांची जमानत जप्त झाली होती. त्यावेळी पक्षाला ०.४८ टक्के मतदान झाले होते. त्या तुलनेत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस-आप समझोत्यानुसार आपला कुरुक्षेत्रची जागा देण्यात आली होती. भाजपाने याठिकाणी नवीन जिंदल यांना उभे केले होते तर आपने सुशील गुप्ता यांना उमेदवारी दिली होती. याठिकाणी मात्र आपने चांगली लढत दिली. नवीन जिंदल यांना २९ हजार मतांनी निसटता विजय मिळाला होता. आणि 'आप'ला जवळपास ४ टक्के मतदान झाले होते. चार विधानसभा मतदारसंघांत आपला आघाडी मिळाली होती. बहुधा याच आधारे आपने ५-७ जागांची मागणी केली असावी. ती काँग्रेसने फेटाळून लावली. आपला जागा देणे म्हणजे काँग्रेसने आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे, असे प्रतिपादन हुड्डा व इतर नेत्यांनी केले. हुड्डा यांनी तर पक्षाच्या एका बैठकीचा सभात्यागही केला होता, असे समजते. त्यांचा 'आप'शी समझोता करण्यास करडा विरोध होता, असे मानले जाते.

**परिणाम** : काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात होऊ न शकलेल्या समझोत्याचा निवडणुकीवर कोणता परिणाम होईल, याचे मूल्यमापन केले जात आहे. पहिला भाग म्हणजे उमेदवारांची घोषणा झाल्यानंतर काँग्रेस व भाजपा दोन्ही पक्षांत बंडखोरी झाली आहे. हे बंडखोर आपापल्या पक्षांना किती व कसे नुकसान पोहोचवतील, याचा अंदाज अद्याप आलेला नाही. आपने या बंडखोरांना उमेदवारी दिल्यास वा बंडखोरांनी स्वत: निवडणूक न लढविता आपच्या उमेदवारांना पाठिंबा दिल्यास त्याचा मतदानावर कसा व कितपत परिणाम होईल, हेही आजच सांगता येणार नाही. आपने राज्यात सर्व जागा लढविण्याचा निर्णय घेतला असून जास्तीत जास्त मतदारसंघांत काँग्रेसला नुकसान पोहोचविण्याची मानसिकता पक्षात आढळून येते. पण, राज्यात आपजवळ प्रभावशाली असे नेते नाहीत. त्यामुळे आपच्या ९० पैकी किती उमेदवारांना आपली जमानत वाचविता येईल, हाच एक प्रश्न सध्या तरी विचारला जात आहे. हरयाणा विधानसभा केवळ ९० सदस्यांची असल्याने ८-१० मतदारसंघांत जरी आपने काँग्रेसने नुकसान पोहोचविले तरी याचा फटका पक्षाला बसू शकतो.

**जाट-गैरजाट** : हरयाणात काँग्रेसची सारी दारोमदार जाट व शेतकऱ्यांवर आहे. हे दोन्ही घटक भाजपाच्या विरोधात आपल्याला एकगठ्ठा मतदान करतील, असे या पक्षाला वाटते. याशिवाय राज्यात प्रभावी मानला जाणारा वैश्य म्हणजे बनिया समाज काँग्रेसला मतदान करील, असा एक विश्वास काँग्रेसला वाटत आहे. तर, भाजपाने गैरजाटांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे. मात्र, काही प्रमाणात जाटही आपल्याला मतदान करतील, असे भाजपाला वाटते. आजवरच्या काही निवडणुकीत २० ते २५ टक्के जाटांनी भाजपाला मतदान केले आहे. यावेळीही हे मतदान आपल्याला होईल, असे पक्षाला वाटते. सोबतीला निवडणूक नियोजन - संघटना या आधारे राज्यात भाजपाला पुन्हा एकदा निसटता विजय मिळण्याची आशा भाजपाला वाटत आहे. काँग्रेस-आम आदमी पक्ष यांच्यात जागावाटप न झाल्याने भाजपाला हरयाणात आशेचा किरण दिसू लागला आहे.

**मुस्लिम नगण्य** : हरयाणा हे एक असे राज्य आहे की, ज्यात मुस्लिम मतदारांची संख्या फार नगण्य आहे. राज्याच्या काही भागात ३-४ टक्के मुस्लिम मतदार आहेत. पण, त्यांच्यात निवडणूक निकालांना प्रभावित करण्याची ताकद नाही.

**'इंडिया'वर परिणाम** : काँग्रेस व आम आदमी पक्ष यांच्यात कोणत्याही समझोता न झाल्याने इंडिया आघाडीला तडा जाण्याची भीती काही काँग्रेस नेत्यांना वाटत आहे. काँग्रेस पक्ष आपल्या सहयोगी पक्षांना सामावून घेत नाही, असा आरोप पक्षावर होत आला आहे. तो विचारात घेऊनच राहुल गांधी यांनी काँग्रेस-आप युतीची भूमिका घेतली होती. आम आदमी पक्षाला ७-८ तर समाजवादी पक्षाला २-३ जागा देऊन या दोन्ही पक्षांना सोबत घेऊन पक्षाने निवडणूक लढवावी, असे प्रतिपादन त्यांनी केले होते. पण, ते विदेशात निघून जाताच हरयाणातील काँग्रेस नेत्यांनी समझोता हाणून पाडला, असे म्हटले जाते.

**आता दिल्लीत** : लोकसभा निवडणुकीत पंजाबमध्ये काँग्रेस व आम आदमी पक्ष यांनी परस्परांच्या विरोधात निवडणूक लढविली. त्यात काँग्रेसने आम आदमी पक्षाला मात दिली. त्यानंतर आता हरयाणा विधानसभा निवडणुकीत पुन्हा तीच स्थिती निर्माण झाली आहे. याठिकाणीही काँग्रेस आपला पटकणी देण्याची तयारी करीत आहे. हे दोन्ही पक्ष परस्परांच्या विरोधात निवडणूक लढवीत आहेत. गुजरात व छत्तीसगढमध्ये आम आदमी पक्षाने काँग्रेसला चांगलेच नुकसान पोहोचविले आहे. २०२५ च्या प्रारंभी दिल्ली विधानसभा निवडणूक होत असून त्यावेळी आम आदमी पक्ष काँग्रेसचा हिशेब चुकता करण्याची चिन्हे आहेत. दिल्लीत सध्याची स्थिती पाहता आम आदमी पक्षाला पुन्हा एकदा विजय मिळू शकतो. मात्र, पक्षाच्या जागा कमी होणार, हे ठरलेले आहे. या कमी होणाऱ्या जागा जिंकण्यासाठी काँग्रेस व भाजपात संघर्ष होणार आहे. यात भाजपाने बाजी मारल्यास काँग्रेसला पुन्हा एकदा दारुण पराभवाचा सामना करावा लागेल. यानंतर मग आप आणि काँग्रेस यांच्यातील संबंध जवळपास संपल्याने इंडिया आघाडीत या पक्षाचे स्थान काय असेल, असा प्रश्न स्वाभाविकच विचारला जाणार आहे.

कोणत्याही आघाडीत मित्रपक्षांना महत्त्वाचे स्थान असते, ही बाब काँग्रेसला विसरून चालणार नाही. भाजपाने राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केल्यावर संयोजक असे नवे पद निर्माण करून जॉर्ज फर्नांडिस यांना महत्त्वाची जबाबदारी दिली होती आणि निर्माण होणाऱ्या समस्या हाताळण्याचे कामही त्यांनाच दिले होते. विरोधकांच्या आरोपांना उत्तर-प्रत्युत्तर देण्याचे कामही त्यांनी फर्नांडिसांवर सोपविले होते; जे त्यांनी उत्तमपणे पार पाडले होते. सोनाराच्या हातून कान टोचण्याचा हा प्रकार होता. जो वाजपेयी, अडवाणी यांनी योग्यप्रकारे केला होता.

## वेध

अनिरुद्ध पांडे

# बेशरमाचा वृक्ष...!

आपल्या जैवविविधतेत एक 'बेशरम' नावाची वनस्पती प्रजाती आहे. एखाद्या झुडपासारखी असलेली मोठ्या पानांची ही वनस्पती अगदी बेशरमसारखी वाढते. जिथे मूळ धरेल तिथे अस्ताव्यस्त वाढत राहते. कोणताही उपयोग नसलेली ही एक वनस्पती प्रजाती आहे. अशाच 'अमरवेल'सारख्या काही वनस्पती, काही कीटक, डास, झुरळ, माशी किंवा उंदरासारखे काही प्राणी, जे कोणत्याही कामाचे नाहीत पण उपद्रवी मात्र निश्चित. उपद्रवाशिवाय कोणताही कवडीमात्र उपयोग नसलेल्या या जैवविविधतेसोबत त्यांचे उपद्रव झेलतच आपल्याला जगावे लागते. दुर्दैवाने त्यांचे निर्मूलन अजूनही आपल्या विज्ञानाला जमलेले नाही. उलट आपण 'त्यांच्यासह' जगायला शिकलो आहोत. 'तिने त्याला झुरळासारखे झटकून टाकले' किंवा 'तो म्हणजे बेशरमाचे झाडच आहे' असे मानवी जीवनातील उल्लेख या पूर्णपणे निरुपयोगी जीवजंतूंबद्दल आपण करत असतो. बेशरम या झुडपी वनस्पतीचे झाडही कधी होत नसते, म्हणून निर्लज्ज व्यक्तीचा उल्लेख 'बेशरमाचे झाड' असा आपण करतो. पण त्यातही काही लोक बेशरमपणाची परिसीमा ओलांडणारे आपल्याला आजूबाजूला दिसतात; त्यांचा उल्लेख 'बेशरमाचा वृक्ष' असा व्हायला हवा आहे. असाच एक बेशरमाचा वृक्ष आपल्याला दुर्दैवाने आपल्या महाराष्ट्रातच आढळून आला आहे. तीन मोठमोठ्या फांद्या असलेल्या या बेशरमाच्या वृक्षाचे नाव आहे 'खेडकर कुटुंब...!' पूजा खेडकर ही या बेशरमाच्या वृक्षाची मुख्य फांदी असून तिचे वडील दिलीप आणि आई मनोरमा याही मुळीच लहान नसलेल्या फांद्या आहेत.

जसे बेशरमाचे झाड बेशरमसारखे वाढतच असते तसेच या देशात भ्रष्टाचाराचे आहे. तो संपतच नसतो. भ्रष्टाचाराचे झाड छाटा तरी ते संपत नाही, नष्ट तर मुळीच होत नाही. फक्त कुठे कमी तर कुठे जास्त एवढेच असते. या पूजा खेडकर नावाच्या बेशरमाच्या झाडाचा नव्हे वृक्षाचा आकार तर खूपच मोठा आहे. या झाडाला बेशरमपणाची, भ्रष्टाचाराची अनुवंशिक पृष्ठभूमी आहे. कशात काही नसताना आयएएसच्या रोपट्याला फक्त अंकुरच आला असताना पूजा खेडकरने घातलेला उधम म्हणजे बेशरमाचा वृक्षच म्हणता येईल. ही बाई आयएएस झाली खरी; पण तीसुद्धा खूप साऱ्या लांड्यालबाड्या करून...! खूप मोठा खोटारडेपणा करून आयएएस मिळवणाऱ्या या बाईला पहिली नियुक्ती मिळाली आणि तिच्यातील उपजत मग्रुरीला अंकुर नव्हे, तर धुमारेच फुटले, तेही पहिल्याच दिवसापासून. या पूजा खेडकरने आयएएस मिळवण्यासाठी खोटी, बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे, धादांत खोटे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वेगवेगळी नावे दाखवून नियमांत बसत नसतानासुद्धा चक्क नऊ वेळा आयएएसची परीक्षा दिली. नियमांनुसार नऊ परीक्षा देण्याची मर्यादा संपली, पण ही बाई पासच झाली नाही. त्यामुळे स्वत:च्या नावात, आईवडिलांच्या नावात बदल करून तिने अवैधरीत्या परीक्षा दिली. परीक्षेचा अर्ज भरताना फोटो बदलणे, सही बदलणे, पत्ता बदलणे असले उद्योग केल्याचेही सिद्ध झाले आहे. यूपीएससीच्या नियमांत नऊ वेळा ही आयएएसची परीक्षा देता येते. पण या पूजा खेडकरने मोठ्ठी भामटेगिरी करून तब्बल बारा वेळा आयएएसची परीक्षा दिल्याचे उघड झाले आहे.

अनेक उटपटांग धंदे करून 'खरी' आयएएस मिळवणाऱ्या या पूजाबाईने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू झाल्यानंतर उधम केला नसता तर सारेकाही 'अळीमिळी गुपचिळी' असे साधून गेले असते. पण तिने माज दाखवला आणि वासे फिरले. याच पूजाला ती मसुरीच्या लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीतही गैरवर्तणुकीसाठी तब्बल आठ वेळा मेमो बजावण्यात आले होते. महाराष्ट्रात प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर राज्य प्रशासनाने तिची वर्तणूक पाहून पुण्यातून काही दिवसांतच तिला वाशीमला हलवले. दरम्यान, पूजा खेडकरचे एकूणच उद्योग प्रकाशझोतात आले. शेवटी राज्य प्रशासनाने तिला १६ जुलै २०२४ रोजी वाशीममधून कार्यमुक्त केले. वाशीमच्या अल्प मुक्कामात तिने तेथील ओबीसी बांधवांची दिशाभूल करून, 'मला ओबीसी असल्यामुळे नाहक त्रास दिला जात आहे' अशी भूमिका घ्यायला लावली होती. यूपीएससी प्रशासनाने या बाईला लगेचच अकादमीत हजर होण्याचे आदेश दिले. पण ती गेलीच नाही. नियमांनुसार संधी दिल्यानंतर अखेर ३१ जुलै २०२४ रोजी यूपीएससीने पूजा खेडकरची आयएसच्या उमेदवारीपासून सारीच प्रक्रिया रद्द करून टाकली. या दणक्यासोबतच तिला पुढे अशी कोणतीही परीक्षा देण्यापासून कायमचे प्रतिबंधितही करून टाकले. ही पूजा मुळात डॉक्टर असून तिने २००७ मध्ये वैद्यकीय शिक्षण घेताना आपण तंदुरुस्त असल्याचा अहवाल दिला होता. हीच बाई पुढे दिव्यांग कशी झाली हा यूपीएससीला पडलेला प्रश्न आहे. त्यात अटक होऊ शकणार असल्याने बेपत्ता झालेल्या पूजा खेडकरची अखेर भारत सरकारनेही ७ सप्टेंबर २०२४ ला हकालपट्टी केल्याचा आदेश जारी केला आहे. त्यामुळे येती २०-२५ तरी वर्षे महाराष्ट्रातील प्रशासन आणि जनतेला पोखरू शकणारी ही पूजारूपी 'उधळी' सध्यातरी खरोखरच विकलांग झाली आहे, हे मात्र खरे.

९८८१७ १७८२९

## कानोसा

अमोल पुसदकर

# वक्फच्या मनमानीला लगाम

बिहारमधील फतूहाजवळ असलेले गोविंदपूर येथील नागरिक दहशतीत आहेत. कारण काय तर वक्फ बोर्डाने त्यांना गाव खाली करण्याचा आदेश दिलेला आहे. गोविंदपूरमध्ये ९५ टक्के लोक हिंदू आहेत. ते शेकडो वर्षांपासून तेथे राहत आहेत. परंतु वक्फचे म्हणणे आहे की, गावाच्या पाठीमागे एक मजार आहे आणि हे संपूर्ण गावच त्यांचे कब्रस्तान आहे. याबाबत स्थानीय प्रशासनाला गावकऱ्यांनी विचारले की, जमीन कोणाची आहे तर प्रशासनाने गावकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला. पाटणा उच्च न्यायालयामध्ये जेव्हा हा खटला पोहोचला त्यावेळेस पाटणा उच्च न्यायालयाने सांगितले की, ही जमीन गावकऱ्यांची आहे. त्यांनी वक्फ बोर्डाला विचारले की, तुमच्याजवळ त्या जमिनीचे कागदपत्र आहेत का? तर, वक्फ बोर्ड म्हणाले की, पूर्वी वक्फ म्हणजे धर्माच्या नावाने जमीन तोंडी दान दिली जायची. सर्व जमिनीची कागदपत्रे दाखविणे शक्य नाही. फक्त आम्ही म्हणतो आहे म्हणून ही जमीन वक्फ बोर्डाची आहे, असे तुम्ही मान्य करा. म्हणून आता नवीन विधेयकामध्ये तोंडी वक्फवर बंदी घालण्यात आलेली आहे. जो काही व्यवहार करायचा तो कायदेशीर करावा लागेल. दान देणाऱ्याला त्याची सगळी कागदपत्रे सादर करीत ती जमीन वक्फ बोर्डाला द्यावी लागेल. वक्फला सर्व कायदेशीर प्रक्रिया करूनच ती जमीन त्यांच्या नावावर करून घेता येईल. सर्वप्रथम १९५४ मध्ये भारताच्या संसदेत वक्फ कायदा पारित करण्यात आला व त्यामध्ये १९९५ मध्ये सुधारणा करून वक्फ बोर्डाला अमर्यादित अधिकार देण्यात आले. २०१३ मध्ये पुन्हा या कायद्यात संशोधन करून हे अधिकार पुन्हा वाढविण्यात आले.

तामिळनाडूमधील एक गाव तिरुचेंदुराई जिथे सुमारे ११०० वर्षांपासून हिंदू समाजाची वस्ती आहे. जेव्हा त्यातील एका व्यक्तीने त्याची जमीन विकण्याचा प्रयत्न केला तर वक्फ बोर्डाने त्यावर आक्षेप घेतला व त्यांना म्हटले की, हे सर्व गाव ही वक्फची जमीन आहे. गुजरातमधील द्वारकेजवळ असलेल्या एका शेतजमिनीवर वक्फ बोर्डाने आपला अधिकार सांगितला. शेतमालक म्हातारा असल्यामुळे तो त्याच्या शेतजमिनीवर जाऊन बघू शकत नव्हता. तिथे लोकांनी एक मजार उभारली व काही दिवसांनी त्यांनी ही संपूर्ण जमीन वक्फची आहे, असे घोषित केले.




गोविंदपुरातील गावकरी असो वा तामिळनाडूतील गावकरी किंवा मग गुजरातमधील हा शेतकरी; हे सगळेच लोक जेव्हा न्यायालयात पोहोचले त्यावेळेला न्यायालयाने वक्फ बोर्डाला जमिनीची कागदपत्रे मागितली. त्यावर वक्फ बोर्ड म्हणतो की, आमच्याजवळ कागदपत्र नसले तरीही जमीन आमची आहे. असे ८५ हजार खटले देशभरातील विविध न्यायालयात सुरू आहेत. लोकांच्या जमिनी बळकावणे, ही गुंडगिरी आहे. हा जमीन जिहादचा एक प्रकार आहे.

वास्तविक पाहता इस्लाम जेव्हा भारतात आला त्यावेळेला आमच्या देशातील अनेक राजांनी त्यांना मशिदी उभारायला जमिनी दिल्या. त्यावेळेस त्याची दानपत्रे केली जायची. त्यामुळे वर्षानुवर्ष ती जमीन अमक्याला दान दिली होती, हा उल्लेख असायचा. तोंडी केलेला हा वक्फ म्हणजे धर्माकरिता दान केलेली वस्तू व संपत्ती म्हणजे वक्फ बोर्डाची शुद्ध बनवाबनवी आहे. भारतामध्ये जवळपास नऊ लाख एकर एवढी मोठी जमीन वक्फ बोर्डाजवळ आहे.

आजपर्यंत वक्फ बोर्डासाठी आम्ही करू तो कायदा अशा पद्धतीचे वातावरण होते. कोणाच्याही जमिनीला ते रातोरात ती वक्फची मालमत्ता आहे, असे घोषित करू शकायचे. परंतु, केंद्र सरकारने मागील महिन्यात जे नवीन वक्फ संशोधन विधेयक आणलेले आहे त्यामध्ये मात्र तोंडी वक्फवर बंदी घालण्यात आलेली आहे. यानंतर जी जमीन वक्फ म्हणेल की आमची आहे, त्या संदर्भातील कागदपत्रे वक्फ बोर्डाला सादर करावी लागतील. कुठलीही नवीन जमीन वक्फ बोर्डामध्ये घेताना त्यासंबंधीची रीतसर नोंदणी जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या कार्यालयात करावी लागणार आहे. पूर्वी ज्याची जमीन घेतली जायची त्याला कुठलीही सूचना म्हणजे नोटीस न देता ही जमीन घेतली जायची. अनेक वर्षांनंतर त्याला समजायचे की त्याची जमीन ही वक्फ बोर्डाने घेतलेली आहे. परंतु आता तसे चालणार नाही.

भारतामध्ये सगळ्यात जास्त जमिनी या संरक्षण मंत्रालय, त्यानंतर रेल्वे मंत्रालय व त्यानंतर वक्फ बोर्डाच्या आहेत. यावरून आपल्या लक्षात येईल की, वक्फनी किती मोठे साम्राज्य उभारलेले आहे. अनेक ठिकाणी तर रेल्वेच्या जमिनीसुद्धा यांनी वक्फ दाखविलेल्या आहे. पूर्वीच्या नियमानुसार जर कोणाला न्याय मागायचा असेल तर त्याला व वक्फ ट्रिब्युनलमध्ये जावे लागत होते. यामध्ये वक्फचाच माणूस न्यायनिवाडा करण्यासाठी असायचा. बोर्डाच्या सदस्यांमध्ये महिलांचे कोणतेही स्थान नव्हते. त्यामुळे आता नवीन नियमानुसार किमान दोन महिला सदस्य या बोर्डामध्ये असणार आहेत. दोन सदस्य गैरमुस्लिम असावे, असेही नवीन विधेयकात म्हटलेले आहे. शिया, बोहरा व मागासवर्गीय मुस्लिमांना वक्फ बोर्डात स्थान देण्यात येणार आहे. बोहरा व आगाखानी मुस्लिमांसाठी वेगळ्या वक्फ बोर्डाची स्थापना करण्याची परवानगी हे विधेयक देते. वक्फ बोर्डाच्या बेबंदशाही कारभारावर भाष्य करताना न्यायालयाने म्हटले होते की, उद्या तुम्ही ताजमहाल व लाल किल्ला यांनाही वक्फची मालमत्ता घोषित कराल. पूर्वी सरकारी जमिनींना वक्फची मालमत्ता घोषित करण्याचा अधिकार बोर्डाजवळ होता. परंतु, आता त्यांना तसे करता येणार नाही. आता त्यांना प्रत्येक संपत्तीच्या संबंधातील कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत व स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय करण्यासंबंधीचे अधिकार देण्यात आलेले आहे. पूर्वी एखादी संपत्ती वक्फ आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार बोर्डाला होता. परंतु नवीन विधेयकानुसार हा अधिकार त्यांना राहणार नाही. वक्फचे सर्वेक्षण करण्याचा अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेला आहे. पूर्वी वर्क ट्रिब्युनलचा निर्णय अंतिम राहत होता. त्याच्या विरोधात न्यायालयात जाण्याची अनुमती नव्हती. परंतु आता वर्क ट्रिब्युनलचा निर्णय मान्य नसल्यास ९० दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अर्ज दाखल करता येऊ शकतो. नवीन विधेयकानुसार केंद्र सरकारला वक्फ बोर्डाचे अंकेक्षण म्हणजे ऑडिट करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे.

या विधेयकाला विरोध करणाऱ्या लोकांना या विधेयकामुळे पोटशूळ झालेला आहे. अब्जावधी रुपयांची संपत्ती आजपर्यंत वक्फ बोर्ड गिळंकृत करून बसलेले आहे. त्यांच्या घशातून त्या बाहेर काढण्याचा एकमात्र मार्ग हा १९९५ च्या या वक्फ बोर्ड अधिनियमामध्ये संशोधन करणे हा आहे. आज जरी हे विधेयक जेपीसीकडे पाठविण्यात आलेले असले तरीही उद्या हे पारित होईल, अशी आशा करूया. सरकारने उचललेले पाऊल हे मुस्लिम विरोधी नसून लोककल्याणकारी आहे. त्यामुळे याचे स्वागतच व्हायला पाहिजे...

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### करीअरला प्राधान्य


भारत देशात मुख्यतः कौटुंबिक एकतेला प्राधान्य दिले जाते. पूर्वीपासूनच भारतात एकसंध कुटुंब असलेल्या व्यक्तींचा भावनिक भगांक (इमोशनल कोशंट) हा जास्त दिसून येतो. त्यामुळे आपल्या व्यक्तींना भावनिकदृष्ट्या सुरक्षितता जाणवते. आता झपाट्याने होणाऱ्या जागतिकीकरणाच्या धोरणात आर्थिक आणि सामाजिक बदल होणे हे नैसर्गिक आहे. बऱ्याच प्रगत देशांमध्ये आता महिला लग्न न करणे म्हणजेच सिंगल स्टेटसला प्राधान्य देणाऱ्या दिसून येतात. मॉर्गन स्टॅन्ली यांनी दिलेल्या अहवालानुसार, जगभरातील महिला पारंपरिक कौटुंबिक जबाबदाऱ्यांपेक्षा करीअरला प्राधान्य देत आहेत. भारत देशदेखील याला अपवाद ठरणार नाही, असे दिसते. आता लग्नाचे वय २६ ते ३२ वर गेले आहे. बऱ्याच ठिकाणी महिला या घराचा आधारस्तंभ बनल्या आहेत, त्यामुळे स्वतंत्र राहणे आणि निर्णय घेणे शक्य होते. बऱ्याच ठिकाणी लग्न केले तर नो चाईल्ड ही संकल्पना पण पुढे येते आहे. सर्वांगीण विकास करणे, स्वावलंबी होणे या गोष्टी पूरकच आहेत. परंतु, कुटुंब न विस्तरल्यामुळे भविष्यात अनेक समस्या येऊ शकतात. लग्न करून जोडीदाराच्या संमतीने, सामंजस्याने कामाची विभागणी केली आणि मुलांचे संगोपन केल्यास निसर्गाचा समतोल राखता येईल.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

●● ●●

### ज्येष्ठ नागरिकांकडे दुर्लक्ष का ?

ज्येष्ठ नागरिकांचा समज झाला आहे की, केंद्रातील लोकशाही आघाडीचे सरकार आणि महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार त्यांच्यावर अन्याय करीत आहे. त्यांचा हा समज अगदीच खोटा आहे असे म्हणता येणार नाही. विशेषतः ज्या ज्येष्ठ नागरिकांना ईपीएस-९५ अंतर्गत पेन्शन मिळते अशा लाखो नागरिकांची हीच धारणा झाली आहे. विद्यमान केंद्र सरकारने सप्टेंबर २०१४ पासून न्यूनतम पेन्शन रुपये १००० प्रती माह देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेताना या अल्प पेन्शनमध्ये किमान दोन माणसांचे तरी पोट भरू शकेल काय याचा विचार गरिबांचे संरक्षक म्हणविणाऱ्या केंद्र सरकारने करायला हवा होता. यावर सरकारचे म्हणणे आहे की, हा



निर्णय तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंह यांच्या कार्यकाळात घेतला होता. आम्ही फक्त तो निर्णय राबवला. तसे असेलही कदाचित. पण गत १० वर्षांपासून मोदींचे सरकार आहे. तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. पेन्शनमध्ये वाढ करावी अशी मागणी अनेक वर्षांपासून सतत होत आहे. पण त्या मागणीकडे सतत दुर्लक्ष होत आहे. केवळ एक हजार पेन्शन दरमहा प्राप्त करणाऱ्यांची संख्या २० लाख आहे. ते सर्व मतदार आहेत. आणि बहुतांशी पेन्शनधारकांचे सरासरी वय ७० आहे. अशा परिस्थितीत आपले उर्वरित आयुष्य सुखी समाधानी असावे अशी इच्छा मनी बाळगणे चुकीचे आहे का?

केंद्र सरकार ८० कोटी जनतेला मोफत धान्य देते, शेतकऱ्यांना आर्थिक मदत करते. नुकतीच केंद्रीय कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजने अंतर्गत निवृत्तीच्या दिवशी जो सरासरी पगार असेल त्याच्या ५० टक्के पेन्शन एप्रिल २०२५ पासून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. पण ईपीएस-९५ अंतर्गत मिळणाऱ्या अल्प पेन्शनमध्ये वाढ का होत नाही हे न उलगडणारे कोडे आहे. केंद्र सरकारने हे कोडे सोडवावे आणि किमान दोन वृद्ध माणसांचे पोट भरू शकेल एवढी पेन्शनमध्ये वाढ करावी ही माफक अपेक्षा आहे.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

●● ●●

### अति सर्वत्र वर्ज्यते

सध्या तरुणांमध्ये सिक्स पॅक ॲपचे भलतेच आकर्षण आहे. या आकर्षणातून बॉडी बिल्डिंगचे वेड तरुणांना लागले आहे. आजच्या धावपळीच्या युगात खाण्याच्या सवयींमध्येही बदल झालाय, त्यामुळे सुदृढ शरीरासाठी दररोज व्यायाम गरजेचा आहे. त्यासाठी काहीजण सकाळ, संध्याकाळ जिममध्ये घाम गाळताना दिसतात. निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी व्यायाम गरजेचाच आहे; पण हे करताना प्रत्येकाने आपल्या प्रकृतीचा देखील विचार करायला हवा. तसे न करता कमी कालावधीत सिक्स पॅक व पीळदार शरीरयष्टी कमाविण्यासाठी तरुण व्यायामाचा अतिरेक करतात. अति व्यायामदेखील शरीराला घातक आहे. अति व्यायाम केल्याने त्याचा दुष्परिणामही होऊ शकतो. इतका की तो जीवावरही बेतू शकतो. अति व्यायाम व अति वजन उचलणे शरीराला घातक आहे. हे पथ्य पाळून तरुणांनी व्यायाम केला तर, त्याचा लाभ आयुष्यभर होऊ शकतो. 'अति सर्वत्र वर्ज्यते' याचे भान तरुणांनी बाळगावे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संक्षिप्त वृत्त



### एमआर ग्रुप मंडळाच्या शिबिरात ३० जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील जेऊरवाडी येथील एमआर ग्रुप गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सव आणि कै. मोतीराम राठोड यांच्या पुण्यस्मरणानिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सहभागी ३० रक्तदात्यांना पाणी जार देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सभापती महिबूब मुल्ला होते. रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन मल्लिकार्जुन पाटील यांच्या हस्ते झाले. मंडळाच्या वतीने अनेक समजोपयोगी उपक्रम राबवून समजसमोर एक वेगळा आदर्श निर्माण केले जात असल्याचे मल्लिकार्जुन पाटील यांनी सांगितले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष ब्रह्मदेव राठोड, उपाध्यक्ष प्रशांत राठोड, जेऊरवाडीचे सरपंच कमला राठोड, उपसरपंच वैशाली भालेराव, समाजसेवक देविदाड राठोड, शिवाजी राठोड, पंडित राठोड, समाजसेवक गोविंद चव्हाण, संस्थापक हिरालाल राठोड, जेऊरवाडीचे सदस्य रोहित भालेराव, सदस्य मीना जाधव, सदस्य तारुसिंग राठोड,पोलीस पाटील विजय चव्हाण, समाजसेवक धोंडीराम राठोड, विश्वनाथ चव्हाण, संदीप राठोड, दिवसिंग जाधव, समाजसेवक रामेश्वर राठोड, हिराबाई राठोड, अक्षय राठोड, अजित राठोड, विजय राठोड उपस्थित होते.



### सर्वोत्कृष्ट आरोग्यसेवा प्रदान करणारे पद्मिनी नर्सिंग होम : डॉ. राजपूत

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

पद्मिनी नर्सिंग होम हे एक अत्याधुनिक सेवा देणारे व कमी खर्चात सर्वोत्कृष्ट आरोग्यसेवा प्रदान करणारे हॉस्पिटल आहे. येथे असणारी डॉक्टरांची टीम ही सामाजिक बांधिलकी जपणारी आणि पूर्णपणे समर्पण देऊन काम करणारी म्हणून ओळखली जाते. नवीन आलेली लेझर उपचार पद्धती यामध्ये लेझर किरणांचा मारा केल्यामुळे मूळव्याध जाळून नष्ट होते. सध्या हीच उपचारपद्धती जास्त प्रभावी ठरत आहे. यामध्ये कुठलीही चिरफाड केली जात नाही आणि टाकाही घातला जात नाही. यामध्ये कुठलाही त्रास न होता त्याजागी परत मुळव्याध होत नाही. ही प्रक्रिया रुग्णासाठी वरदान ठरत आहे, अशी माहिती लेझर युनिटचे प्रमूख तसेच अनोरेक्टल सर्जन डॉ. विश्वजीत राजपूत यांनी दिली. त्यासाठीच अत्यंत प्रगत तसेच अत्याधुनिक लेझर मशीनचे पद्मिनी नर्सिंग होम येथे स्थापना डॉ. अनिल आणि प्राची हुलसुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी डॉ. विदर्शना, डॉ. नितीन, डॉ. माधुरी, राहुल यमगार, अनिल नारायणकर, पदमाकर, अनिता सिस्टर, गुड्डी सिस्टर, तसेच सर्व नर्सिंग स्टाफ आणि प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर दयानंद उपस्थित होते.

## निधन वृत्त

### भगवानदास सिद्धूल



**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सोलापूर येथे वास्तव्यास राहिलेले भगवानदास राम चंद्रप्पा सिद्धूल (वय ८६) यांचे शनिवार, १४ सप्टेंबर रोजी पुणे येथील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात लहान बंधू, मुलगा, सून, तीन मुली, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. रविवारी वाघोली, पुणे येथील स्मशानभूमीमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले.स्वामीदास सिद्धुल यांचे मोठे बंधू होत.

### बालाजी नंदाल



**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

भद्रावती पेठ येथील रहिवासी बालाजी भुमय्या नंदाल (वय ७२) यांचे रविवार, दि. १५ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातू, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा सोमवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता निघणार आहे. पद्मा फोटो स्टुडिओचे मालक नागेश नंदाल यांचे ते वडील होत.

# सोलापुरात तृतीयपंथीयांचे अधिवेशन

**● ब्रिजमोहन फोफलिया यांचा पुढाकार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**



सोलापूरात पहिल्यांदाच तृतीयपंथीचे अधिवेशन भरवण्यात येणार आहे. याबाबत नियोजन करण्यात आले. यासाठी सामाजिक कार्यकर्ते ब्रिजमोहन फोफलिया व पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांनी पुढाकार घेतला आहे. यासंबधी बैठक नांदेडच्या महाराष्ट्राची निवडणूक ॲम्बेसिटर म्हणून ओळख असलेली सप्तरंग सेवाभावी संस्थाच्या अध्यक्षा डॉ. सानिया यांच्या सोबत झाली. या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय यावेळी घेण्यात आले.

थोड्याच दिवसात तृतीयपंथी अधिवेशन ब्रिजधाम सोरेगांव येथे घेण्यात येणार आहे. सोलापूरात प्रथमत: होणाऱ्या तृतीयपंथीचे अधिवेशन घेण्यात येणार आहे. या अधिवेशनसाठी तृतीयपंथी यांची अधिवेशनासाठी सर्व राज्यातून हजारोंच्या संख्येने तृतीयपंथी या मेळाव्यासाठी हजर राहणार आहे. या अधिवशनामध्ये तृतीयपंथी च्या विषयी महत्वपूर्ण घेण्यात येणार आहेत. यामध्ये मोठे पदवीधर किन्नर देखील या अधिवेशनामध्ये हजेरी लावणार आहेत. या अधिवशनामध्ये किन्नरांच्या भविष्यासाठी काय उपाय योजना करता येईल या विषयी महत्वपूर्ण चर्चा डॉ. सानिया यांच्या सोबत ब्रिजमोहन फोफलिया यांनी केली.

या अधिवेशनामध्ये बाहेरच्या राज्यातून किन्नर या अधिवशनासाठी हजेरी लावणार असून त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे. या अधिवेशनामध्ये सहभागी झाल्यानंतर किन्नरांना शिक्षण घेता यावे त्यांना उद्योग मिळावा म्हणून पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर व सोरेगांव येथील ब्रिजधामचे ब्रिजमोहन फोफलिया यांच्या सोबत डॉ.सानिया यांनी चर्चा केली. त्यानुसार पुढील कांही दिवसात सोलापूरमध्ये मोठ्या प्रमाणात अधिवेशन घेवून तृतीयपंथी यांना उद्योग व शिक्षण कसे मिळेल यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. या बैठकीनंतर सोलापूरी खादय पदार्थांचा आश्वाद घेण्यात आला. याप्रसंगी उद्योगपती श्रीकांत चाटला उपस्थित होते.

> अधिवेशनसाठी इतर राज्यातून तृतीयपंथी हजारोंच्या संख्येने हजर राहणार आहेत. अशी तृतीयपंथीचे अधिवेशन आतापर्यंत कुठेही झालेले नाही. हे महाराष्ट्रातील पहिले अधिवेशन सोलापूरात घेण्यात येणार आहे. आम्हाला पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांचे फार मोठे सहकार्य लाभले आहे. त्यांना घेण्यात येणाऱ्या मेळाव्याव्दारे त्यांना शिक्षण व उद्योग मिळावे. त्यांचा उदर्निर्वाह चालवा यासाठी प्रयत्न करण्यात येणारे आहे. झालेल्या बैठकीत सखोल चर्चा नांदेडच्या सप्तरंग सेवाभावी संस्थाच्या तृतीयपंथी अध्यक्षा डॉ. सानिया यांच्या सोबत करण्यात आली.
>
> **- ब्रिजमोहन फोफलिया,**
> अध्यक्ष,ब्रिजमोहन धाम ट्रस्ट, सोरेगांव

> मी नांदेड या ठिकाणी तृतीयपंथसाठी सप्तरंग सेवाभावी संस्था अध्यक्ष म्हणून कित्येक वर्षापासून तृतीयपंथासाठी कार्य करीत आहे. या सामाजिक कार्यातून कित्येक तृतीयपंथी यांना संस्थेच्या माध्यमातून उपजिविका दिली आहे. या संस्थे मार्फत अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात आलेले आहेत. मी कित्येक किन्नरांना शास्त्रीय संगितांचे धडे दिलेले आहे. महाराष्ट्रात किन्नरांसाठी आश्रमांची उभारणी करणार आहे. लवकरच सोलापूरात ब्रिजमोहन फोफलिया व व पुण्यशोल्क अहिल्यादेवी होळकर विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या मदतीने तृतीयपंथीची अधिवेशन भरविण्यात येणार आहे.
>
> **- डॉ. सानिया, अध्यक्ष,**
> सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड

## अक्कलकोट येथील गणेश पंचायतन मंदिरातील उजव्या व डाव्या सोडेंचे गणपती

**तभा वृत्तसेवा । ॲड. विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

अक्कलकोट येथील जुन्या राजवाडा परिसरात श्री गणेश पंचायतन मंदिर समूह आहे. या मंदिराच्या चार दिशेस शिवपार्वती, सूर्यदेव, विष्णू, जगदंबा देवी यांच्या लहान पण सुबक मूर्ती छोट्या मंदिरात स्थापन करण्यात आल्या आहेत. म्हणूनच या मंदिरास श्री गणेश पंचायत असे म्हणतात.







मंदिराच्या मुख्य गर्भगृहात काळा कुळकुळीत दगडात साकारलेली सुंदर गणेशाची रेखीव मूर्ती आहे. हा गणेश उच्च आसनावर विराजमान झालेला आहे. हे आसन दगडी असून उंच आहे.आसनावर देखील सुबक नक्षीकाम आहे.गणपतीची मूर्ती चतुर्भुज असून गणपतीच्या एका हातात अंकुश तर दुसऱ्या हातात पाश तर तिसऱ्या हातात मोदक आहे. चवथ्या हातात गणपतीचा स्वदंत आहे.गणपतीच्या पाठीमागे सुंदर नक्षीकाम केलेली प्रभावळ आहे.याच प्रभावळीच्या वरील बाजूस देखणे कीर्ती मुख आहे .गणपतीच्या शेजारी आणखीन एक लहान गणपती आहे. तो उजव्या सोंडेचा आहे. गणपतीची ही मूर्ती देखील रेखीव आहे मूर्तीतील गणेशाने स्पष्टपणे आपली सोंड उजव्या दिशेस फिरविलेली आहे त्यामुळे एकाच मंदिरात उजव्या व डाव्या सोडेंच्या गणपतीचे दर्शन घेण्याचे भाग्य फक्त येथेच घडते. त्यामुळे या मंदिरास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मंदिराच्या अगदी समोरील प्रांगणात उघड्यावर एक भला मोठा आकाराचा उंदीर मामा आहे. त्याने आपल्या दोन्ही हातात लाडू पकडला आहे. तो लाडू खाण्यात दंग आहे. या मंदिराचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे अक्कलकोट नरेश श्रीमंत मालोजीराजे भोसले व श्री स्वामी समर्थ महाराजांची पहिली भेट याच गणेश पंचायत मंदिरात झाली होती. त्यामुळे मंदिरास ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्याचे भाग्य लाभले. गणेश पंचायत मंदिरात अक्कलकोट नरेश मालोजीराजे भोसले दुसरे यांना स्वामी समर्थ महाराजांनी आपल्या हातातील सूर्यमणी दिला. नुकताच हा सूर्यमणी गुरूपोर्णिमेच्या दिवशी सध्याचे अक्कलकोट नरेश श्रीमंत मालोजीराजे तिसरे भोसले यांनी भाविकांच्या दर्शनासाठी गणेश पंचायतन मंदिरात ठेवला होता. सूर्यमणी दरवर्षी गुरुपौर्णिमेच्या दिवशी भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्याचा मालोजीराजे यांचा मनोदय आहे.असे अनेक प्रसंग गणेश पंचायतन मंदिरातील गणेशान आपल्या डोळ्यांनी पाहीले आहेत. तशी अनुभूती भाविक भक्तांना देखील येत आहे.

## २२ सप्टेंबर २०२४ ला दिवस अन् रात्र समान

**नेहमीच दिवस व रात्र यांचा कालावधी असमान असतो**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर -**

गोलार्ध पृथ्वीपासून समान अंतरावर राहात असल्यामुळे नेहमीच पृथ्वीवरील दिवस व रात्र यांचा कालावधी असमान असतो. मात्र २२ सप्टेंबर २०२४ ला हा कालावधी प्रत्येकी १२ तासांचा राहील. या दिवशी दोन्ही गोलार्ध पृथ्वीपासून समान अंतरावर राहणार असल्याचे खगोल तज्ज्ञांनी सांगितले.

पृथ्वीवर दर वर्षाला २१ मार्च व २२ सप्टेंबर या दिवशी दिवस व रात्र प्रत्योकी १२ तासांचे म्हणजेच समान असतात. या विशेष तारखांना खगोल शास्त्रात विषुवदिन म्हणतात. इतर वेळी दिवस व रात्र नेहमीच लहान-मोठे असतात. दिवस व रात्रीची असमानता ही पृथ्वीच्या आसाच्या कलन्यामुळे निर्माण होते. पृथ्वीचा अक्ष हा २३.६ अंशाने कललेला आहे.

जो गोलार्ध सूर्याकडे कलतो, त्या गोलार्धात दिवस १२ तासापेक्षा मोठा व रात्र १२ तासापेक्षा लहान असते. जेव्हा कोणताही गोलार्ध सूर्याकडे कललेला नसतो, तेव्हा पृथ्वीवर दिवस व रात्र समान असतात. पृथ्वीच्या परांचल गतीमुळे या दिवसात थोडाफार फरक पडू शकत असल्याचे खगोल अभ्यासकांनी सांगितले.

खगोलप्रेमींनी व भूगोलाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी २२ सप्टेंबर २०२४ या दिवशी दिवस व रात्रीचे प्रत्यक्ष काल मापन करावे व दिवसाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषदेच्यावतीने करण्यात आले आहे.

> **प्रकाशवृत्त उत्तर, दक्षिण ध्रुवातून जाणार**
> या दोन्ही दिवशी दोन्ही गोलार्ध पृथ्वीपासून समसमान अंतरावर असतात व प्रकाश वृत्त उत्तर, दक्षिण ध्रुवातून जाते. म्हणून २१ मार्च व २२ सप्टेंबरला दिवस व रात्र समसमान असतात. आकाशात वैषुविक व आयनिक वृत्तांचे दोन काल्पनिक छेदनबिंदू आहेत. त्यापैकी एकातून २१ मार्च रोजी सूर्य प्रवेश करतो त्याला वसंत संपात बिंदू म्हणतात तर त्याच्या विरुद्ध बिंदूत २२ सप्टेंबर २०२४ ला सूर्य प्रवेश करतो, त्याला शरद संपात बिंदू म्हणतात.

# जि.प.च्या कारभाराचा अभियंत्यांना फटका

**● अभियत्यांच्या खेळाला सुशिक्षित बेरोजगार अभियंते वैतागले**
**● ९१ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना ठेकेदारीचे प्रमाणपत्रच नाही दिले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग एकच्यावतीने सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काम घेण्यासाठी ठेकेदार असल्याचे प्रमाणपत्र दिले जाते. मात्र त्या अभियंत्यांच्या पदवी प्रमाणपत्रांची तपासणी करण्यासाठी ते विद्यापीठाकडे पाठविले जातात. त्याचे कारण देत ९१ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना ठेकेदारीचे प्रमाणपत्रच दिले नाही. बांधकाम विभाग क्रमांक एकच्या कार्यकारी अभियंत्यांनी सुरू केलेल्या या खेळाला सुशिक्षित बेरोजगार अभियंते वैतागले आहेत. एका अभियंत्यांकडून दुसऱ्या अभियंत्यांना त्रास देण्याचा प्रकार जिल्हा परिषदेत सुरू आहे.

शासनाच्या जीआरनुसार अडीच कोटी, पाच कोटी, साडेसात कोटींच्या कामांसाठी काढण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रासाठी संबंधित अभियंत्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांची तपासणी विद्यापीठाकडून करुन घेणे अपेक्षित आहे. मात्र बांधकाम विभाग एककडून किरकोळ कामे घेणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना विनाकारण त्रास देण्याची भूमिका घेतली आहे.

त्यामुळे नवख्या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. बांधकाम विभाग एककडे आतापर्यंत सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांचे २६३ प्रस्ताव आले आहेत. त्यातील ६५ जणांना प्रमाणपत्र दिले आहे, तर १०७ प्रस्ताव विविध टेबलवर आहेत. दरम्यान, अभियंत्यांचे पदवी प्रमाणपत्र तपासणीसाठी विद्यापीठाकडे पाठविल्यानंतर जवळपास दोन महिन्यांचा कालावधी जातो. याशिवाय दोन-तीन हजार रुपयांचा खर्चही होत आहे.





- सुशिक्षित बेरोजगार आलेले प्रस्ताव - २६३
- विविध टेबलवर असलेले प्रस्ताव - १०७
- सुशिक्षित बेरोजगारांना दिलेली प्रमाणपत्रे - ६५
- प्रलंबित प्रस्ताव - ९१

- अभियंत्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांची तपासणी घेणे अपेक्षित
- सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांचे २६३ प्रस्ताव
- ६५ जणांना प्रमाणपत्र दिले आहे, तर १०७ प्रस्ताव विविध टेबलवर
- सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना विनाकारण होतोय त्रास
- सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना प्रमाणपत्र देताना पदवीची तपासणी



> सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांचे २५० पेक्षा जास्त प्रस्ताव आले आहेत. त्यातील बऱ्याच लोकांना प्रमाणपत्र दिले आहे. अभियंत्यांची पदवी प्रमाणपत्र बनावट आहे की नाही. यासाठी त्यांच्या प्रमाणपत्राची चौकशी विद्यापीठाकडून केली जाईल.
>
> **- नरेंद्र खराडे,** कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग एक



## महाराष्ट्र विद्यालयातील खेळाडूंची बुद्धिबळ व स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ सप्टेंबर-**

शालेय जिल्हा बुद्धिबळ व स्केटिंग स्पर्धेतून महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सान्वी गोरे, प्रज्ज्वल शिंदे व प्रसन्न जगदाळे या तिघांची बुद्धिबळमध्ये तर हर्ष बेणारे, रेणुका गायकवाड व लकी पायघन स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली.

शहर स्केटिंग स्पर्धेत हर्षने प्रथम बेणारे, रेणुकाने द्वितीय व लकीने तृतीय स्थान मिळविले. या कामगिरीवर त्यांची विभागीय स्तरासाठी निवड झाली आहे. सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक पी.डी. पाटील, योगेश उपळकर, विकास पाटील, अतुल नलगे यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व्ही.एस.पाटील, बी.के.भालके, प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# चमकदारी कामगिरी करणाऱ्या कामगार खेळाडूंना वेतनवाढ

**● कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. कुलकर्णी यांची घोषणा**



**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. १५ सप्टेंबर-**

क्रीडा महोत्सवात सहभाग घेतलेल्या कामगारांनी चांगला खेळ करून स्पर्धा आयोजित करण्याचा खिलाडूवृत्ती व शारीरीक सुदृढता वाढवी हा उद्देश सफल केला. परंतू यापुढे राज्य व देश पातळीवर स्पर्धांसाठी कारखाना संघ पाठवणार आहे.

त्यासाठी जास्तीत जास्त संख्येने कामगारांनी नियमित सराव करावा स्पर्धातून चकमदार कामगिरी करणाऱ्या खेळांडूना अधिकची वेतनवाढ देण्यात येणार आहे, अशी घोषणा कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केली. कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत कारखाना स्थळावर प्रशांतराव परिचारक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्याच्या बक्षिस वितरण समारंभात डॉ . कुलकर्णी बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष कैलास खुळे, संचालक दिनकरभाऊ मोरे, दिलिपराव चव्हाण, तानाजी वाघमोडे, बाळासाहेब यलमार , भैरु वाघमारे, दाजी पाटील, स्पर्धा समिती अध्यक्ष सचिन विभूते, डॉ. सुधिर पोफळे, एम. आर. कुलकर्णी, मुख्य लेखापाल रविंद्र काकडे, मुख्य शेती अधिकारी कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, मुख्य अभियंते अमोल बारटक्के, स्थापत्य अभियंता हणमंत नागणे, सेक्रेटरी भिमराव बाबर, कामगार प्रतिनिधी विजय पाटील, अनंत जाधव आदी उपस्थित होते .

विविध स्पर्धेचे अंतिम **निकाल ( प्रथम, द्वितीय ) :** क्रिक्रेट : डॉ . सुधिर पोफळे यांचा रॉयल चॅलेंजर्स, मारूती उपासे यांच्या सनरायझर्स संघ. आट्यापाट्या : उत्पादन विभाग, इंजिनिअर्स अ संघ. व्हॉलीबॉल : एम.डी. सेव्हन स्टार, इंजिनिअर विभाग. रस्सीखेच : बॉयलर इंजिनिअर, इन्स्ट्रमेंन्ट. बॅडमिंटन : डॉक्टर असोसिएशन (गणेश कुलकर्णी , कल्याण रजपूत), डॉ. पराडे पाटील , संजय पाठक. बॅडमिंटन : सचिन विभूते, दादासाहेब मोरे , व्दितीय सचिन भोसले , अजिम मुलाणी. कॅरम : डॉ . प्रमोद पवार व बाळु काटे, अनंत कुलकर्णी व ओम पवार. बुद्धीबळ : रमेश महाडीक, सचिन भोसले

## दुधनीच्या परमशेट्टी प्रशालेची तालुका खो-खो, कबड्डी, मैदानी स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१५ सप्टेंबर -**

येथील फतेसिंह मैदानावर झालेल्या तालुका क्रीडा स्पर्धेत दुधनी येथील एस जी परमशेट्टी प्रशालेतील खेळाडूने उत्कृष्ट कामगिरी करत मैदानी व सांघिक खेळात उत्कृष्ट यश संपादन केले.

सर्व खेळाडूंना क्रीडा प्रमुख दत्तात्रय हिळळी, नागराज कलबुर्गी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष परमपूज्य जयगुरुशांत लिंगाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, उपाध्यक्ष महांतेश देसाई, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सातलिंगप्पा परमशेट्टी, राजशेखर गाडी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा राखी खंडाळ, उपाध्यक्ष प्रभावती हौदे, मंजुश्री येगदी, अश्विनी येगदी, सुजाता शिवयोगी, ठक्का सुजाता, विजयकुमार ठक्का, सुनीता राठोड,



सुशिलाबाई राठोड, मल्लिनाथ कोटनूर, वाजिद खैराट, मुख्याध्यापक रेवणसिद्ध आलिगावे. पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी आदींनी अभिनंदन केले

कामगिरी : खो खो : १७ वयोगट मुले व १४ वयोगट मुली विजेते, १७ वयोगट मुली उपविजेते. कबडडी : १७ वयोगट मुली विजेता, १४ वयोगट मुली उपविजेता, १४ वयोगट मुले तृतीय. मैदानी : १७ वयोगट : लक्ष्मी सोबान (१००, २०० मीटर धावणे व १०० मीटर अडथळा, प्रथम) पायल राठोड (८००, ४०० मीटर धावणे व रिलेत प्रथम). गुरुशांत पावली (८०० मीटर धावणे प्रथम, ४०० मीटर धावणे द्वितीय). मुले रिलेत प्रथम (शुभम नुला, गुरुशांत पावली, अब्बास खैराट, राकेश राठोड). राकेश राठोड (११० मीटर अडथळा प्रथम). कोमल पुजारी (द्वितीय). १४ वयोगट : शुभांगी नुला (४०० मीटर व सहाशे मीटर धावणे प्रथम), पूजा राठोड (हर्डल्स मध्ये प्रथम) वैष्णवी कोटनूर (१०० मीटर धावणे द्वितीय, रिलेत प्रथम). रिले प्रथम (लक्ष्मी कण्णी, शुभांगी नुला, पुजा राठोड, श्रावणी कांबळे).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### स्वामी विवेकानंद प्रशालेची निशा लिंबोळे प्रथम, भावना चाटला द्वितीय

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सोलापूर शहर, जिल्हा अॅथलेटिक असोसिएशनच्या वतीने एस.आर.पी.एफ. ग्राऊंड सोरेगाव येथे झालेल्या जिल्हा मैदानी स्पर्धेत एमआयडीसी येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या निशा लिंबोळे हिने १६ वर्षाखालील मुलींच्या गटात भालाफेक क्रीडा प्रकारात प्रथम व भावना चाटला हिने द्वितीय क्रमांक पटकावला. या कामगिरीवर त्यांची पुणे येथे होणाऱ्या राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक सुभाष माने, गणपती कोळी, खंडू शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, उपाध्यक्ष अनुगीता पवार, जनरल सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार, मुख्याध्यापिका सीमा श्रीगोंदेकर यांनी अभिनंदन केले.



### लोकमंगल पतसंस्थेतर्फे खो-खो प्रशिक्षका प्रीती काळे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

लोकमंगल नागरी पतसंस्था अवंती नगर शाखेच्या वतीने गणेशोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य महिला खोखो संघाच्या प्रशिक्षकपदी निवड झाल्याबद्दल प्रीती काळे हिचा सत्कार कल्याणशेट्टी महाविद्यालय अक्कलकोटचे प्राचार्य डॉ राजेंद्र सिंह लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रीती ही लोकमंगल पतसंस्थेचे वसुली अधिकारी संतोष काळे यांची पुतणी आहे. आपल्याच पतसंस्थेतील कुटुंबीयांच्या सदस्यांचा सत्कार करून पतसंस्थेने आदर्श घालून दिला आहे, असे यावेळी प्राचार्य लोखंडे म्हणाले याप्रसंगी लोकमंगल पतसंस्थेच्या विभागीय अधिकारी मेहबूबी शेख, अवंती नगर शाखेचे शाखाधिकारी गोरख राठोड, संतोष काळे व खातेदार उपस्थित होते.



### राज स्कूलच्या अदित्य, मधुरा माळी यांची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या शहर तलवारबाजी स्पर्धेत राज मेमोरियल स्कूलच्या १४ वर्षाखालील गटात आदित्य संतोष माळी याने ईपी या प्रकारात तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटात मधुरा संतोष माळी हिने सेबर या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला आहे. या कामगिरीवर त्यांची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना मुख्य प्रशिक्षक पवन भोसले, क्रीडाशिक्षक अतुल सोनके राज दसाडे, आशुतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्था अध्यक्ष महेश कोठे, डॉ. राधिकाताई चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्राध्यापक विलास बेत, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी अभिनंदन केले.



### संगमेश्वर कॉलेजची तलवारबाजी स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि, १५ सप्टेंबर-**

शालेय शहर तलवारबाजी स्पर्धेत संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी कामगिरी केली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रा.प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले

**कामगिरी :** सेबर : समृद्धी घाळे (प्रथम), श्रुतिका चव्हाण (द्वितीय), श्रेयश तळभंडारे (प्रथम), व्यंकटेश खंडेलवाल (द्वितीय), फॉईल : सुमित जाधव (प्रथम).

# धाराशिवला राज्य किशोर, किशोरी चाचणीस सुरुवात

**राज्यातून १३६ खेळाडूंचा सहभाग**



**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. १५ सप्टेंबर -**

३४ व्या किशोर व किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेकरिता मैदान निवड चाचणी धाराशिव येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मैदानावर सुरु झाली. या चाचणीत राज्यातील विविध जिल्ह्यातून ६० किशोर व ७६ किशोरी असे १३६ खेळाडूंनी भाग घेतला आहे. यातून भारतीय खो खो महासंघाच्या वतीने ३४ व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे किशोर व किशोरी संघ निवडण्यात येणार आहेत. राष्ट्रीय स्पर्धा २८ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर दरम्यान झारखंड येथे होणार आहेत. राष्ट्रीय स्पर्धेबरोबर वडोदरा, गुजरात येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय खेलो इंडिया महिला लीग करिता किशोरी संघ असे किशोरीचे दोन संघ निवडण्यात येणार आहेत. अमोल मुटकुळे (हिंगोली), विशाल पाटील (जळगाव), राजाराम शितोळे (सोलापूर) व वर्षा कछवा (बीड) हे निवड समिती सदस्य हे महाराष्ट्राचे संघ निवडणार आहेत. किशोर व किशोर संघाचे सराव शिबिर मुंबई येथे १८ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे. महाराष्ट्र खो खो संघटनेचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव यांच्या हस्ते मैदानाचे पूजन करून चाचणीस सुरुवात झाली. यावेळी यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे चेअरमन सचिन गोडबोले, खजिनदार अॅड. गोविंद शर्मा, माजी सचिव संदीप तावडे, सहसचिव डॉ. पवन पाटील, डॉ. राजेश सोनवणे, कार्यालयीन सचिव डॉ. प्रशांत इनामदार, धाराशिव जिल्हा खोखो संघटनेचे सचिव प्रवीण बागल आदी उपस्थित होते.

## राज्य मैदानी स्पर्धेत एखतपूरच्या अमोल अमुनेची दोन पदकांची कमाई

**१० हजारमध्ये सुवर्ण, ५ हजारमध्ये रौप्य**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

राज्य ज्युनियर मैदानी स्पर्धेत एखतपूर (ता. सांगोला) येथील अमोल अमुने याने २३ वर्षांखालील गटात एक सुवर्ण व एक रौप्य पदकांची कमाई केली.

रिलायन्स स्पोर्ट्स फाउंडेशन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स वुलवे रायगड येथे सुरू असलेल्या स्पर्धेत अमोल याने १० हजार मीटर धावणे स्पर्धेमध्ये सुवर्ण तर ५ हजार मीटर धावणे स्पर्धेमध्ये रौप्य प्राप्त करी दुहेरी मुकुटाचा मान मिळवला. अमोल हा उमा महाविद्यालय पंढरपूरमध्ये शिक्षण घेत असुन आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक चेतन धनवडे यांचे मार्गदर्शनाखाली



त्याने पंढरपूर व पूणे येथे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सराव करून यश संपादन केले आहे. सोलापूर जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुरेश पवार, सचिव राजू प्याटी सहसचिव सुरेश भोसले व अजिंक्य स्पोर्ट्स क्लब पंढरपूरचे आमदार प्रशांत परीचारक व अध्यक्ष सुभाष मस्के यांनी अभिनंदन केले.



## सोलापूर मुलींच्या क्रिकेट संघाची हॅटट्रिक

**परभणीवर मात, सुपर लीग मध्ये प्रवेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

पुणे येथे चालू असलेल्या १५ वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत सोलापूर संघाने सलग तिसरा विजय मिळवित हॅटट्रिक केली आहे. यासह सोलापूरने अव्वल स्थानी येऊन सुपर लीग स्पर्धेत प्रवेश केला आहे. शेवटच्या साखळी सामन्यात सोलापूरने परभणीवर ६ धावांनी मात केली.

प्रथम फलंदाजी करताना सोलापूर संघाने १२१ धावा केल्या. यात स्नेहल शिंदे (२३) आर्णा इराबत्ती (१३) प्राची कुमार (१३), प्रतीक्षा नंदर्गी (१४) यांनी खेळी केली. विजया पाठलाग करताना परभणी संघास ११६ धावा करता आल्या. सोलापूरकडून संचिता सपाटे ३ गडी बाद केले.

## आंतरशालेय ज्युदो स्पर्धेत आयएमएसची रिया जाधव अजिंक्य

**सोलापूर :** शालेय शहर ज्युदो स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात इंडियन मॉडेल स्कूलच्या (सी.बी.एस.ई) रिया जाधव हिने ५२ किलो वजनी गटात अजिंक्यपद पटकाविले. या कामगिरीवर तिची पुणे विभागीय



स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक सचिन ढवाण व राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# दिपक चिकणे आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

येथील धनुर्धर अकॅडमीचे प्रशिक्षक दिपक चिकणे चीनमध्ये होणाऱ्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून निवड झाली. त्यांनी घडविलेल्या साईराज हनमे याची या स्पर्धेसाठी निवड



झाली. त्यांचा हा पहिला आंतरराष्ट्रीय खेळाडू आहे. चकणे हे सोलापूर जिल्ह्यातील पाहिले प्रशिक्षक आहेत जे भारतीय संघाचे प्रशिक्षक म्हणून काम करीत आहेत. त्यांचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष खा. धैर्यशिल मोहिते पाटील, राज्य संघटना अध्यक्ष अॅड. प्रशांतजी देशपांडे, उपाध्यक्ष प्रा. हरिदास रणदिवे, राज्य संघटना सचिव प्रमोद चांदुरक, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, मनपा क्रीडाधिकारी श्रीकांत घोलप, अँकॅडमीचे मार्गदर्शक प्रा.संतोष गवळी, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक रणजित चामले, विद्यापीठ मॅनेजमेंट कॉउन्सलिंग सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**यांनी घडविलेले धनुर्धर**

२०१६ मध्ये सुरू केलेल्या दीपक चिकने यांनी शहरातून अनेक राज्य व राष्ट्रीय पदकप्राप्त धनुर्धर घडविले. ते खेळाडू श्रेया परदेशी, तनिष्का ठोकळ, जय जाधव, स्वरीत ढवण, मेघना वन्नम, आशिष काळे, अजय मुसळे, तनिष्का जाधव, आकांक्षा घुले, जय आमले, यश शिंदे, प्रगती शिंदे, विराज पवार, नील सुर्वे, दीप्ती कदम, कार्तिकी कदम, श्रियांश यलगुलवार (पदकप्राप्त राष्ट्रीय), नेताजी पवार, सोमनाथ मगर, मानवी शेळके, अक्षयकुमार काळे, रेवती शिंदे, प्रतीक्षा पारसे, सुधाकर पळसे, प्रणव कोळी (विद्यापीठ). तनिष्का ठोकळ (खेलो इंडिया सहभाग)

## गांधी नाथाच्या धंगेकर, कोळी यांची विभागीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**



शालेय शहर जिम्नॅस्टिक्स स्पर्धेतून गांधी नाथा रंगजी विद्यालयाच्या दोघांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. शहर स्पर्धेत साक्षी धंगेकर हिने १७ वर्षाखालील वयोगटात रिदमिक (जिम्नॅस्टिक्स) प्रकारात तृतीय व १९ वर्षाखालील वयोगटात तृप्ती कोळी हिने रिदमिक जिम्नॅस्टिक्स प्रकारात चोथा क्रमांक मिळविला. या विभागीय ते पात्र ठरले. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी मुख्याध्यापिका स्मिता पुरवत, सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले.

## जिल्हा मैदानी स्पर्धेत हिंदुस्थानी कॉलेजच्या माने यास दुहेरी मुकुट

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सोलापूर शहर जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने एस.आर.पी.एफ. ग्राऊंड सोरेगाव येथे झालेल्या जिल्हा मैदानी स्पर्धेत हिंदुस्तानी कॉन्व्हेंट ज्युनिअर कॉलेजचा अरुल माने याने थाळीफेक या क्रीडा प्रकारात प्रथम व २०० मीटर धावणेमध्ये द्वितीय स्थान पटकावले. त्याची या कामगिरीवर पुणे



येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली.त्यांना एनआयएस कोच सूर्याजी लिंगडे, क्रीडाशिक्षक बोनी अॅन्थोनी व सुहेल शेख यांचे मार्गदर्शन लाभले.त्याचे प्राचार्य एस्टर विनयकुमार, पर्यवेक्षक शीबा लाजरस यांनी अभिनंदन केले.



## शरीरसौष्ठव स्पर्धा : अकबर कुरेशी गणराज श्री २०२४ चा मानकरी

**सोलापूर दि. १५ सप्टेंबर-**

येथील अकबर कुरेशी हा उमरगा येथे झालेल्या गणराज श्री २०२४ या शरीरसौष्ठव स्पर्धेचा मानकरी ठरला. श्री गणराज गणेशोत्सव मंडळ आरोग्य नगर व लिमरा हेल्थ क्लब उमरगा यांच्या सौजन्याने आणि धाराशिव जिल्हा हौशी बॉडी बिल्डींग अॅन्ड फिटनेस असोसिएशन यांच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित केली होती.

या स्पर्धेत सोलापूरसह उमरगा व धाराशिव येथील ५५ खेळांडूनी भाग घेतला होता. चार वजनी गटातून प्रत्येक गटात ३ बक्षीसे ठेवण्यात आली होती. चारही गटातील प्रथम विजेत्यामध्ये झालेल्या स्पर्धेतून कुरेशी याला ''गणराज श्री २०२४ '' घोषित करण्यात आले. त्यास रोख रक्कम रुपये १० हजार, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभ बालाजी पाटील व किरण गायकवाड यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून येथील प्रमोद काटे, नजीर शेख, शकिल बडेघर व अजिम नदाम यांनी काम पाहिले. सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, अजित कंडरे, मनोज भागवत, गोरख गडसिंग, अल्ताफ सिद्दीकी व शफी शेतसंदी यांनी विजयी खेळांडूचे अभिनंदन केले.

# जिल्हा कबड्डी स्पर्धेत सांगोला तालुक्यातील शाळांचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

शालेय जिल्हा कबड्डी स्पर्धेत सांगोला तालुक्यातील शाळांनी वर्चस्व प्राप्त केले. १९ व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात न्यू इंग्लिश स्कूलने तर १४ वर्षांखालील गटात सांगोला विद्या मंदीरने विजेतेपद पटकाविले.



मुलींच्या गटात १४ वर्षे गटात कोर्टी करमाळाने, १७ वर्षे गटात वत्सलादेवी देसाई विद्यालय जवळाने (सांगोला) तर १९ वर्षे गटात सांगोलाने बाजी मारली.

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील मॅटवर या स्पर्धेचे उद्घाटन क्रीडाधिकारी सुनील धारूरकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी क्रीडाधिकारी सत्येन जाधव, महेश ढेंबरे, प्रशांत मस्के, नितीन चपळगावकर, सुनिल भोरे जिल्हा कबड्डी संघटनेचे पंच श्रीगणेश जाधव, भक्तराज जाधव, सुवर्णा कांबळे, गणी शेख, योगेश माने, बजरंग गायकवाड, रफिक गारे, नितीन गुंजे, धनराज जाधव, सुजित मोरे आदी उपस्थित होते.



## उदयसिंह मोहिते पाटील स्कूलची राज्य कराटे स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १४ सप्टेंबर-**

येथील उदयसिंह मोहिते पाटील इंग्लिश मिडियम स्कूलने पुणे येथे झालेल्या राज्य कराटे स्पर्धेत कामगिरी केली. त्यांचा प्रशालेचे प्राचार्य सुधीर पवार यांनी सत्कार केला. विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक गणेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मंगळवेढा मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे विश्वस्त डॉ. नंदकुमार शिंदे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. पुष्पांजली शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी :** प्रथमेश कोरे (काता, कांस्य), अबुसुफियान तांबोळी (काता, रौप्य), प्रतीक कांबळे (कुमीते, रौप्य), राजवीर घोडके (काता- कांस्य, कुमीते-सुवर्ण), आरोही खडतरे (काता-रौप्य, कुमीते-रौप्य), सोलेहा तांबोळी(काता, कांस्य), सकीना खतीब (काता-कास्य, कुमीते-कास्य).

# संगमेश्वर, शिवाजी, नवजीवन, भारती विद्यापीठ, ठोकळ प्रशालेचे वर्चस्व

**शालेय शहर ज्युदो स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

शालेय शहर ज्युदो स्पर्धेत छत्रपती शिवाजी, संगमेश्वर कनिष्ठ, नवजीवन, भारती विद्यापीठ व ठोकळ प्रशालेच्या खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले.

श्रीकृष्ण कुस्ती केंद्र येथे या स्पर्धेचे उद्घाटन असिस्टंट पोलिस इन्स्पेक्टर राष्ट्रीय ज्युदो खेळाडू अजित पाटील यांचे हस्ते झाले. यावेळी कुस्ती संघटनेचे सचिव भरत मेकाले, सिनेट सदस्य प्रा सचिन गायकवाड, काझी वस्ताद, प्रा संतोष खेंडे आदी उपस्थित होते. पंच म्हणून विनायक काळे, रहेमान मुनशी, नेताजी पवार, सोमनाथ मगर अमोल वाघमोडे , नितीन गोरे यांनी काम पाहिले. सर्व यशस्वी



खेळाडूंचे सोलापूर जिल्हा जुडो अकॅडमीच्या वतीने महापौर मनोहर सपाटे, प्रा. महेश माने, प्रा संतोष गवळी, अविनाश कवळस, फयाज मुंशी यांनी अभिनंदन केले.

**अंतिम निकाल(प्रथम, द्वितीय) : १४ वर्षे :** ४० : किलो :अजलान अली पटेल, विश्व घोरपडे. ४५ किलो : सुरज कदम, अरमान नदाफ. ५० किलो : उबेद उल्ला सय्यद, रोहन पटणे. ५० किलोवरील : हाफिज कुरेशी, कौस्तुभ जाधव

**१७ वर्षे :** ४० किलो : मशाद सुभेदार, फुरकान शेख वजा ४५ किलो: समर्थ गंभीरे, अथर्व चव्हाण. ५० किलो : अगणि शेख, अमझहर शेख. ५५ किलो : अली चीकडी, अथर्व केळवे, ६० किलो : सय्यद उजेड नसीर, अब्दुल रहमान सय्यद. ६६ किलो: चंदनशिवे हर्ष, आदर्श शिंदे. ७३ किलो : आयुष वाघमोड, साईनाथ धोत्रे. ८१ किलो आर्यन चव्हाण, अविनाश पल्लूर, ९० किलो : ध्रुव चव्हाण, आर्यन गायकवाड. ९० किलो वरील : सुजित काळे, ओम माने.

**१९ वर्षे :** ४० किलो : दक्ष कासेकर, समर्थ गायकवाड ४५ किलो : प्रथमेश कांबळे, वक्रतुंड सोनार. ५० किलो. करण पवार, श्रेयश मदने. ५५ किलो : आर्यन सांगी, आयान शेख.६० किलो : रविराज अनुभवले, भाग्य कोणापुरे. ६६ किलो : आदर्श मस्के, आदर्श कुप्पा. ७३ किलो : विनय माने, वैभव घंटे ८१ किलो : समर्थ केत, वीर राठोड. खुला गट : म जकवान काझी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### जैन गुरुकुलात गणेशोत्सव, पर्यूषण पर्व व्याख्यानमाला

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात गणेशोत्सव व पर्युषण पर्व व्याख्यानमाला मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यामध्ये प्रा. चेतन तुपकर, अनंत बळ्ळे, वृषभ सोनटक्के, प्रा. संदीप बोराळकर, प्रा. रविंद्र काळे यांनी उत्तम क्षमा, सत्य, त्याग, मार्दव, आर्जव, संयम आदी दशधर्मावर आधारित विचार मांडले. यावेळी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, व्याख्यानमाला समन्वयक विजयकुमार काळेगोरे, जितेंद्रकुमार डहाळे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले.सहशिक्षक विजयकुमार काळेगोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर इ. ६ वीतील विद्यार्थिनींनी णमोकार मंत्र सादर केले. तद्नंतर मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या हस्ते प्रमुख वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतातून मुख्याध्यापक राजकुमार काळे यांनी मनोगत व्यक्त केले. व्याख्यानावर आधारित प्रश्नमंजूषा स्पर्धा घेतली त्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद देत बक्षीसे मिळविली. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी सभा सांस्कृतिक विभाग प्रमुख मिलिंद खोबरे, जितेंद्रकुमार डहाळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सहशिक्षक विकास शिळ्ळे यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.



### जे. पी. फाउंडेशनतर्फे हिजामा कॅम्प

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

हजरत प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त जे. पी. सोशल फाउंडेशनच्या वतीने नई जिंदगी येथील शोभादेवी नगर येथे ही हिजामा कॅम्प आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन हाफिज नौशाद शेख यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक सल्लागार रियाज अत्तार यांनी केले. प्रमुख उपस्थिती म्हणून युथ प्राइड ग्रुपचे समीर शेख, हिजामा स्पेशलिस्ट डॉक्टर शकील अत्तार, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष ओबीसी सेलचे उपाध्यक्ष इरफान मैदर्गी, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष अजय मैंदर्गीकर, भीम आर्मीचे शहर उपाध्यक्ष सूरज गायकवाड, आदित्य गायकवाड, रिषभ बनसोडे, लबैक ग्रुपचे जहीर कुरेशी शकील शिकलगार, फाउंडेशनचे अध्यक्ष जाफर पटेल. खजिनदार अनिस शेख, सल्लागार रियाज अत्तार, सचिव जिलानी शेख, अमीन शेख, इरफान शेख नेता. अफरीदी पेरमपल्ली, इजराइल शेख, तबरेज सय्यद आदी उपस्थित होते.



### आरोग्य शिबिराचा ३०० नागरिकांना लाभ

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

उत्तर सदर बझार, प्रकाश व बापूजी सोसायटी येथे श्रीकृष्ण तरुण मंडळ, लेझीम संघाच्यावतीने आरोग्य शिबीराचे आयोजन केले होते. जांबमुनी मोची समाजाचे अध्यक्ष देवेंद्र भंडारे यांच्या हस्ते व करेप्पा जंगम यांच्या अध्यक्षाखाली भाजपाचे सरचिटणीस अनंत गोडलोलू यांच्या प्रमुख उपस्थिती होते. या भागातील ३०० नागरीकांना मोफत आरोग्य तपासणी करण्यात आले व त्यांना योग्य तो औषधपोचार देण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष हणमंतू सायबोळू, मंडळाचे अध्यक्ष राहूल म्हेत्रे, कार्याध्यक्ष नामदेव आरगोळू, नरसिंग वल्लापोलू, बाबू गायकवाड, मोहन गायकवाड, गणेश काडे, अजय दिड्डी, हणमंतू दिड्डी, नरसिंग गोपिरेड्डी, सायण्णा आरगोळू, अक्षय म्हेत्रे, शाम वलापोलू, अजंन म्हेत्रे, अक्षय वल्लापोलू व जांबमुनी मोची समाजाचे वाबय्या म्हेत्रे, सिद्राम म्हेत्रे, श्रीनिवास म्हेत्रे उपस्थित होते. आभार नामदेव आरगोळू यांनी मानले.



### जय भारत शाळेत शिक्षक दिन साजरा

**सोलापूर, दि.१४ सप्टेंबर-**

जय भारत प्राथमिक शाळेत शिक्षकदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत साबळे होते. तर प्रमुख पाहुणे सिद्राम फुले, दिपक फुले, नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन पूजा आरगोळ, नागेश दिड्डी यांनी आभार मानले.

# पद्मश्री डॉ. गरिकीपाटी नरसिंहारावांचे सोलापुरात प्रवचन

## अमृतवाणीतून धर्म, संस्कृती आणि जीवनशैलीवर करणार प्रबोधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सुप्रसिद्ध तेलुगू प्रवचनकार ब्रह्मश्री सहस्रावधानी पद्मश्री डॉ. गरिकीपाटी नरसिंहाराव यांची अमृतवाणी दि.२१ व २२ सप्टेंबरला सोलापुरात ऐकायला मिळणार आहे. ते धर्म, संस्कृती आणि जीवनशैलीवर प्रबोधन करणार आहेत, अशी माहिती फेडरेशन ऑफ तेलुगू असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र (एफटॅम) अंतर्गत गठीत सोलापूर आयोजन समितीचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम यांनी पत्रकार परिषदेत दिली.



हा कार्यक्रम शनिवार दि.२१ व रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी अक्कलकोट रोड एम आयडीसीतील पद्मावती कन्व्हेंशन्समध्ये होणार आहे. दररोज सायंकाळी ५:३० ते ८:३० ही प्रवचनाची वेळ राहणार आहे. या कार्यक्रमात डॉ. गरिकीपाटी नरसिंहाराव हे अध्यात्मिक विषयावर प्रवचन देण्याबरोबरच आधुनिक जीवनशैलीमुळे कुटुंब व्यवस्थेवर झालेले परिणाम व या संदर्भातील आवश्यक सुधारणा याविषयी भाष्य करत प्रबोधन करणार आहेत. सोलापुरात सुमारे दोनशे वर्षांपूर्वी आंध्रातून उदरनिर्वाहासाठी स्थायिक झालेल्या तेलगूजनांसाठी हे प्रवचन म्हणजे एक पर्वणी ठरणार आहे. श्रद्धा,अंधश्रद्धा, क्रियाशीलता, नवनिर्मिती, कौटुंबिक जबाबदारी, महिला सक्षमीकरण अशा अनेक मुद्द्यांवर डॉ. गरिकीपाटी नरसिंहाराव हे भाष्य करून प्रबोधनाचा प्रयत्न करणार आहेत. या प्रवचनाचा सोलापुरातील तेलुगूजनांनी श्रवणानंद घ्यावा,असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

सोलापुरातील त्यांच्या प्रवचनासाठी 'एफटॅम' सेंट्रल टीमचे जगनबाबू गंजी (मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवचनासाठी गठीत समितीचे पदाधिकारी असे - अध्यक्ष पेंटप्पा गड्डम , उपाध्यक्ष मुरलीधर अरकाल, कोषाध्यक्ष गणेश बुधारम, सहकोषाध्यक्ष श्रीधर म्याकल, सचिव भूपती कमटम, सहसचिव विजयकुमार उडता तर कमिटी सदस्य म्हणून रेणुका बुधारम, गंगाधर देवसानी, सत्यनारायण अडगटला, अंबादास बिंगी, नागनाथ बुरा, मल्लिकार्जुन कमटम, सत्यनारायण गुर्रम, डॉ. अंबादास गाजूल, प्रवीण कोटा, दयानंद मामड्याल, पुरुषोत्तम उडता, गणेश गुज्जा, डॉ. राजेंद्र गाजुल, श्रीनिवास सामलेटी, योगेश म्याकल, अशोक दुस्सा, प्रभाकर भिमनाथ, प्रवीण जिल्ला, अशोक बिटला, नारायण येरवा, अंबादास नक्का यांचा समावेश आहे.

या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष मुरलीधर अरकाल, सहकोषाध्यक्ष श्रीधर म्याकल, सचिव भूपती कमटम, सहसचिव विजयकुमार उडता, अंबादास बिंगी, प्रभाकर भिमनाथ, नारायण येरवा आदी उपस्थित होते.



## विसर्जन मिरवणूक अडचणीसंदर्भात सार्वजनिक मध्यवर्तीच्यावतीने बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या मध्यवर्ती मंडळातर्फे मंगळवारी अनंत चतुर्दशी या दिवशी श्रींच्या विसर्जनाची मिरवणूक लेझीम, ढोल पथक ताफ्यासह निघते. प्रारंभी देशमुखांच्या मानाची श्रींच्या पालखीसह सर्वात शेवटी श्रध्दानंद समाजाचा आजोबा गणपतीमध्ये सहभागी होणाऱ्या मंडळांस येणाऱ्या अडचणीसंदर्भात ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे व उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि. १५) हॉटेल ऐश्वर्या येथे बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये सुमारे अठरा मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला आणि आपल्या अडचणी सांगितल्या. यावेळी सर्वांनी लवकरात लवकर सहभागी होऊन मानाचा आजोबा गणपती रात्री बारा वाजेपर्यंत शक्यतो विसर्जन होण्यासंदर्भात प्रयत्नशील राहू, असे मत व्यक्त केले. या बैठकीत ट्रस्टी सुनील रसाळे, दास शेळके, संजय शिंदे, गौरव जक्कापुरे, भाऊ रोडगे, माजी अध्यक्ष अमोल बापु शिंदे यांच्यासह इतर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विचार मांडले. या बैठकीस माजी आमदार ट्रस्टी नरसिंग मेंगजी, श्रीशैल बनशेट्टी, विजय पुकाळे, अनिल गवळी, माजी अध्यक्षा लताताई फुटाणे, सोमनाथ मेंडके, उत्सव उपाध्यक्ष चक्रपाणी गज्जम, चिन्मय पाटील, संतोष खंडेराव, मल्लिनाथ सोलापुरे, विजयकुमार बिराजदार, शिवानंद येरटे उपस्थित होते.



## उर्दू भाषा समृद्ध करण्याचे प्रयत्न सतत व्हावे

### डॉ. दलाल; डॉ. गौस शेख यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

भाषा जतन करण्यासाठी व त्याला समृद्ध करण्यासाठी साहित्यातील विविध प्रकारचे पुस्तके प्रकाशित होणे अपेक्षित आहे. या कामी वेळ, पैसा, खर्च करावे लागते. परंतु साहित्य समृद्ध करण्यासाठी असे प्रयत्न सतत करावे, असे मत डॉ. एम. ए. दलाल यांनी व्यक्त केले.

एस. एस. ए. आर्टस अँड कॉमर्स महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गौस शेख लिखित मुन्तखब शेअरी व नसरी असनाफ का तजज़ीयाती मुतालेआ या उर्दू पुस्तकाचे प्रकाशन उर्दू घर येथे माजी प्राचार्य डॉ. एम.ए. दलाल यांच्या अध्यक्षतेखाली व अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य परिषदचे सचिव अय्यूब नल्लामंदू, प्राचार्य डॉ. इ.जा. तांबोळी यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

उर्दू विभाग प्रमुख व उर्दू घरचे सदस्य डॉ. म. शफी चोबदार यांनी प्रस्ताविक केले तर प्रा. डॉ. गौस शेख यांनी पुस्तकाबदल मनोगत व्यक्त करत उर्दू साहित्याचे विविध प्रकारची माहिती या पुस्तकात समावेश करून या पुस्तला परिपूर्ण स्वरूप देण्यात आल्याचे सांगितले. उर्दू घरचे समन्यवक राजा बागबान, महेमूद नवाज, डॉ. कदीर बिजापुरे यांनी सर्व पाहुण्याचे स्वागत केले. सूत्रसंचालन डॉ. चोबदार यांनी केले तर आभार प्रा.ए. ए. बिजापूरे यांनी मानले. यावेळी उर्दू घरचे ग्रंथपाल साहिर नदाफ, डॉ. सुमय्या बागबान, माजी प्राचार्य मन्नान शेख, गफूर शेख, डॉ. शकील शेख उपस्थित होते

## धनगर समाजाला एसटीचे आरक्षण लागू करा



### दोन माजी मंत्र्यांच्या घरासमोर वाजविले ढोल

### विधानसभा निवडणुकीत समाज होणार आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

धनगर समाजाला एसटी अर्थात अनुसूचित जमातीचे आरक्षण लागू करावे या प्रमुख मागणीसाठी राज्यातील धनगर समाज आता आक्रमक झाला असून, रविवारी भाजपाचे माजी मंत्री आ सुभाष देशमुख आणि माजी मंत्री विजयकुमार देशमुख यांच्या घरासमोर धनगर समाजातील आंदोलनकर्त्यांनी ढोल वाजून सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला.

सरकारला जागे करण्यासाठीच हे ढोल वाजविण्यात येत असल्याचे आंदोलनकर्ते शेखर बंगाळे म्हणाले. गेल्या ६० ते ७० वर्षापासून धनगर समाजाची एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीची मागणी आहे. यापूर्वी भाजपाच्या अनेक मंत्र्यानी धनगर समाजाला आश्वासने दिली आहेत. पहिल्या कॅबिनेटमध्ये निर्णय घेऊ असे सांगून दहा वर्षापासून भाजपा सरकारने धनगर समाजाच्या आरक्षणाकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे समाजातील काही मंडळी सध्या पंढरपूर येथे प्राणांतिक उपोषण करित आहेत. त्याच ठिकाणी अमोल देवकते नावाच्या आंदोलनकर्त्यांनी विषारी औषध प्राशन केले. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तरीही शासन दखल घेत नाही. त्यामुळे शासनाला आता जागे करण्याची गरज आहे. भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी धनगर आरक्षणाचा प्रश्न गांभीर्याने घ्यावा अन्यथा विधानसभा निवडणुकीत त्यांना फिरू देणार नाही, असा पवित्रा घेतला आहे. यावेळी शेखर बंगाळे, चंद्रशेखर पाटील, निखिल घोडके, प्रविण बंडगर, करण गडदे, विकास पाटील, आकाश नागणकेरी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद पतसंस्थेच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त महाप्रसाद वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एकच्या वतीने गणेशोत्सवा निमित्ताने महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी श्रेष्ठी विठ्ठलराव गरड, वामनराव नवले, प्रकाश शेटे, अशोक भोसले, डी. एस. कुलकर्णी, पंडितराव भोसले, दयानंद परिचारक, श्रीशैल देशमुख, भरतकुमार कदम, विवेक लिंगराज, डॉ. एस. पी माने, सुरेश कुंभार व संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.



जिल्हा परिषद पतसंस्था क्रमांक एक च्या वतीने गणेशोत्सवानिमित्ताने महाप्रसाद वाटप करण्यात आला. सालाबाद प्रमाणे पतसंस्थेचे सर्व सदस्य, जिल्हा परिषदेतील अधिकारी, सर्व कर्मचारी, पत्रकार, जिल्हा परिषदेतील त्यादिवशी येणाऱ्या अभ्यागत या सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसाद वाटप शुभारंभ पतसंस्थेचे श्रेष्ठी विठ्ठलराव गरड, वामनराव नवले, अशोक भोसले ,डी. एस. कुलकर्णी, प्रकाश शेटे, बी.टी. मोहिते, पंडितराव भोसले, दयानंद परिचारक, श्रीशैल देशमुख, भरतकुमार कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषदेतील सर्व खाते प्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांनी अत्यंत उत्साहाने या महाप्रसाद वाटपात सहभाग नोंदविला.महाप्रसादासाठी चेअरमन डॉक्टर एस. पी. माने, व्हाईस चेअरमन सुरेश कुंभार, ज्येष्ठ संचालक विवेक लिंगराज, विष्णू पाटील, शहाजहान तांबोळी, श्रीधर कलशेट्टी, विशाल घोगरे, तजमुल मुतवली, गजानन मारडकर, शिवानंद म्हमाने, किरण लालबोंद्रे, विकास शिंदे, चेतन वाघमारे ,शिवाजी राठोड, विजयसिंह घेरडे, नितीन शिंदे, मृणालिनी शिंदे, श्वेतांबरी राऊत आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी सचिव दत्तात्रय देशपांडे, अशोक पवार, सुभाष काळे ,विनोद कदम, जगदेवी अंजनालकर आदींनी परिश्रम घेतले.



## आव्हाने स्वीकारल्यास यश निश्चित : पारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

बदलत्या स्पर्धेच्या युगात सध्या व आगामी काळात मुलींना शैक्षणिक, व्यवसाय व नोकऱ्यांमध्ये मोठ्या संधी उपलब्ध असल्याने मुलींनी धाडसाने पुढे आले पाहिजे. मुलींनी कोणतीही आव्हाने स्वीकारल्यास यश निश्चित मिळू शकते, असे प्रतिपादन मर्चन्ट नेव्ही सेवेत सिलेक्ट झालेल्या वैभवी यांनी केले.

अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात वैभवी बोलत होती. कृषी अधिकारी नीलकंठ पारे व सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा पारे यांची कन्या वैभवी हिची मर्चन्ट नेव्हीमध्ये निवड झाली आहे. त्यानिमित्त तिच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ पत्रकार व सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दशरथ वडतिले यांनी वैभवीची मुलाखत घेतली. तिने विविध प्रश्नाना समर्पक उत्तरे दिली.वर्षातील सहा महिने समुद्रात जहाजावर काम करावे लागते हे सांगताना या नोकरीतील फायदे-तोटे व प्रत्यक्ष कामाचा अनुभव सादर केला. हेरिटेज मनिधारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष व उद्योजक गजाननराव होनराव व इतर पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

# दशलक्षण महापर्वात ३५० विद्यार्थ्यांचा सहभाग

### संचितपुण्य की फलप्राप्ति धर्मसाधना संकल्पनेवर सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

जैन धार्मियांसाठी गणेशोत्सवाच्या काळामध्ये येणारा अतिशय पवित्र दशलक्षण महापर्वाच्या पार्श्वभूमीवर वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी भक्तीरसामध्ये न्हावून गेले. 'संचितपुण्य की फलप्राप्ति धर्मसाधना' या धार्मिक संकल्पनेवर आधारीत गाणे, नृत्य, नाटिका आणि काव्याचे सादरीकरण झाले. डब्ल्यूआयटी जैन टेम्पलमध्ये समवशरणची प्रतिकृती साकारली. त्यावर श्री भगवान महावीरांची प्रतिमा विराजमान केली.



या दशलक्षण महापर्वात सकाळी पूजन, प्रक्षाळपासून सायंकाळी आरती व धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. दररोज ३२ ते ३५ विद्यार्थ्यांनी उपवास केला. १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी एकासन केला तर प्रतिक्रमणसाठी ३५० हून अधिक विद्यार्थी सहभागी होते. श्री भगवान महावीरांच्या प्रतिमेला विद्यार्थी अनुराग फरसुले याने मंगलाचरण करून वालचंद शिक्षण समुहाचे विश्वस्त श्री भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटी महाराष्ट्र रिजन तथा मुंबई, संमत्ती सेवादलचे अध्यक्ष मिहीर गांधी, वालचंद शिक्षण समुहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पराग शहा, माया गांधी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. मंथन पाटील, ओम मोरसकर, जैनम कोठारी, श्रीनाथ आग्रे, रुची रायबागकर, अंजली आवटी, युक्ता कापसे, प्रेरणा बुबणे, आणि धनश्री कोचट यांच्या सुमधूर आवाजाला ढोलकीवर तुषार डोळस तर तबल्यावर जयेश दुरुगकर याने साथ दिली तर शाश्वत परतवार, स्नेह परतवार, सलोनी जैन, संजीता श्रावणे, अनुराग फुरसुले, मृण्मयी टिप्पत या विद्यार्थ्याचे मार्गदर्शन लाभले. गौरी काळे, मिताली उबाळे या विद्यार्थिनींच्या मार्गदर्शनाखाली विविध गीतांच्या बोलवर सिद्धी क्षीरसागर, विनया खांमगांवकर, श्रेय दोशी, खुशबु मुरकुंडे, राशी शहा, साक्षी पाटील, या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यामध्ये सभागृह तल्लीन झाले. स्नेह परतवार, ऋषिकेश टिकाईत या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाखाली शाश्वत परतवार, दक्षा पाटील, आदिश जैन, श्रेया हेरवाडे, हिमांशु बाफना, तनिष्का शहा यांनी सादर केलेल्या कवि संमेलनाला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला. सुविरा पाटील, सानिका पाटील, साक्षी आडमुठे, तेजश्री बंड, सेजल शहा आणि संचिता पाटील या विद्यार्थिनीने नाटिकेत नृत्य सादरी केले त्यांना अक्षता श्रावणे, दक्षा पाटील या विद्यार्थीनीने मार्गदर्शन केले. सेजल दर्डा, श्रेयांश बाफना, रिचा खुल, तुषार डोळस, स्नेहा जैन, स्वराज काळे, दिया जैन, अंश जैन, सानिया शेट्टी, देवांग मेहता, श्रेया चोपडा, अजय मोहेकर, प्रणव जैन, पयांश जैन, सम्यक जैन, शशांक जैन, पवन जैन यांच्या विविध पात्रांनी रंगलेले 'संचितपुण्य की फलप्राप्ति धर्मसाधना' नाटकाचे सादरीकरण झाले. त्यासाठी संयम जैन, हिमाशु बाफना, आर्या शेट्टी, श्रेया गांधी, उत्कर्ष पाटील या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन लाभले. श्रेयांश कवडे, तन्वी कान्हेड, हर्ष कागवाडे, तन्वी आवटी, आदित्य पाटील, येशा बापना, यश बुकशेट, रिया आगरकर, ओम जैन, श्रुती पांडे यांनी लयबद्ध सूत्रसंचालन केले. विपुल घोडके, पद्मजा आळसे, आदिश जैन यांचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


सोलापूर : मयूर मित्रमंडळ, भद्रावती पेठ राममूर्ती देखावा.



सोलापूर : गोकुळ प्रतिष्ठान लष्करचा लाडका राजा तुळजाभवानी मंदिर प्रवेशव्दार देखावा सादर केला.


सोलापूर : सूर्योदय हनुमान देवस्थान तरुण मित्रमंडळ, दत्तचौक लिंगभैरवी देखावा सादर केला.


सोलापूर : दैनिक तरुण भारत श्रींच्या पूजेप्रसंगी बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियाचे राज्य अध्यक्ष दत्तामामा मुळे.


सोलापूर : दैनिक तरुण भारत गणेशोत्सव मंडळातील श्री सत्यनारायण पूजेचा मान यंदा नागेश रजपूत, निकिता नागेश रजपूत व देवशैला रजपूत यांना मिळाला.

# धनगर समाजाला पुन्हा समितीचे गाजर

- उपोषण सुरूच; उपोषणकर्त्यांचा निर्णय
- आंदोलक आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ सप्टेंबर-**

धनगर समाजाला एसटी आरक्षण अमंलबजावणी मागील सात दिवसापासून आमरण उपोषणास बसलेले असून मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाला माजी न्यायमूर्तीच्या अध्यक्षतेखाली आरक्षण अमंलबजावणी समिती नेमली जाईल असे अश्वासन देण्यात आले आहे.

यावर समाधान न झाल्यामुळे आंदोलक आक्रमक झाले असून उद्या पंढरपूर येथे राज्यातील प्रमुखांची राज्यव्यापी बैठकीचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर समाजाला विचारून पुढील निर्णय घेतला जाईल अशी माहिती उपोषणकर्त्यांनी दिली.



धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अमंलबजावणी व्हावी यासाठी पंढरपूर येथील टिळक स्मारक येथील पटांगणात दि.९ सप्टेंबरपासून सहा जिल्ह्यांतील सहा प्रतिनिधी उपोषणास बसले असून उपोषणाचा सातव्या दिवशीही तोडगा न निघाला नसल्याने समाज आक्रमक झाला असून आंदोलनस्थळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करून निषेध व्यक्त केला. उपोषणास आमदार यशवंत माने यांनी लेखी पाठिंब्याचे पत्र देत सोबत असल्याचे सांगितले तर माजी आ. दीपक साळुंखे-पाटील, माजी आ. दिलीप माने, उत्तम जानकर आदींनी भेट देऊन पाठिंबा दिला.

### योगेश धरम यांची प्रकृती खालावली

उपोषणास बसलेल्या पुणे जिल्ह्यातील देहुगावचे योगेश धरम यांना दुपारी उठताना चक्कर येऊन ते खाली स्टेजवरच कोसळले. त्यामुळे त्यांना तात्काळ खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती देण्यात आली.

### आज राज्यव्यापी बैठक

मुख्यमंत्र्यासोबत झालेल्या बैठकीत समितीची नेमनूक करण्याचे पुन्हा आश्वासन मिळाल्याने उपोषणकर्त्यांनी निषेध व्यक्त करीत सोमवारी १६ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता आंदोलनस्थळी सामाजातील प्रमुखांची राज्यव्यापी बैठक घेऊन आंदोलनाची पुढील दिशा ठरविली जाईल अशी माहिती उपोषणकर्ते माऊली हळणवर व दिपक बोऱ्हाडे यांनी दिली.



# धनगर आरक्षणाला माजी आ. दिलीप मानेंचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १५ सप्टेंबर-**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या प्रवर्गामधून आरक्षण लागू करावे, या मागणीसाठी सकल धनगर समाजाच्या वतीने पंढरपूर येथे राज्यस्तरीय उपोषण आंदोलन सुरू आहे. माजी आ. दिलीप माने यांनी रविवारी उपोषणस्थळी आंदोलकांची भेट घेऊन आरक्षणाला पाठिंबा दिला.

यावेळी दिलीप माने म्हणाले की, धनगर समाजाला मागच्या अनेक वर्षांपासून आश्वासनावर आश्वासने दिली जात आहेत. पण भाजपा सरकारकडून ठोस पाऊल उचलले जात नाही. सत्ताधाऱ्यांनी धनगर समाजाचा राजकीय व सामाजिक फायदा घेतला. पण या समाजाला न्याय दिला नाही. त्यामुळे या समाजाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परिणामी नाईलाजास्तव धनगर समाज बांधवांना उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला असल्याचे मत माने यांनी व्यक्त केले. या लढ्यात मी आणि माझे उत्तर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील सहकारी आपल्या पाठीशी असल्याचेदेखील माने यांनी सांगितले.



# आंदोलनस्थळी उधळली गाजरं

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ सप्टेंबर-**

पंढरपूर येथील धनगर आरक्षण एसटी अंमलबजावणीसाठी बसलेल्या उपोषणाचा सातवा दिवस असून एका उपोषणकर्त्याची प्रकृती घालवण्याने त्याला तातडीने खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले आहे.

सरकारच्या या वेळ काढूपणा वर समाज आक्रमक होत असतानाच चर्चा साठी गेलेल्या शिष्टमंडळास सरकारने पुन्हा समिती स्थापन करून पुढील काळात योग्य न्याय दिला जाईल असे आश्वासन देत समितीचे गाजर दाखविले आहे याचा निषेध म्हणून उपोषणकर्त्यांसह समाज बांधवांनी आंदोलन स्थळीच सरकारचा निषेध करीत गाजराची उधळण केली आणि सरकारचा तीव्र निषेध व्यक्त केला. राज्य सरकारला समाजाला गाजर दाखविले आहे. आगामी येणाऱ्या निवडणूकीत आम्ही तुम्हाला केळी दाखवू असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला.

# शरद पवारांनी आंदोलनस्थळी यावे

- धनगर आरक्षण आंदोलकांची खा. मोहिते-पाटील यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ ऑगस्ट-**

धनगर समाजाला घटनादत्त एसटी आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी या एकमेव मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या धनगर समाजाची खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भेट घेतली.

यावेळी त्यांनी तुमच्या प्रश्नावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन देताच आंदोलकांसह उपस्थितांनी त्यांनीच आंदोलनस्थळी यावे, आमचे शिष्टमंडळ अथवा इतर कोणी तिकडे येणार नाही असे सुनावले. तर समाजाच्या भावना शरद पवारांपर्यंत पोहचविण्याचे आश्वासन खा. मोहिते-पाटील यांनी दिले. धनगर आंदोलक माऊली हळणवर, दीपक बोऱ्हाडे यांच्यासमवेत चर्चा करताना खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासमोर म्हणणे मांडले. आंदोलक दीपक बोहाडे यांनी विरोधी पक्षातील तीनही पक्षांनी एकत्रित पत्रकार परिषद घेऊन धनगर समाजाच्या आंदोलनाला व त्यांच्या मागणीला पाठिंबा असल्याचे जाहीर करावे, अशी मागणी केली. यावर मोहिते-पाटील यांनी तुमच्या भावना आमच्या पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे मान्य केले. धनगर समाजाचे शिष्टमंडळ माझ्यासमवेत यावे, त्यांची व पवार यांची बैठक घडवू, असे सांगितले. मात्र, कार्यकर्त्यांनी यास विरोध दर्शविला. शरद पवारांनी आंदोलनस्थळी येऊन चर्चा करावी, अशी मागणी केली. यापूर्वी त्यांनी मराठा आंदोलनावेळी अंतरवाली सराटी येथे पहिल्याच दिवशी भेट दिली होती. मग येथे येण्यास ते का टाळत आहेत, असा प्रश्न उपस्थित केला.



**खा. प्रणिती शिंदेंचा पाठिंबा :** माढा व सोलापूर लोकसभा मतदारसंघात सुमारे १५-२० लाख धनगर समाज असून गत लोकसभा निवडणुकीत धनगर समाज या दोन्ही खासदारांच्या पाठीशी उभा राहिला होता. लोकसभेत पहिल्यांदा आपण आरक्षणनंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी आवाज उठविला आहे. यापुढेही मी समाजासोबत असून आपला पाठिंबा असल्याचे खा. प्रणिती शिंदे यांनी सांगितले.




# आ. राजेंद्र राऊतांच्या आंदोलनाला वाढता पाठिंबा

- ७९ ग्रामपंचायती, ४८ सामाजिक संघटनांनी दिले पाठिंब्याचे पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ सप्टेंबर-**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे व यासाठी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे, तसेच कोणतीही अट न घालता राज्यातील सर्वच समाज घटकांतील मुला-मुलींना सर्वच प्रकारचे शिक्षण मोफत द्यावे या मागणीसाठी आमदार राजेंद्र राऊत यांनी गुरुवारपासून सुरु केलेल्या ठिय्या आंदोलनाच्या चौथ्या दिवशी ही विविध संस्था, संघटना, व्यापारी, ग्रामपंचायती यांचा पाठिंबा मिळत आहे.

तालुक्यासोबतच शेजारच्या तालुक्यातील मराठा बांधव ही पाठिंबा देण्यासाठी येत आहेत. तसेच बीड व उस्मानाबाद येथील मराठा बांधव आंदोलन स्थळी भेट देऊन चर्चा करीत आहेत. २८८ आमदारांपैकी फक्त एका आमदारांनी ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी आंदोलन करावे हेही समाजासाठी भूषणच आहे, अशी चर्चा नागरिक आतून होत आहे. गुरुवारपासून आमदार राऊत यांनी बार्शीतील शिवसृष्टी मधील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर बेमुदत ठिय्या आंदोलनाला सुरुवात केली आहे. आजच्या चौथ्या दिवशी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिवसभर कार्यकर्ते व समाज बांधव येत होते. भूम, परांडा, वाशी, कळंब, तुळजापूर, धाराशिव आदी तालुक्यातील बांधव येत होते. ब्राह्मण महासंघ, मराठा सेवा संघ, प्रबुद्ध भारत, चर्मकार समाज आदींनी मागणीला पाठिंबा दिला आहे.




# श्री प्रतिष्ठानच्या पाताळ भैरवी देखाव्यास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**विशेषतः झाडांच्या सालीपासून साकारण्यात आला पर्यावरणपूरक गणपती बाप्पा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर -**

सोलापूर शहरात गणेशोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह दिसून येत आहे. शहरातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या वतीने धार्मिक, आध्यात्मिक आणि कलात्मक देखावे सादर केले जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर श्री प्रतिष्ठानच्या वतीने देखील ७० फूट रोडवर गणेशोत्सवानिमित्त भव्यदिव्य असा पातळ भैरवी देखावा साकारण्यात आला आहे. गणेश भक्तांना या आगळ्या वेगळ्या देखाव्याच्या माध्यमातून पाताळ भैरवी देवीचे अस्तित्व दिसून येत आहे. सदरच्या देखव्याला गणेश भक्तांमधून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

दरम्यान श्री प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी धार्मिक आणि अध्यात्मिक चरित्र घेऊन देखावा साकारला जातो. मागीलवर्षी देखील आगळावेगळा श्रीशंभू महादेवाचा अशाच पद्धतीने आकर्षक आणि देखावा साकारण्यात आला होता. यावर्षी देखील अनोखा पातळ भैरवी देखावा भक्तांच्या पसंतीस उतरत आहे. विशेष करून देखाव्यातील गणपती हा पर्यावरणपूरक आसून झाडांच्या सालींपासून बनवण्यात आला आहे. दरवर्षी याच पद्धतीने गणपती बाप्पा साकारले जातात.



### देखाव्यातून एक वेगळा आनंद देण्याचा प्रयत्न

गणेशोत्सव गणेश भक्त देखावे पाहण्यासाठी घराबाहेर पडतात. भक्तांना गणेशोत्सव काळात एक वेगळा आनंद मिळावा. तसेच त्यांची धार्मिक आणि अध्यात्मिक भावना वृद्धींगत व्हावी यासाठी श्री प्रतिष्ठान नेहमी प्रयत्नशील असते. यंदाचा पाताळ भैरवी देखावा हा आगळावेगळा असून यामध्ये झाडांच्या सालींपासून पर्यावरणपूरक गणपती साकारण्यात आला आहे. दरवर्षी वेग वेगळ्या थीम प्रमाणे देखावा सादर केला जातो. आणि भक्तांमधून त्याला चांगला प्रतिसाद मिळतो.

**- श्रीनिवास संगा, अध्यक्ष, श्री प्रतिष्ठान, सोलापूर**

### श्री प्रतिष्ठानचे आगळे-वेगळे देखावे

श्री प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव काळात भक्तांसाठी एक वेगळी पर्वणी घेऊन येतात. गणेशोत्सव काळात आकर्षक देखाव्यातून भक्तांमध्ये एक वेगळी ऊर्जा निर्माण केली जाते. यंदाचा पातळ भैरवी देखावा हा आगळ्या वेगळ्या पद्धतीने साकारण्यात आल्याने भक्तांमध्ये याचे कुतूहल निर्माण झाले आहे.

**-निर्मला कडगणी,**
महिला गणेश भक्त

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चारुदत्तबुवा आफळे यांचे बुधवारी कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ सप्टेंबर-**

स्वरुप सखी मंडळ आयोजित हभप कै. सुनीती बल्लाळ दाते आणि कै. नागेश नीलकंठ सहस्त्रबुध्दे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कीर्तन महोत्सवाचे आयोजन दि. १८ ते २० सप्टेंबर या कालावधी दरम्यान किर्लोस्कर सभागृह, श्री हि. ने. वाचनालय येथे होणार आहे.

दरम्यान या कीर्तनमालेतील पुष्प हभप विद्यावाचस्पती चारुदत्तबुवा आफळे हे बुधवार ( दि. १८ ) सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६.३० ते ९.३० तर दि.१९, २० सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० ते ११.३० यावेळेत परमप्रतापी बाजीराव पेशवे या विषयावर पुष्प गुंफणार आहेत.

या कीर्तन महोत्सवाची प्रेरणा ही वै. गुरुवर्य हभप नरहरी अपामार्जने आशिर्वाद कै. काशी कुलकर्णी यांच्यावतीने प्राप्त झाली असून यासाठी कृष्णामाई नर्सिंग होमच्या डॉ. माधुरी दबडे यांचे सहकार्य लाभले आहे. या कीर्तन महोत्सवाचा लाभ भक्तांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### बेकायदेशीररित्या प्लॉटची विक्री प्रकरणी चार जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

बेकायदेशीर रित्या प्लॉटची विक्री करून अतिक्रमण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. सैफन फरदीन पिरजादे (रा. सहारा नगर भाग एक),अशपाक सैफन पिरजादे,प्रकाश धोंडीराम उडानशिव (रा.भैरू नगर लिमयेवाडी) व दीपक धोंडीराम उडानशिव असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या घटनेची हकीकत अशी की, वरील संशयित आरोपी यांनी त्यांच्या जागेच्या मालकी हक्काचे कोणत्यातरी प्रकारच्या रजिस्टर कायदेशीर नसताना ती जागा दुसऱ्या लोकांना विक्री करण्याचा कोणताही अधिकार नसताना व कायदेशीर एनए लेआउट मंजूर नसताना बेकायदेशीर रित्या ५४ जागे पैकी १९ प्लॉट विविध लोकांकडून बुकिंग करून रक्कम घेऊन ती जागा दुसऱ्या लोकांना बुकिंग करून घेऊन त्यांना बॉण्ड पेपर व इसारा व्हाउचर पावती प्रकाश उडानशिव याने एक लाख ५० हजार रुपये बुकिंग घेऊन बुकिंग केली.त्यानंतर दीपक याने सैफन व अश पाक यांच्या सांगण्यावरून बेकायदेशीर रित्या पाडलेला प्लॉट १२ येथे पत्रा शेड मारून बेकायदेशीर रित्या अतिक्रमण केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

### सात रस्ता येथील बस स्टॉप जवळून दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सात रस्ता येतील बस स्टॉप जवळ फिर्यादी सुरेश अमरसिंग चव्हाण (वय-४०,रा. सलगरवाडी डोणगाव रोड) यांनी एमएच.१३. सीवाय.७१४९ ही दुचाकी पार्किंग केलेली असताना अज्ञात



चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी चव्हाण यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १० सप्टेंबर रोजी रात्री सव्वा नऊ ते पावणेदहा वाजण्याच्या दरम्यान घडली.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

### श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये राष्ट्रभाषा हिंदी दिन साजरा

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रभाषा हिंदी दिन साजरा करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वसतिगृहाच्या संचालिका सायरा शेख, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे व बसवराज कोरे यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी धनश्री येणेगुरे, दुर्गा सुर्यवंशी, प्रतीक्षा वरनाळ, श्रावणी गाडेकर, नदाफ, आयेशा अत्तार, समृध्दी सुतार, ऐश्वर्या विभुते, प्रेम कोन्हाळी या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. शिक्षकामधून मारुती माने यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी सायरा शेख यांनी विद्यार्थ्यांना हिंदी दिनाचे महत्त्व सांगितले. वैजिनाथ हत्तुरे यांनी आपल्या मनोगतात राष्ट्रभाषा हिंदी दिनाचे महत्त्व सांगत सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास भारत राऊत, रमेश आगवणे, प्रिया पसारे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रतिक्षा बिडवे यांनी केले. सूत्रसंचालन अनिता हौदे हिने केले. गणेश कोरे यांनी आभार मानले.

### जैन गुरुकुल प्रशालेत हिंदी दिन साजरा

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात हिंदी दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. रविंद्र काळे तर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजकुमार काळे होते. तसेच उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, ज्येष्ठ शिक्षक रमाकांत शिवशरण, प्रीती काळेगोरे, सूर्यकांत आष्टेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी प. पू. १०८ गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक गौरी पाटील हिने केले. मान्यवरांच्या हस्ते विदयार्थ्यांनी तयार केलेल्या मेरी प्यारी माँ या विषयावर आधारित भित्तीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. सूत्रसंचालन करून आभार मानले.



सोलापूर : पाणीवेस गणेशोत्सव मंडळाने श्रींच्या चरणी ५०० किलो मोतीचूर लाडूंची सजावट केली आहे. छाया : केवल तिवारी.



सोलापूर : लोकमान्य टिळक चौक मंडळ ट्रस्टच्यावतीने पिठापुरम दर्शन देखावा सादर केला आहे.

## मराठा समाजाला विरोध केलात तर घरी बसवू

### सकल मराठा समाजाचा आ. राऊत यांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सोलापूर शहर-जिल्ह्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने आज रविवार, दि. १५ रोजी सकाळी सोलापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध आंदोलन करण्यात आले. दरम्यान, मराठा समाजाच्या विरोध गेलात तर थेट घरी बसवू, असा इशाराही यावेळी सकल मराठा समाजाच्यावतीने आ. राऊत यांना देण्यात आला.




यावेळी सकल मराठा समाज बांधवांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी एक मराठा-लाख मराठा, या सरकारचं करायचं कायऽऽ खाली मुंडी वर पाय...अशी घोषणाबाजी करीत सकल मराठा समाज बांधवांनी संताप व्यक्त केला. यावेळी बोलताना राजन जाधव, सोमनाथ राऊत हे म्हणाले गेल्या १ वर्षांपासून जरांगे पाटील हे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी एकटे लढा देत आहेत. आ. राऊत यांना आता मराठा समाजाची आठवण झाली का? तुम्ही आता मराठा समाजाची माफी जरी मागितली आणि काही केले तरी मराठा समाज बांधव तुमच्यावर विश्वास ठेवणार नाहीत; आम्ही सर्वजण मनोज जरांगे पाटलांसोबत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने महाराष्ट्र शासनाचाही जाहीर निषेध करण्यात आला. या आंदोलनात राजन जाधव, पद्माकर नाना काळे, देविदास घुले, भाऊ रोडगे, सोमनाथ राऊत, सुनील शेळके, संजय जाधव, सदाशिव पवार, सुरेश जगताप अमोल भोसले, वरद कोळी, गोवर्धन गुंड, ब्रम्हदेव पवार, आबा सावंत, दिनकर जगदाळे, प्रितम परदेशी, जीवन यादव उपस्थित होते.

## ताता गणपती मंडळातर्फे नवग्रहपूजन, गणेशयाग, होमहवन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

पूर्व विभाग प्रमुख मानाच्या ताता गणपती मंडळातर्फे रविवारी नवग्रहपूजन, गणेशयाग व होमहवन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंडळाचे पुरोहित आत्माराम चिप्पा यांच्याकडून पौरोहित्याखाली हा कार्यक्रम झाला. होमहवन कार्यक्रमाचे यजमान आशिष आडम, राजू मुशन, नागेश केंची, ईश्वर बुरा, निखिल अन्नलदास, नितीन गुम्मा, संदीप संगा, श्रीनिवास कोटा,सदानंद शेराल, बालकिसन संदुपटला दाम्पत्य होते. गणेश याग कार्यक्रमांतर्गत श्रींच्या मूर्तीस ड्रायफूट तसेच विविध फळांनी अभिषेक करण्यात आला. यावेळी विशवस्त उमेश मामडयाल,सत्यनारायण आरकाल ,राजेंद्र द्यावरकोंडा, संदीप कन्ना, श्रीनिवास मडुर, प्रेसिडेंट गिरीश श्रीगांधी, अध्यक्ष बालाजी आरकाल, सचिव गोविंद केंची, खजिनदार रमेश आडम, उपाध्यक्ष संदिप संगा, प्रसिद्धी प्रमुख विनायक धारा, मिरवणूक प्रमुख गंगाधर बंडगर कार्याध्यक्ष नागेश भंडारी ,राम कृष्ण शेराल, नागेश केंची, श्रीनिवास पोगुल, नागराज बत्तुल, कुमार भंडारी उपस्थित होते.



## सावाच्या अध्यक्षपदी संतोष उदगिरी; सचिवपदी अक्षय जव्हेरी यांची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

सोलापूर ॲडव्हर्टायझिंग एजन्सी वेल्फेअर असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली आणि त्यामध्ये संतोष उदगिरी (समर्थ ॲडव्हर्टायझर्स) यांची अध्यक्षपदी तर सचिवपदी अक्षय जव्हेरी (जव्हेरी ॲडव्हर्टायझिंग सर्विसेस) यांची वर्ष २०२४-२६ करीता एकमताने निवड करण्यात आली.

सर्वसाधारण सभेच्या सुरुवातीस दिवंगत सभासद स्व.स्वरूप स्वामी, स्व. महेश अंदेली व स्व.संतोष कोल्हापूरे याना श्रद्धांजली वाहण्यात आली. नंतर सर्वानुमते उपाध्यक्षपदी निशांत पोरे (पोरे ब्रदर्स), सहसचिव पदी सचिन क्षीरसागर (विराक्षी कम्युनिकेशन), खजिनदारपदी पांडुरंग कोल्हापुरे (श्री स्वामी समर्थ ॲडव्हर्टायझर्स) यांची एकमताने निवड करण्यात आली. खेळी मेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या वार्षिक सर्वसाधारण सभेस माजी अध्यक्ष मोहन वैद्य, संजय तोडकरी, संदीप जव्हेरी, विलास क्षीरसागरसह रवि पोरे, रवींद्र जोगीपेठकर, लक्ष्मीकांत उदगिरी, रोहित जोगीपेठकर उपस्थित होते. नूतन अध्यक्ष निवड झाल्यानंतर संतोष उदगिरी यांनी माध्यम क्षेत्रात येणाऱ्या अडीअडचणी विषयी सभासदांना येणाऱ्या अडचणी विषयी सर्व सभासदांची मदत करण्यास संघटना तत्पर असणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. म ोहन वैद्य यांनी संस्थापक सुभाष स्वामी व स्व. अरविंद जव्हेरी यांनी स्थापन केलेल्या या संघटनेची वाटचाली बाबत आपले मनोगत व्यक्त केले. अक्षय जव्हेरी यांनी आभार मानले.

## पू. ना. गाडगीळ अँड सन्सच्या नवीन गोल्ड शोरूमचे उद्घाटन

### पारंपरिक, डिझायनर दागिन्यांचे क्यूरेटेड कलेक्शनसह आर्ट गॅलरीची निर्मिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

देशातील आघाडीच्या ज्वेलरी ब्रँडपैकी असलेल्या पू. ना. गाडगीळ आणि सन्सने सोलापुरात भव्य दालन नव्या वास्तूत सुरू केले आहे. याच नव्या वास्तूचे उद्घाटन पी.एन. जी सन्सचे संस्थापक अजित गाडगीळ व डॉ. रेणू गाडगीळ यांच्या हस्ते झाले.



यावेळी संचालक सीईओ अमित मोडक, रिजन हेड जितेंद्र जोशी, अडमिन हेड समीर परांजपे, सोलापूर शोरुमचे व्यवस्थापक हेमंत साई यांच्यासह अंजू गाडगीळ, रवी खाडीलकर, सतीश व श्रीकांत कुबेर, सुहास एकबोटे आदी उपस्थित होते.

सोलापुरात पीएनजी सन्सने एक दशकापूर्वी दालन सुरू केले, आणि पहिल्या दिवसापासून ग्राहकांनी प्रेम दिले आहे. त्यामुळे वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन पीएनजी सन्सने स्वतः ची भव्य वास्तू सोलापुरातील डफरीन चौकात उभारली आहे. सोलापुरातील दागिन्यांचे हे सर्वांत मोठे दालन ठरणार असून, सोलापुराच्या वैभवात यामुळे भर पडणार आहे. दालनाच्या विस्ताराबाबत अजित गाडगीळ म्हणाले, की ग्राहक हा राजा असून, काळानुसार अपग्रेड होणे, ही गरज बनली आहे. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन नवी प्रशस्त दोन मजली वास्तू उभारली असून, पंधरा हजार चौरस फुटांत दालनाचा विस्तार आहे. त्यामुळे ग्राहकांना निवांतपणे या ठिकाणी दागिन्यांची खरेदी करता येणार आहे. तसेच, पार्किंगची सोयही या ठिकाणी केली आहे. याचबरोबर सोलापूरकरांना कलेचा आस्वाद घेता यावा यासाठी येथे आर्ट गॅलरी सुरू केली आहे. पीएनजी सन्सची महाराष्ट्र, कर्नाटक व गुरजार मिळून तीन दालने आहेत. तसेच, गार्गी बाय पीएनजी अँड सन्स हा प्रीमियम फॅशन ज्वेलरीची देशातील पहिला शेअर बाराजारातील लिस्टेट ब्रँड आहे. कंपनीचे सीईओ अमित मोडक म्हणाले, की ग्राहकांच्या बदलणाऱ्या गरजा लक्षात घेऊन हे दालन डिझाइन केले आहे. ग्राहकांना नवीन प्रकारच्या खरेदीचा अनुभव मिळावा, अशा पद्धतीने शोरूमची रचना आहे. ग्राहकांना डिझायनर ज्वेलरीबरोबर मास्टर पीसेस आणि क्यूरेटेड कलेक्शनच्या व्हरायटीतून आवडीचा दागिना निवडता येईल. हिऱ्याच्या दागिन्यांची सर्वोत्तम व सर्वांत मोठी व्हरायटी येथे उपलब्ध आहे. त्याचबरोबर गार्गी बाय पीएनजी अँड सन्सची नॅचरल डायमंडची १४ कॅरेट गोल्डमधील व चांदीची प्रीमियम फॅशन ज्वेलरी उपलब्ध आहे.

## राज्यातील शाळा बंद ठेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर २५ सप्टेंबरला मोर्चा

### शासन निर्णय रद्द करावेत यासाठी राज्यातील शिक्षक संघटनांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षक संचमान्यतेत बाबत दि.१५/०३/२०२४ चा व कंत्राटी शिक्षक भरती बाबतचा दि. ०५/०९/२०२४ चा शासन निर्णय वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने सदरचे दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा दि.२५ सप्टेंबर रोजी बंद ठेवून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्धार पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यातील सर्व संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला. असे असताना महाराष्ट्र शासनाकडून दि. १५/०३/२०२४ च्या शासननिर्णय द्वारे शिक्षक निश्चितीचे जाहीर केलेले निकष हे




वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक आहेत. वाडीवस्तीवर जन्म झाला म्हणून पटसंख्येअभावी शिक्षक कमी करून तेथील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणापासून वंचित ठेवणे हा त्या विद्यार्थ्यांवर अन्यायच आहे. वाडी-वस्तीवर जन्म झालेल्या विद्यार्थ्यांचा दोष तरी काय? त्याला इतर शाळांमधील विद्यार्थ्यांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळण्याचा हक्क व अधिकार बालकांच्या मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिनियमाने दिला आहे तो हक्क शासनास डावलता येणार नाही असेही मत सर्व उपस्थितांनी व्यक्त केले.

आजच्या बैठकीस शिक्षक संघाचे नेते संभाजी थोरात, शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष केशव जाधव (शिवाजी पाटील), शिक्षक समितीचे नेते उदय शिंदे व राज्याध्यक्ष विजय कोंबे, पुरोगामी शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, आदर्श शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष शिवाजीराव साखरे, आखिल भारतीय शिक्षक संघाचे किरण पाटील, शिक्षक सेनेचे चिंतामणी वेखंडे, शिक्षक भारतीचे राज्याध्यक्ष नवनाथ गेंड, पदवीधर शिक्षक संघटनेचे अनिल पलांडे, मनोज मराठे, पंजाबराव देशमुख संघटनेचे राज्याध्यक्ष प्रभाकर झोड, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे राज्य सरचिटणीस सतिश कांबळे, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे यादव पवार, शिक्षक सहकार संघटनेचे निलेश देशमुख, ऊर्दू शिक्षक संघटनेचे साजीद अहमद, जुनी पेन्शन संघटनेचे तुषार पाटील व शहाजी गोरवे, एम एड कृती समितीचे राजू सावकार जाधव, इब्टा शिक्षक संघटनेचे उतरेश्वर मोहलकर, राज्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक समन्वय महासंघ मधुकर काटोळे, एकल शिक्षक सेवा मंच राज्याध्यक्ष विकास खांडेकर, पल्लवी गायकवाड, प्रकाश घोळवे, अंकुश काळे, पवन सुर्यवंशी, एस के पाटील, संजय जाधव, तुषार पाटील, शशिकांत पोवार आदी सर्व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### आकृतीबंध लागू करण्याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी

बालकांच्या मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ अन्वये शिक्षक निश्चितीचे निकष सन २०११ पासून आपल्या राज्यात लागू करून १३ वर्षे झाली तरी अद्याप अधिनियमातील तरतुदीनुसार प्राथमिक स्तर इयत्ता १ ते ५ व उच्च प्राथमिक स्तर ६ ते ८ हा आकृतीबंध अध्याप लागू केलेला नाही. आकृतीबंध लागू करणेबाबत शासन निर्णयही झालेत मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने बालकाच्या सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या अधिनियमाचे उल्लंघन होत आहे.

### शासनाच्या अन्यायकारक निर्णयामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय

आज झालेल्या बैठकीत शासनाच्या अन्यायकारक शासन निर्णयामुळे राज्यातील १५ हजार शाळांमधील १ शिक्षक कमी होवून १५ हजार शाळांमधील सुमारे २ लाख विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असल्याने सदरचे शासन निर्णय शासनाने तात्काळ मागे घ्यावेत असे मत सर्व संघटना प्रतिनिधींनी व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८८८

**काय जाहले न वाहतां भुई पेरिजे । तरी तो वेळु विलंया जाइजे।**
**तरी आतां माझें निजरुप देखिजे । तें दृष्टी देवों तुज ।।**

अर्जुनाला योग्यता न देता विश्वरुप दाखविल्याने ते रुप त्याला दिसलेच नाही. म्हणून यात माझा कमीपणा नसून तो तुझाच कमीपणा आहे असे अर्जुन भगवंतांना स्पष्ट म्हणाला. स्वच्छ आरसा आंधळयापुढे धरायचा आणि त्याला तुझे स्वरुप पहा असे म्हणायचे, किंवा बहि-यापुढे गायण करुन तुला गायन कसे वाटले असे विचारायचे हे योग्य वाटत नाही. त्याप्रमाणे हे विश्वरुप पाहण्याची पात्रता माझ्या अंगी न देता विश्वरुप दाखवायचे हे योग्य नाही. असे अर्जुन म्हणाला. त्यावर भगवान म्हणाले अर्जुना, तुझ्या प्रेमात मी तुला विश्वरुप पाहण्याचे सामर्थ्य देण्याचे विसरुन गेलो. त्यामुळे काय झाले हे सांगतांना भगवंत म्हणाले, काय जाहले न वाहतां भुई पेरिजे । तरी तो वेळु विलंया जाइजे । तरी आतां माझें निजरुप देखिजे । तें दृष्टी देवों तुज ।।. अर्थात, जमीनीची मशागत न करता म्हणजे न नांगरता त्यात बी पेरले तर सर्व कष्ट वायाच जातात, त्यात उगवलेला वेल, रोपटे पुढे फोफावत नाही.



त्याप्रमाणे मी तुला दृष्टी न दिल्याने वेळ व माझे विश्वरुप दाखविण्याचे कार्य वाया गेले असे भगवंत म्हणाले. अर्जुना तुला जेव्हा माझे विश्वरुप दर्शन होईल. तेव्हा तुला आत्मसुख लाभेल. तुला कळुन चुकेल की, माझ्या समोर लहान-मोठा असा भेद नाही. मला सर्व समान आहेत. मी म्हणजे सर्व जीवमात्राचे एकत्रिकरण आहे. या विश्वरुपामुळे तुला समतेची दृष्टी प्राप्त होईल, असे भगवंत म्हणाले. युध्दभूमीवर घडत असलेल्या या सर्व बाबी संजय, राजा धृतराष्ट्राला सांगत आहे. हे विश्वरुप पाहून व श्रीकृष्ण अर्जुनाचा संवाद ऐकुन संजयाला आनंदाच्या उकळया फुटत आहेत. जे विश्वरुप व गुहय ज्ञान आपल्या पत्नी, आपल्या सेवकांना, आप्तेष्टांना दाखविले व सांगीतले नाही ते अर्जुनाला दाखवित असल्याने व सांगत असल्याने अर्जुनाची स्तुती संजय राजासमोर करीत आहे. अर्जुनाप्रमाणे संजयही अत्यंत भाग्यवान आहे. कारण राजा धृतराष्ट्राला सांगण्याच्या निमित्ताने त्याला हे सर्व पाहायला आणि ऐकायला मिळत आहे. अर्जुन रागावला तर भगवंत ते सहन करीत आहेत. अर्जुन रुसला तर भगवंत त्याची समजूत काढत आहेत. भगवंताला अर्जुनाचे जणू वेडच लागले आहे. अर्जुनासाठी वाट्टेल ते करण्याची भगवंतांची मानसिकता असल्याचे संजय राजाला सांगत आहे. राजा धृतराष्ट्र पुत्रमोहात गुंतलेला असल्याने संजयाने सांगीतलेले वक्तव्य राजाला अजिबात आवडले नाही. उलट राजा हे ऐकुन नाराज होत असल्याचे संजयाच्या लक्षात आले. पुत्र मोहामुळे सत्य व चांगले ऐकण्याची इच्छा सुध्दा राजाला राहिली नाही, हे पाहून संजयाला वाईट वाटले. आपण ज्याची चाकरी करीत आहोत त्याच्याशी प्रामाणीक राहण्याची संजयाची वृत्ती असल्याने संजयाला वाईट वाटले. श्रीकृष्ण-अर्जुनाच्या या आनंदात आपल्या प्रमाणे राजानेही सहभागी रहायला पाहिजे होते असे संजयाला मनोमन वाटत होते. पण पुत्र मोहाने राजाच्या बुध्दीवर पडदा पडला होता. हा पडदा बाजुला सारने संजयाला शक्य नव्हते. आपण संसाराच्या मोहात अडकलो असल्याने संत महात्म्यांनी लिहुन ठेवलेले ज्ञान आपण मोकळेपणाने स्वीकारत नाही. मोहाचा पडदा बाजुला सारुन आपण हे ज्ञान स्विकारले पाहीजे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# झेडपी शाळांतील पटसंख्या वाढली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

जिल्हा परिषद सोलापूर : बूट, टाय आणि आकर्षित करणारे रंगीत गणवेश, रंगरंगोटी केलेल्या उंच इमारती, बागबगीचा यामुळे खासगी शिक्षण संस्थांच्या शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा कल वाढत असल्याने जिल्हा परिषद, महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या शाळांमधील मुलांची संख्या कमी होताना दिसत आहे. मात्र, यावर्षी जिल्हा परिषद शाळांना 'अच्छे दिन' आले आहेत. यावर्षी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या १ लाख ९० हजार ४३१ इतकी आहे. या पटसंख्येत दर वर्षी वाढ होताना दिसून येत आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुलांनादेखील शक्य आहे त्याठिकाणी ऑनलाईन शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. डिजिटल शाळांमध्ये सोलापूर जिल्हा परिषद आघाडीवर आहे.

जिल्हा परिषद सोलापूर : ग्रामीण भागातील नागरिकांचा जि.प.शाळांवर विश्वास

गुणवत्तेत अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत सोलापूर जि.प.च्या शाळा पुढे आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत




अजूनही सोलापूर जिल्हा परिषदेतील शाळांतील मुलांची संख्या अधिक असते. जिल्हा परिषदेच्या काही शाळांमधील शिक्षक विविध उपक्रम राबवितात, शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी जादा तास घेतात. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचा जि.प.शाळांवर विश्वास आहे. जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीनेही विशेष उपक्रम राबविले जातात. त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्या वाढली आहे. माळशिरस तालुक्यात सर्वाधिक २४९६४ पटसंख्या वाढली आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील पटसंख्या ८९१४ कमी झाली आहे.

**तालुकानिहाय वाढलेली पटसंख्या**

| तालुका | पटसंख्या |
|---|---|
| अक्कलकोट | २१०३३ |
| बार्शी | ११९६६ |
| करमाळा | १३६४६ |
| माढा | १८९१३ |
| माळशिरस | २४९६४ |
| मंगळवेढा | ११७४८ |
| मोहोळ | २०४८१ |
| पंढरपूर | २०२७४ |
| सांगोला | १८५९६ |
| उत्तर सोलापूर | ८९१४ |
| दक्षिण सोलापूर | १९८६ |
| एकूण | १९०४३१ |

| | |
|---|---|
| जिल्हा परिषद प्राथमिक शाळा | २७७७ |
| पहिली ते पाचवी शाळा | २७७७ |
| पाचवी ते आठवी शाळा | ७४१ |
| विद्यार्थी संख्या | १३४५३ |
| शिक्षक संख्या | ९२९३ |

# 'मृत्यू हेच अंतिम सत्य'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

आपल्यातले बहुतेक जण मरणाला घाबरतात.त्यांना मरणाची भीती वाटते.या जगात कोणीच अमर नाही.या जगात एकच गोष्ट निश्चित आहे आणि ती म्हणजे मृत्यू.मृत्यू हेच अंतिम सत्य असतानाही मरणाची चिंता कशाला करायची,सत्य स्वीकारायला हवे' असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

ज्याच्या गरजा कमी असतात त्याची अस्वस्थता कमी असते. जीवन सुखावह होण्यासाठी संपत्तीची आवश्यकता असते.मात्र संपत्ती कसे मिळवावे आणि मिळवलेल्या संपत्तीचा वापर कसा करावा याचा विवेक माणसाजवळ असला पाहिजे. माणसं अक्षरशः वेड्यासारखी पैशाच्या मागे पळत असतात.जसे काही जाताना सगळे घेऊनच जायचे आहे इथे सोडून जायची तयारी कोणाचीच नाही.फक्त संग्रह करायची इच्छा,सोडायची इच्छा कोणालाच नाही. सोन्याची




लंका सोडून रावण गेला,जगत्जेता सिकंदर काहीही न घेता गेला अशी कितीतरी उदाहरणे आपल्यापुढे आहेत.येताना रिकाम्या हाताने आलेलो आहोत आणि जातानाही रिकाम्या हातानेच जायचे आह,हेच सत्य आहे तरी देखील प्रत्येक जण फक्त पैसा पैसा करतो.

मनुष्य हा नुसता कल्पना विश्वात वावरत असतो. कल्पना करायला पैसा,शक्ती काहीच लागत नाही. मग नुसत्या कल्पना करायला काय हरकत आहे.फक्त कल्पना करायच्या, कृती मात्र शून्य.कल्पना विश्वात भरकटण्यापेक्षा कृती करा. कृती शून्यतेमुळे सर्व स्वप्न व कल्पना चुराडा होऊन मातीत मिसळतात.



# मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्काराने रेवणसिद्ध रोडगीकर सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे माजी विद्या सचिव रेवणसिद्ध रोडगीकर यांना मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

शनिवारी, हुतात्मा स्मृती मंदिर येथे सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात शिक्षक आमदार जयंत आसगांवकर यांच्या हस्ते माजी विद्या सचिव रेवणसिद्ध रोडगीकर यांना मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे , माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप,प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, प्रशासनाधिकारी संजय जावीर लेखाधिकारी वैभव राऊत, मुख्याध्यापक संघाचे नियंत्रित समितीचे अध्यक्ष सुभाष माने, जिल्हा अध्यक्ष तानाजी माने, सचिव बापू निळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी रोडगीकर यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. मुख्याध्यापक संघाने रोडगीकर यांचा मुख्याध्यापक जीवन गौरव पुरस्काराने केलेला सन्मान म्हणजे मुख्याध्यापक संघासाठी केलेल्या कार्याचा गौरव आहे, असे गौरवोदगार शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी केले.

## माणिक यादवांचा रंगला हँसी के गुब्बारे कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

एलआयसी शाखा, सात रस्त्याचे सिनीयर ब्रँच मॅनेजर भाऊसाहेब लबडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली विमा सेवा सप्ताह पार पडला. यात माणिक यादव यांचा हँसी के गुब्बारे हा सदाबहार कॉमेडी कार्यक्रम पार पडला.

निमित्त होते एलआयसीच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त विमा सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी मयुर पंतोजी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी माणिक यादवांनी आपल्या खुमासदार शैलीत अनेक विनोदी किस्से सांगून प्रेक्षकांना खिळवून ठेवले. कार्यक्रमास माजी प्राचार्य वसिष्ठ सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. विमा सेवा सप्ताहाचे उद्घाटन निहारिका ग्रुपचे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अजय बुरा यांच्या हस्ते झाले. यावेळी गणेश सावंत अध्यक्षस्थानी होते. एलआयसी सात रस्ता शाखेच्या सर्वांनी एक हजार वृक्ष लागवडीचा संकल्प हाती घेतला यात महिला विमा प्रतिनिधी नेमणूक हा कार्यक्रम पार पडला. विमा सेवा सप्ताह यशस्वी करण्यासाठी प्रफुल्लकुमार साखरे प्रशासनाधिकारी धाराशिवकर, भालेराव, सहा. प्र.अधिकारी साखरे, लिमये यांनी परिश्रम घेतले. आभार मयूर पंतोजी यांनी मानून या विमा सेवा सप्ताहाची सांगता केली



# सण, उत्सव समाजाला दिशा देणारे असावेत : डॉ. अमृतानंद महास्वामी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

भंडारकवठे (ता. दक्षिण सोलापूर) भारतीय संस्कृतीमधील सण, उत्सव हे समाजाला दिशा व लोक कल्याणकारी असायला हवे. भारतीय संस्कृती जगात सर्वात श्रेष्ठ मानली जाते. भारतीय सण व उत्सव निसर्गाची जपणूक करणारी आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव ब्रिटिश राजवटीचे उच्चाटन करून स्वराज्य उभा करण्यासाठी सुरू करण्यात आला होता. आत्ता हे उत्सव समाजाच्या प्रगतीसाठी, लोक कल्याणकारी व्हायला हवी, असे मत गुरू देव आश्रम बालगाव येथील डॉ. अमृतानंद महास्वामी यांनी व्यक्त केले.

गणेश युवक मंडळ आयोजित अध्यात्मिक प्रवचनात ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, उत्सवातील अतिरिक्त खर्च टाळून समाजाला प्रेरणा देणारे कार्यक्रम महिला सुरक्षा, स्वच्छता, कृषी जन जागृती अभियान, रक्त दान, मैदानी खेळ, योगा, अन्नदासोह सारखे कार्यक्रम घ्यावे, असे मत त्यांनी मांडले. या कार्यक्रमाला अमसिद्ध महाराज, बालगाव सिद्धाराम पाटील, सोरेगाव व सिधगौडा पाटील, निवर्गी (कर्नाटक) यांची उपस्थिती लाभली.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार
दि. १६ सप्टेंबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - भाद्रपद
शु. त्रयोदशी (१५.१०)
ऋतु - वसंत
नक्षत्र- धनिष्ठा (१६.३२)
योग - सुकर्मा (११.४१)
करण - गर (२५.२९)
दिनविशेष -
कन्या संक्रांती
ईद-ए-मिलादुन्नबी
चांगला दिवस.

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नौकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी

**वृषभ** : आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

**मिथुन** : नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू

**कर्क** : व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील.

**सिंह** :व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**कन्या** : पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या.

**तुळ** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठाा व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

**वृश्चिक** : प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल.

**धनु** : कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**मकर** : आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ** : आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका.

**मीन** : आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल.



# सातलिंग शटगार यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार श्रीदत्त प्रशाला कॉलेजचे प्राचार्य सातलिंग शटगार यांना प्रदान करण्यात आला.

सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे पुणे विभागीय शिक्षक आमदार जयंत तासगावकर यांच्या हस्ते माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने, आजी अध्यक्ष सुभाष माने शहर अध्यक्ष श्रावण बिराजदार, विद्यानंद स्वामी, महेश सरवदे, चलगेरी, अंबादास चाबुकस्वार, कुंभार, अनिल पाटील हातुरे आदींच्या उपस्थितीत सन्मानपत्र शाल फेटा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक संघाचे राज्य जिल्हा शहर पदाधिकारी उपस्थित होते. संघातर्फे आदर्श मुख्याध्यापक आदर्श शिक्षक आदर्श शाळा आदर्श शिक्षकेतर कर्मचारी आदि पुरस्कार जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना देण्यात आले यावेळी जिल्ह्यातील सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुन्हा एकदा चौरंग चित्रपटाचा टिझर प्रदर्शित

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

पुन्हा एकदा चौरंग या सिनेमाचा टिझर आणि पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. आता मेणबत्ती नाही, होईल तो चौरंग असे म्हणत या चित्रपटाने जणू अन्यायाविरोधात एक लढाच पुकारला आहे.आरोही फिल्म्सच्या बॅनरखाली निर्माते राजेंद्रकुमार गुलाबराव मोहिते आहेत.ज्योती राजेंद्रकुमार मोहीते सहनिर्मात्या आहेत.सागर दिनकरराव मोहिते यांनी दिग्दर्शनाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. पुन्हा एकदा चौरंग हे शीर्षक खऱ्या अर्थाने चित्रपटाचा रंग दाखवणारे आहे. ही लढाई न्याय-अन्यायाची असल्याचे पोस्टर पाहिल्यावर सहजपणे जाणवते. आता मेणबत्ती नाही... ही टॅगलाईन थेट हृदयाला भिडते.याबाबत दिग्दर्शक सागर दिनकरराव मोहिते म्हणाले की, पुन्हा एकदा चौरंग हा चित्रपट रसिकांना विचार करायला लावणारा आहे.



# राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने शिवाजी व्हनकडे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य व मंत्रालय समन्वय समिती मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचे औचित्य माधव नगर येथील एन. बी बंडा प्रशालेतील शिवाजी व्हनकडे यांना राज्यस्तरीय विशेष जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आला.

सिंहगड इंजिनियर कॉलेज केगाव येथे आयोजित राज्यस्तरीय आदर्श शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी पुरस्कार वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, संयोजक व सदस्य मंत्रालय समन्वय समिती मुंबई बापूसाहेब अडसूळ, प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी व्हनकडे आदी उपस्थित होते. शैक्षणिक, सामाजिक आणि आध्यात्मिक, वारकरी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल आजतागायत आदर्श शिक्षक, गुणवंत शिक्षक, आदर्श गुरुवर्य, समाजभूषण, शिक्षक रत्न, राष्ट्रीय उपक्रमशील शिक्षक असे आत्तापर्यंत जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तर अठरा ते वीस पुरस्कार मिळालेले आहेत. शासनमान्य राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक, विद्यार्थी त्याचबरोबर सर्वस्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# रमाई आवास योजनेसाठी नव्या अर्जाची छाननी, पडताळणी सुरू

**महापालिका समूह संघटकांकडून प्रत्यक्ष जागेवर जाऊन होतेय पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ सप्टेंबर-**

शहरातील रमाई आवास योजनेसाठी नव्याने दाखल केलेल्या अर्जाची छाननी व पडताळणी प्रक्रिया महापालिकेतील समूह संघटनेच्या माध्यमातून केली जात आहे. अर्जदारांच्या जागेवर समक्ष पाहणी करून व कागदपत्राची पडताळणी करण्यात येत आहे. संबंधितांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या वतीने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी रमाई आवास योजना राबवण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. अनुसूचित जातींच्या व्यक्तींना त्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे स्वतःच्या उत्पन्नातून चांगल्या प्रकारचे पक्के घर बांधणे शक्य होत नाही. अनुसूचित जातींच्या लोकांचे राहणीमान उंचावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी योजना सोलापूर महानगरपालिका व समाज कल्याण सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने सन २०११ पासून सोलापूर शहरांमध्ये यशस्वीरित्या राबवली जात आहे.

सोलापूर महानगरपालिकेमध्ये स्वतंत्र रमाई आवास योजना कक्ष स्थापन करण्यात आला आहे.या ठिकाणी ज्या अनुसूचित जातीतील नागरिकांना अद्यापही लाभ घेतलेला नाही. त्यांनी योजनेस अनुरूप व निकषानुसार कागदपत्रे व अर्ज दाखल करण्यात यावे. सध्या सोलापूर महापालिकेकडे नव्याने अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जाची छाननी व पडताळणी करण्याकरिता महापालिकेच्या वतीने ४ समूह संघटक यांची नेमणूक केली आहे. जे लाभार्थी यांच्या जागेवर समक्ष पाहणी करून व कागदपत्राची पडताळणी करण्याकरिता भेटी देत आहेत.

**२ हजार ७४५ घरकुलांचे काम पूर्ण**

रमाई आवास योजनेअंतर्गत आज पर्यंत सोलापूर महानगरपालिकेकडे ३ हजार ८३९ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २ हजार ७४५ लाभार्थ्यांनी घरकुले पूर्ण करून त्यामध्ये आपल्या कुटुंबासह वास्तव्य करीत आहेत. परंतु ४०५ लाभार्थ्यांनी पहिला हप्ता व दुसरा हप्ता घेऊन देखील त्यांच्या घरकुलांचे काम अर्धवट ठेवले आहे.



# अभिवृद्धी ग्रंथालयमतर्फे राष्ट्रीय हिंदी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम यांच्या वतीने राष्ट्रीय हिंदी भाषा दिन साजरा करण्यात आला. कवी नरेंद्र गुंडेली यांच्या हस्ते देवी सरस्वती माता व गणेशाचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

याप्रसंगी कवी नरेंद्र गुंडेली यांनी हिंदी भाषा दिनाचे महत्त्व विशद केले.प्रास्ताविक ग्रंथालयाचे सचिव तिपण्णा गणेरी तर आभार प्रभाकर भीमनाथ यांनी मानले. यावेळी ग्रंथालयाचे सदस्य श्रीनिवास यनगंदूल, ग्रंथपाल विजयालक्ष्मी गुडूर, दत्तात्रय महेश्वरम, रेवणसिद्ध पुजारी, कुमार दासरी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### हन्नूरमधील 'अनंत चैतन्य'च्या बाप्पाला निरोप

**अक्कलकोट, दि. १५ सप्टेंबर-**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अत्यंत जल्लोषमय वातावरणात बाप्पाना निरोप दिला. शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या हस्ते श्री. गणेशाची पूजा करून मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली. यावेळी शिवानी बाळशंकर हिने वैयक्तिक नृत्य तर अन्य मुलींनी एकदंताय वक्रतुंडाय गौरी तनया यदिमही या गाण्यावर अतिशय सुंदर नृत्य सादर केले. मुला-मुलींनी अत्यंत सुरेख अशाप्रकारे लेझीम नृत्य सादर केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी मोरया रे बाप्पा मोरया रे असा एकच जल्लोष करत मिरवणुकीत सामील झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या समूहगीत नृत्य व लेझीम नृत्याकडे रस्त्याच्या दुतर्फावर उभ्या असलेल्या गावकऱ्यांनी अत्यंत नवलाईने पाहत प्रतिसाद दिला. सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे यांच्या हस्ते विसर्जनापूर्वी अखेरची पूजा, आरती झाली. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर याच्या गजरात व भावमय वातावरणात श्रीचे विसर्जन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक अशोक साखरे, पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे व समस्त शिक्षक-शिक्षकेत्तर वृंद व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



### महाराष्ट्र विद्यालयामध्ये हिंदी दिवस साजरा

**बार्शी, दि. १५ सप्टेंबर-**


महाराष्ट्र विद्यालय बार्शी येथे हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. १४ सप्टेंबर हा दिवस हिंदी दिवस म्हणून सबंध देशांमध्ये साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र विद्यालयामध्ये हिंदी दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्या के.डी. धावणे होते. उपमुख्याध्यापक सपताळे उपस्थित होते. धावणे यांनी आपल्या मनोगतात हिंदी भाषेचा प्रचार आणि प्रसार होणे आवश्यक आहे, त्याचबरोबर विद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने हिंदी भाषेमध्ये सुसंवाद साधला पाहिजे, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक महामुनी, पर्यवेक्षिका साठे उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी वायकुळे, मदने, माने, श्रीमती शिंदे, वाघमारे, चौधरी, कांदडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कुमारी प्रगती वीर व श्रद्धा महात्मे यांनी केले तर कार्यक्रमाचा आभार आरती बरडे हिने मानले.



### ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लबची संचिती जाधव हिने स्केटिंग स्पर्धेत मिळविला प्रथम क्रमांक

**बार्शी, दि १५ सप्टेंबर-**

ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लब,बार्शी संचलित, विश्वजीत रोलर स्केटिंग क्लासेस, बार्शीमधील कु. संचिती भगवान जाधव हिने स्केटिंग स्पर्धेत मिळविला आहे. लातूर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्यावतीने घेण्यात आलेल्या शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेत रिलायन्स कॉलेज, लातूरची विद्यार्थिनी कु. संचिती भगवान जाधव हिने १९ वर्षाखालील गटात इनलाईन स्केटिंग स्पर्धेत पहिला क्रमांक मिळविला आहे. संचितीला संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, उपाध्यक्ष गणेश रोडे, सचिव सविता जाधव, प्रा. अविनाश जाधव, तेजस जाधव, क्रीडाशिक्षक पटवारे, योगेश जाधव, स्नेहल रोडे यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### आचेगावमध्ये दुसऱ्यांदा एक गाव, एक गणपती

**वळसंग, दि. १५ सप्टेंबर-**

आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथे सलग दुसऱ्या वर्षी एक गाव, एक गणपती असून, याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. वळसंग पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अनिल सनगल्ले यांच्या हस्ते श्रीची पूजा करण्यात आली. यावेळी वृक्षांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार, पोलीस हवालदार अशोक पाटील, उपसरपंच रफिकभाई मुल्ला, पोलीस पाटील प्यारन मुल्ला, तंटामुक्त अध्यक्ष शावरसिद्ध पाटील, सिलिसिध्द खांडेकर, मंडळाचे अध्यक्ष अमोघसिध्द पाटील, उपाध्यक्ष गणेश खांडेकर, सचिव गिरीश बाळगे, खजिनदार नारायण वाघमोडे, चंद्रकांत शिलेणी, सुरेश मोची, मालू शिलेणी, भागाणा खांडेकर, मल्हारी वाघमोडे, राजू वाघमोडे, हरी गुरव, शावरसिद्ध बिराजदार, प्रदीप गुरव, मल्लू कोरे आदी उपस्तिथ होते.

# बोरी उमरगेचे सरपंच, ग्रामसेवकांचा प्रताप

## बंद असलेले वॉटर फिल्टर मशीन बसवून तीन लाख रुपये घातले खर्ची

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ सप्टेंबर-**

तालुक्यातील बोरी उमरगे येथील सरपंच निर्मला बिराजदार व ग्रामसेवक श्रीकांत ठेंगील यांनी बंद, निकृष्ट वॉटर फिल्टर मशीन बसवून दोन लाख ९० हजार ८२१ रुपये खर्ची घातले आहेत. मशीन बसविल्या दिवसापासून म्हणजे गेल्या दीड वर्षांपासून आजपर्यंत वॉटर फिल्टर मशीन बंद आहे. सरपंच, ग्रामसेवकांच्या मनमानी कारभारामुळे शासनाचा पैसा वाया गेला असून उमरगे येथील मोची समाजातील नागरिकांना शुध्द फिल्टरचे पाणी मिळेना.

> लक्ष्मण बसप्पा अस्वले व इतर ४६ जण (रा. बोरीउमरगे, ता. अक्कलकोट) यांच्याकडील तक्रार पत्रात नमुद केलेल्या बाबीवर चौकशी करुन योग्य त्या नियमानुसार कारवाई करून ग्रामपंचायतस्तरावर अर्ज निकाली काढण्याबाबत उपअभियता, बांधकाम, उपविभाग अक्कलकोट यांना २७ ऑगस्ट २४ रोजी लेखी आदेश दिली आहे.
> **- शंकर एस. कवितके,**
> गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट

याबाबत बोरी उमरगे येथील मोची समाजातील लक्ष्मण बसण्णा अस्वले, छाया दत्तात्रय अस्वले, तिप्पव्वा लक्ष्मण अस्वले यांच्यासह ४४ जणांनी जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. मागासवर्गीय मोची समाजामध्ये १६ मे २०२३ मध्ये शासनाचे १५ व्या वित्त आयोगामधून२ लाख ९० हजार ८२१ रुपये खर्चून मोची समाजातील नागरिकांना शुध्द फिल्टरचे पाणी मिळावे म्हणून वॉटर फिल्टर बसविण्यात आले. परंतु सरपंच निर्मला बिराजदार व त्यांचे पती नागेश बिराजदार, महिला सरपंचाचे दीर संतोष बिराजदार, ग्रामसेवक श्रीकांत ठेंगील यांनी बंद असलेली निकृष्ट मटेरिअल वापरुन फिल्टर मशीन बसविली आहे. मशीन बसविल्या दिवसांपासून म्हणजे गेल्या दीड वर्षांपासून आजपर्यंत बंदच आहे. यामुळे उमरगे येथील मोची समाजातील नागरिकांना शुध्द फिल्टरचे पाणी मिळालेच नाही.

मागासवर्गीय मोची समाजामध्ये जमीनीमध्ये सिमेट पाईप घालून बंदिस्त गटारी केलेल्या असून ७ ते ८ चेंबर्स सोडले आहे. त्यापैकी ५ चेबर हे उघडेच आहेत. त्या चेंबरवरील झाकण हे हलक्या दर्जाचे असल्यामुळे फुटून आतमध्येच पडलेले आहे. गेल्या दीड ते दोन वर्षांपासूनन चेंबर उघडेच असल्यामुळे त्यामधून दुर्गंधी येत आहे. मच्छर, डास, डेंग्यूसारखे गंभीर आजार होण्याची दाट शक्यता आहे. चेंबर हे वेळोवेळी ब्लॉकेज होत असून त्यामधील घाणपाणी बाहेर रस्त्यावर तळ्यासारखे साचत आहे. परवाच दोन महिन्यांपूर्वी एक छोटीसी मुलगी उघड्या चेंबरमध्ये पडल्यावर तात्काळ आजूबाजूच्या नागरिकांनी बाहेर काढल्याने अनर्थ टळला. या धोकादायक घटनेबाबत जनतेने महिला सरपंच निर्मला बिराजदार व पती नागेश बिराजदार, ग्रामसेवक श्रीकांत ठेंगील, महिला सरपंचाचे दीर संतोष बिराजदार यांच्या निर्दशनास आणून दिले असतानाही उघडे चेंबर बंद केलेले नाहीत.

दोनवेळा उघड्या चेंबरसंबधी मोची समाजातील सामाजिक कार्यकर्ते देवानंद अस्वले यांनी व सामाजातील काही महिलांनी मोबाईल फोनद्वारे विस्तार अधिकारी (ग्रा. पं.) संजय पाटील यांनाही त्यासंबंधी माहिती दिली असतानाही उघडे चेंबर बंद केले नाहीत.

# मगध साम्राज्यात हरवून गेले अक्कलकोटकर

## आर्य चाणक्य नाट्य प्रयोग; उत्कंठावर्धक अनेक प्रसंगांचा घेतला अनुभव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ सप्टेंबर-**

निष्ठेला पात्र जनमुदाय असु शकतो. राजा होण हे सुखी होण्याचा मार्ग नव्हे! राजाच दिव्य कर्तव्य असाव लागतं. प्रजेच्या रक्षणाकरिता प्रजेच्या सुखाकरिता शांतीकरिता राजाला प्रजा रक्षणाकरिता लढाव लागतं. प्रजेकरिता सर्वस्वी बलिदानाची तयारी ठेवावी लागते. स्वत:च्या स्वार्थाकरिता प्रजेला युध्दाच्या खाईत लोटणारा राजा नव्हे! कुटनिती, कारस्थान शत्रूला कधीच जीवनदान द्यायचे नसते हीच खरी राजनिती. राजकारणातील छुपे शत्रू, प्रजा रक्षण, संधी, तह, द्रोह, राजकारणातील साम, दाम, दंड, भेद, निती मगध राज्याच्या सुख-समृद्धीसाठी आर्य चाणक्याने राज्य उलथून टाकण्याची घेतलेली शपथ



आदी उत्कंठावर्धक अनेक प्रसंग आर्य चाणक्य नाट्य प्रयोगाद्वारे अक्कलकोटवासीयांना अनुभवता आला.

रसिक काही काळ मगध साम्राज्यातच वावरत असल्याचा अनुभव नाट्य प्रयोगाद्वारा घेतला. विवेकानंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या वतीने गणेशोत्सव व्याख्यान सांस्कृतिक कार्यक्रम निमित्याने ६ वे पुष्प गुंफताना दोन अंकी आर्य चाणक्य या नाटकाचा प्रयोग प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन येथील रंगमंचावर दिमाखदार पणे सादर झाला. प्रेक्षकाने खचाखच भरलेला आर्य चाणक्य नाट्य प्रगोग कधी संपला हे प्रेक्षकानां कळलेच नाही. प्रेक्षक नाट्य प्रयोगात रममाण झाले होते. आर्य चाणक्य नाट्य प्रयोगातील चाणक्य निती त्यांनी गांभीर्यान पाहिली. प्रारंभी संचालक प्रशांत बडवे, गुरु वठारे, संदिप सरोदे, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष मल्लिनाथ स्वामी, अशोक कांबळे, विवेकानंद पतसंस्थेचे व्यवस्थापक चंद्रकांत दसले आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. संचालक प्रशांत बडवे, गुरु वठारे, निर्माते प्रमुख भुमिका वठवणारे शैलेष दातार आदी मान्यवरांचा व प्रकाश शिंदे, संदीप सरोदे, बालाजी पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ. सचिन कल्याणशेट्टी, संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, शिवशरण जोजन, मोतीराम राठोड, मल्लिनाथ मसुती, संयोजक अशोक येणगुरे, माजी नगरसेवक शिवशरण वाले, अप्पू रोडगे, बाळा शिंदे, धनंजय गाढवे, सुनिल गोरे , तोतला खमितकर, सुनिल लोकापुरे, अशोक स्थावरमठ, गणेश सुरवसे, प्रा. खंडेराव घाटगे, बापूजी निंबाळकर, महेश कापसे आदी उपस्थित होते.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत उद्योग उभारावेत

## सांगोला कृषी अधिकारी शिवाजी शिंदे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १५ सप्टेंबर-**

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी साठी ३५% अनुदान कृषी विभागामार्फत देण्यात येत आहे. सदरील योजना बँक कर्जाशी निगडित असून यामध्ये १० ते ४० टक्के स्वहिस्सा उभारणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत दुग्ध प्रक्रिया उद्योग, मसाले प्रक्रिया, तेल घाणे, डाळ प्रक्रिया, मिलेटस प्रक्रिया, बेकरी उद्योग, मका भरडा, पशुखाद्य, पापड उद्योग, फळे प्रक्रिया, भाजीपाला प्रक्रिया आदी प्रक्रिया ऊद्योग उभारणी करता येतात. या योजनेंतर्गत नवीन प्रक्रिया उद्योग किंवा जुन्या अस्तित्वात आसलेल्या प्रक्रिया उद्योगांचे विस्तारीकरण करता येते. सदर योजनेंतर्गत वैयक्तिक महिला किंवा पुरूष लाभार्थी लाभ घेऊ शकतात (शेतीची अट नाही).त्याचबरोबर बचत गट लाभार्थी(महिला व पुरूष गट), शेतकरी उत्पादक कंपणी, भागिदारी संस्था, सहकारी संस्था लाभ घेऊ शकतात. योजनेचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड, पनकार्ड, बँक पासबुक, जागेचा उतारा, जागा स्वत:चे नावे नसेल तर भाडेकरार, मशिनरीचे कोटेशन आदी कागदपत्रे सादर करावी लागतात. ईच्छुक नागरिकांनी जिल्हा संसाधन व्यक्ती, कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी आधिकारी कार्यालयास अर्ज व कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन सांगोला तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे यांनी केले आहे.

# राजू खरे यांच्या प्रयत्नातून आणखी एक कोटी निधी

## ग्रामविकास विभागाकडून चार कोटींची विविध कामे

## मोहोळ मतदारसंघात आजवर विविध विभागांतून कोट्यवधींचा निधी मिळवण्यात यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ सप्टेंबर-**

मोहोळ विधानसभा मतदार संघांचे संभाव्य उमेदवार उद्योजक राजू खरे यांनी मोहोळ मतदारसंघातील कोठ्यावधी रुपयाची विविध विकास कामे खेचून आणली आहेत. दोनच दिवसापूर्वी नव्याने एक कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या निर्देशानुसार, आ. भरतशेठ गोगावले यांच्या सहकार्याने ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांनी २५:१५ योजनेतून एक कोटी निधी मंजूर केला. यापूर्वीही ग्रामविकास विभागातून तीन कोटी झाले आहेत. आतापर्यंत चार कोटीचा निधी मिळाला आहे. यामुळे मोहोळ मतदारसंघांचे उमेदवार राजू खरे यांनी आभार व्यक्त केले आहे. एक कोटीतून फुलचिंचोलीतील बाळूमामा मंदिरचे पत्राशेड २० लाख, आंबे खंडोबा मंदिर संरक्षक भिंत २० लाख, गुळवंची हिंदू स्मशानभूमी सुधारणा १० लाख, खरसोळी रोकडोबा पालखी मंदिर व मारुती मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसाविणे १० लाख, सय्यद वरवडे हनुमान मंदिरासमोर सभा मंडप २० लाख, जामगांव बु. दलित वस्ती स्मशानभूमी वॉल कंपाऊंड शेड व पेव्हर ब्लॉक बसवण्यासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

> **लवकरच कामे सुरु होणार**
> डिकसळ येथील सोमसिद्ध मंदिरातील फरशी बसवणे व सुशोभीकरण करण्यासाठी १० लाखांचा निधी मंजूर आहे. यापूर्वीची विविध विकासकामेही सुरू करण्यात आली असून लवकरात लवकर ही कामे पूर्ण होणार आहेत, असे राजू खरे यांनी दिली सांगितले.

# वीज कंपनीवर कारवाई करण्याची सेनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ सप्टेंबर-**

दहिटणे (ता. अक्कलकोट) येथे विजेचा धक्का बसून शेतकरी अंबादास साळुंखे व पत्नी कलावती यांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. या घटनेला वीज कंपनी कारणीभूत असून, त्या कंपनीवर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी केली आहे.

उत्तर पोलिस ठाण्याला त्यांनी निवेदनही दिल आहे. हे निवेदन तहसीलदार, उपअभियंता राज्य विद्युत वितरण कंपनीला देण्यात आले. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख सुनील कटारे यांनी वारसांना मदत द्यावी अशी मागणी केली. याप्रसंगी सुनिल कटारे, शिवसेनेचे तालुका उपप्रमुख धनराज चव्हाण, शिवसेनेचे अयाज जमादार, गंगाधर धोत्रे घटनास्थळी जाऊन मयताच्या नातेवाईकांचे सांत्वन केले. विद्युत वितरण कंपनीच्या गलथान कारभाराविरोधात आंदोलन झेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनील कटारे यांनी दिला आहे.

# रणजितसिंह शिंदे यांच्या पाठीशी रहावे

## आ. बबनदादा शिंदे : मिटकलवाडीत विविध विकासकामांचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १५ सप्टेंबर-**

आजपर्यंत तालुक्याबरोबर मिटकलवाडीच्या विकासकामासाठी प्रयत्न केले आहेत आणि कामेही केली आहेत. पुढे रणजितसिंह शिंदे यांच्या पाठीशी उभे राहून येणाऱ्या निवडणुकीत मिटकलवाडीकरांनी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन आ. बबनराव शिंदे यांनी केले.



> **या कामांचा समावेश**
> याप्रसंगी मिटकलवाडी येथे छत्रपती चौक सुशोभीकरण, नवीन वर्गखोली, संरक्षण भिंत बांधणे, ओपन जीम, रस्ता काँक्रिटीकरण, लोकरे वस्ती, हनुमान मंदिरासमोर सभा मंडप, तांडा वस्ती काँक्रिटीकरण, दलित वस्ती काँक्रिटीकरण, रोजगार हमी ९५/५ मधून काँक्रीटीकरण, लोकरे वस्ती शाळेसमोर सौर दिवे, श्रीराम समर्थ बचत गटास भजनी साहित्य व ग्राम संघास खुर्चा व कपाट देणे अशा ८३ लाख रुपयांच्या कामांचे लोकार्पण करण्यात आले.

मिटकलवाडी येथे विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा आ. शिंदे व माजी सभापती विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. माढा तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी आम्ही प्रयत्नशील असून टेंभुर्णी व कुर्डूवाड नंतर मोडनिंब, सोलंकरवाडी व बावीच्या माळावर मोडनिंब येथे तिसरी एमआयडीसी उभे करण्यासाठी येत्या दोन दिवसात मंजुरीचे पत्र मिळणार आहे. मोडनिंब व परिसरातील गावांना याचा मोठा फायदा होणार आहे, असे आ. बबनराव शिंदे यांनी सांगितले. सरपंच अर्चना श्रीखंडे व उपसरपंच रवींद्र श्रीखंडे यांनी गावातील १८० गरजू महिला व पुरुष लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजना व श्रवण बाळ विहिरी व दहा गाईगोठे मंजुरीचे प्रमाणपत्र दिले.

याप्रसंगी विक्रमसिंह शिंदे, ग्रामसेवक नवनाथ दौंड, माजी सरपंच वंदना सुरवसे, संजय पाटील, तुकाराम ढवळे, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक भरत चंदनकर, विष्णू हुंबे यांच्यासह संजय पवार, दीपक पाटील, आप्पा पाटील, ब्रह्मदेव मस्के, महादेव घाडगे, माणिक लोकरे, दिलीप भोसले, मोहन लोकरे, माणिक मिटकल, नवनाथ सुरवसे, संजय मिटकल, संतोष सुरवसे, विष्णू मिस्किन, तात्यासाहेब सुरवसे, मधुकर लोकरे, लक्ष्मण ठेंगल, तानाजी लोकरे, दादा ठेंगल, सतीश मिस्किन, लहू मिस्कीन, दत्तात्रय सलगर, युवा नेते शशिकांत लोकरे, अक्षय श्रीखंडे, राजू देवकर, लक्ष्मण कोळी, सागर ठेंगल उपस्थित होते.

# छोट्या-छोट्या गोष्टींच्या आनंदातून जीवन बनते सुंदर

## गणेश शिंदे : बार्शीतील वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ लिंगायत बोर्डिंग व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि १५ सप्टेंबर-**

जीवन सुंदर व्हावे यासाठी निश्चित असा कोणताही फॉर्म्युला नाही; परंतु आयुष्यातील छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद घेतला तर जीवन नक्कीच सुंदर बनते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे यांनी केले. ते वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ बार्शी लिंगायत बोर्डींग येथे आयोजित व्याख्यानात ते 'जीवन सुंदर आहे' या विषयावर बोलत होते.



यानिमित्त सुप्रसिद्ध व्याख्याते शिंदे यांनी आपल्या व्याख्यानातून तब्बल दीड तास जीवनाचे अनेक पैलू उलगडून दाखवित, आपल्या अमृतवाणीने उपस्थितांना खिळवून ठेवले. माजी खा. शिवाजी कांबळे, उपाध्यक्ष रावसाहेब मनगिरे, अरुण बारबोले, पी. टी. पाटील, शिवदास नलावडे, सलीम चौधरी, धन्यकुमार पटवा, उमेश काळे, किरण मस्तानी, संस्थेचे सचिव शिवलींग मठपती, संचालक ॲड. सचिन शेटे, प्रभुलिंग स्वामी, गिरीष बरिदे, विवेक देवणे आदी उपस्थित होते. 'जीवन सुंदर आहे' या विषयावर विवेचन करताना शिंदे म्हणाले, माणूस कसा जगला आणि समाजासाठी त्याने काय योगदान दिले यावर त्याच्या जीवनाची सुंदरता ठरते. आज समोरच्या व्यक्तीला बरं वाटावं म्हणून लोक त्याच्या हो मध्ये हो मिसळतात. परिणामी नाही म्हणायला शिका.

निव्वळ भौतिक साधनांच्या जोरावर जीवन सुंदर होत नाही. जीवन सुंदर करण्यासाठी चांगल्या मार्गाने पैसे कमवा व त्या कमवलेल्या पैशांतुन आनंद घ्या. घेतलेला श्वास देखील सोडावा लागतो. आपल्या सर्वांना सर्व काही इथेच सोडुन जायचंय आहे. आपल्या जगण्याचं आपल्यालाही कौतुक वाटलं पाहिजे. चांगलं काम करण्याचं कौतुक केले पाहिजे आणि दोष असेल तर ते कानात सांगा.

काळ वेळ बदलतोय बदलत्या काळानुसार स्वत:लाही बदललं पाहिजे. नवीन तंत्रज्ञान, प्रणाली अवलंबली पाहिजे. आपण आपल्या बाजू ओळखाव्यात आणि आपल्या धुंदीत मस्तीत सुंदर जीवन जगाव. आपण विश्वस्त आहोत. आपणं येथे परमनंट नाहीत.

एक दिवस सर्वांना या जगाचा निरोप घ्यायचा आहे. ज्यांची परिस्थिती बेताची आहे, त्यांनी रडायचं नाही, आहे त्यात आनंद घ्यायला शिकायचं, जगणं सुंदर करण्याला कोणत्याही टॅबलेट उपलब्ध नाही, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला महिलांनी प्रचंड मोठी उपस्थिती लावली होती. रावसाहेब मनगिरे यांनी प्रास्तविक केले. शिल्पा मठपती यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. सचिन शेटे यांनी आभार मानले.

> **आईच्या स्पर्शापेक्षा मुलं मोबाईलच्या सान्निध्यात**
> सौंदर्य प्रसाधनाने थोड्या वेळ सुंदर दिसाल. पण जगणं सुंदर होणार नाही. मोठा पगार, मोठा बंगला म्हणजे सुंदर जगणे नाही. आईच्या स्पर्शापेक्षा लहान मुलं मोबाईलच्या सान्निध्यात शांत राहते, हा मातृत्वाचा पराजय आहे. प्रेम आणि वात्सल्य संपले की आपण यंत्र बनतो. आपल्याला माणूस बनायचे आहे की यंत्र, हे आता प्रत्येकाने ठरविले पाहिजे, असे गणेश शिंदे यांनी सांगितले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिवसेनेने केले अनोळखी इसमावर अंत्यसंस्कार

**अक्कलकोट, दि. १५ सप्टेंबर-**

आबावाडी शिवारातील शामराव लक्ष्मण राठोड यांच्या शेताजवळ एक अनोळखी व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत सापडल्याने त्याला अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे दाखल केले असता ती व्यक्ती मयत झाल्याच डॉक्टरांनी सांगितले. मयताची ओळख पटण्यासाठी चार दिवस ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आले



होते. ओळख पटली नसल्याने व नातेवाईक न भेटल्याने मयताच्या अंत्यविधीसाठी शिवसेनेने पुढाकार घेऊन अंतविधी केला. शिवसेना बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख सुनील कटारे, शहर उपप्रमुख गंगाराम धोत्रे, पीएसआय सूर्यकांत बिराजदार, पोलीस कॉन्स्टेबल महादेव माने, नगरपालिका आरोग्य खात्याचे मुकादम बालाजी पारखे व अमीन नदाफ यांनी अंत्यसंस्कार केले.

## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थिधातूंचे पंढरपुरात स्वागत

**पंढरपूर, दि. १५ सप्टेंबर-**

पंढरपूर नगरपरिषद प्रस्तावित बुद्धभूमी येथेतथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या पवित्र अस्थिसोबतच धम्मसेनापती असलेले प्रमुख शिष्य सारिपुत्त व महामोग्लायन यांच्या अस्थिधातू तसेच महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिधातुंचे पंढरपूर येथील बुद्धभूमीवर स्वागत करण्यात आल्याची माहिती सम्यक क्रंतीमंचचे संस्थापक सिद्धार्थ जाधव यांनी दिली. याप्रसंगी सम्यक क्रंतीमंचचे संस्थापक सिद्धार्थ जाधव, अध्यक्ष प्रशांत लोंढे, सचिव स्वप्नील गायकवाड, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रविंद्र शेवडे, जिल्हाध्यक्ष अक्षय सोनवणे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य दीपक वाघमारे, सल्लागार अशोक प्रक्षाळे, रिपाइंचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, शिवाजी आवारे, बहुजन हितकारीणी सभेचे अध्यक्ष रवी सर्वगोड, इंजिनिअर सार्थक लोखंडे, सुजित भोसले, शुभम सोनवणे, धम्म उपासिका स्नेहल जाधव, अध्यापिका शीला जाधव, स्मितल जाधव, प्रियांशू लोंढे, सुजाता भोसले, प्रज्ञा भोसले, श्रमिका शिंदे, चांदणी शिंदे, रंजना सोनवणे, सुमन भोसले, सृष्टी बाबर आदी श्रद्धाळूंनी दर्शन घेऊन अभिवादन केले.



### शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना निवेदन

**अणदूर, दि. १५ सप्टेंबर-**

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षकांच्या अनेक प्रलंबित मागण्याचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले. मुख्यमंत्री धाराशिव जिल्हा दौऱ्यावर आले होते त्यावेळी हे निवेदन संघाच्या अनेक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आले. या निवेदनामध्ये जुनी पेन्शन योजना लागू करावी, सुधारित संचमान्यतेचा नवीन जीआर रद्द करावा, २० विद्यार्थ्यांपेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांवर नवीन कंत्राटी शिक्षक नेमणुकीचा निर्णय रद्द करावा, १०० पटसंख्या असणाऱ्या शाळांवर मुख्याध्यापक नेमणुकीचा निर्णय त्वरित जाहीर करावा, आश्वाशित प्रगती योजना जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना सरसकट लागू करावी, शिक्षकांची बीएलओ कामातून मुक्तता करावी, केंद्रीय शाळेत वडाटा एन्ट्री ऑपरेटर ची नेमणूक करावी, सेवानिवृत्तीनंतर देण्यात येणारी सेवा उपदानाची रक्कम वाढवून २५ लाख रुपये करावी, प्रत्येक शाळेची संचमान्यता ही आधार व्हॅलीडवर न करता विद्यार्थी पटसंख्येवर करावी आदी शिक्षकांच्या मागण्या या निवेदनाद्वारे मांडण्यात आल्या. यावेळी संघाचे लालासाहेब मगर, अविनाश मोकाशे, मेहबूब काझी, बशीर तांबोळी, बाळासाहेब वाघमारे, मालोजी वाघमारे आदी मान्यवरांसह अनेक शिक्षक उपस्थित होते.



### नातेपुतेतील मातंग समाजाने दिला धरणे आंदोलन करण्याचा इशारा

**नातेपुते, दि. १५ सप्टेंबर-**

नातेपुते येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगरमध्ये रस्ता मंजूर करण्याबाबत व सार्वजनिक शौचालय मंजूर करण्यासाठी सकल मातंग समाजाच्या वतीने नातेपुते नगरपंचायतीचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांना निवेदन देण्यात आले. सदर निवेदनामध्ये म्हटले आहे की नातेपुते नगरपंचायतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगरमध्ये रस्ता व सार्वजनिक शौचालय होण्यासाठी लवकरात लवकर हे विषयी मार्गी लावावेत. तसेच नगरपंचायतीचे जबाबदार कर्मचारी व पदाधिकारी यांना समाजाने वेळोवेळी हा प्रश्न विचारण्यात आला असता त्यांच्याकडून काम मंजूर आहे, असे तोंडी आश्वासन गेली. दोन वर्षांपासून देण्यात येत आहे. तरी आपण या विषयाची गांभीर्याने दखल घ्यावी अन्यथा सकल मातंग समाजाच्या वतीने नातेपुते नगरपंचायतीसमोर बेमुदत हालगीनाद धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनाद्वारे सांगण्यात आले. यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य सतीश सपकाळ, माजी ग्राम पंचायत सदस्य केरबा लांडगे, शिवदास लांडगे आदी उपस्थित होते.

### अक्कलकोटच्या हळगोदे गल्लीत अंधार

**अक्कलकोट, दि. १५ सप्टेंबर-**

नगरपालिकेच्या चुकीच्या कारभारामुळे सुभाष गल्ली येथे हळगोदे बोळात तीन महिन्यांपासून लाईट बंद आहे. यामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही दखल घेतली जात नसल्याने नागरिकांचा रोष वाढला आहे. प्रत्येकवेळी विविध कारणे दिली जात आहेत. सहा महिन्यांपूर्वी हळगोदे बोळात निकृष्ट दर्जाचा सिमेंट रस्ता करण्यात आला असून गटार आणि पावसाचे पाणी रस्त्यावर गुडघ्याभर थांबत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

## हसापुरेंच्या उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांचे शिंदेंच्या गणपतीला साकडे

**● निष्ठेचे फळ मिळण्याच्या आशा पल्लवित**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १५ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांच्या विधानसभा उमेदवारीसाठी सोलापूर शहरातील सुदर्शन हसापुरे मित्र परिवाराच्या वतीने माजी केंद्रीयमंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या गणरायाला साकडं घालण्यात आले.

सुरेश हसापुरे यांनी काँग्रेसच्या अडचणीच्या काळात शिंदे परिवाराला व पक्षाला साथ दिली आहे. राज्यातील अनेक दिग्गज नेते सत्तेत सहभागी होण्यासाठी पक्षांतर करीत होते. मात्र हसापुरे यांनी विरोधात जाऊन दक्षिणमध्ये काँग्रेसच्या वाढीसाठी जोरदार प्रयत्न केला. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला दहा हजारांचे मताधिक्य मिळाले. हसापुरे हे शिंदे घराण्याशी एकनिष्ठ आहेत. शिवाय जाई-जुई फार्मवरील गणरायाला वंदन करण्यासाठी दररोज दोनवेळा पूजेस उपस्थित राहत आहेत. शिंदे घराण्याचे एकनिष्ठ व गळ्यातील ताईत बनलेल्या हसापुरे यांना दक्षिणमधून विधानसभेची उमेदवारी देण्यात यावे, अशी मागणी शहरातील तरूण मंडळींनी केली आहे. लोकसभा निवडणुकीत गावभेट दौरा, प्रचार दौरा व विविध कार्यक्रमांमधून काँग्रेस पक्ष तळागाळात पोहोचविला आहे. शिवाय राजकीय, सहकार, सामाजिक, शैक्षणिक व इतर अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य



असल्यामुळे दक्षिणमध्ये सत्ता परिवर्तन करण्यासाठी सहकार्य होणार असल्याने हसापुरे यांना उमेदवारी देण्याची मागणी करण्यात आली आहे. टाकळी येथील जाई-जुई फार्मवर सुशिलकुमार शिंदे व खा. प्रणिती शिंदे यांची भेट घेऊन हसापुरे यांना उमेदवारी दिल्यास निवडून आणल्याशिवाय राहणार नाही, अशी ग्वाहीही उपस्थित तरूणांनी दिली. यावेळी शहरातील विविध प्रभागातून आलेल्या तरूणांनी शिंदे यांच्या गणरायाला साकडं घालून हसापुरे आमदार होण्यासाठी आशीर्वाद घेतला.

> हसापुरे व शिंदे परिवारांची अतूट नाते आहे. सुरेश हसापुरे यांनी काँग्रेस व शिंदे घराण्याशी एकनिष्ठ राहून लोकसभा निवडणुकीत दहा हजारांचे मताधिक्य दिले आहे. निष्ठेचे फळ मिळावे म्हणून शिंदे यांच्या गणरायाला साकडं घालण्यात आले. निष्ठेचे फळ म्हणून उमेदवारी निश्चित मिळणार आहे.
>
> **- सुदर्शन हसापुरे,** युवा नेते, सोलापूर

> टाकळी येथील जाई-जुई फार्म येथे गणरायाचे दर्शन घेऊन सुशिलकुमार शिंदे, उज्ज्वलाताई शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे सुरेश हसापुरे यांना विधानसभा उमेदवारीची मागणी केली आहे. उमेदवारी दिल्यास हसापुरे यांना आमदार करण्यासाठी जीवाचे रान करणार आहे.
>
> **- मेहबूब शेख, सोलापूर**

यावेळी राहुल जरग, मेहबूब शेख, रत्न साखरे, रवी पाटील, विजय जाधव, संतोष मठपती, राहुल राठोड, काका ख्याडे, योगेश अलकुंटे, अतुल मस्के, कमलेश ख्याडे, आदित्य व्हनमाने, किशोर नाईकवाडे यांच्यासह तरूण उपस्थित होते.

## अभिजात शास्त्रीय संगिताची पंढरपूरकरांना भूरळ

**● गंधार देशपांडे यांचा कार्यक्रम; विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती गणेशोत्सव संगीत महोत्सव**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ सप्टेंबर-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आणि सर्व सन्माननीय सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या अथक परिश्रमातून प्रतिवर्षाप्रमाणे सुरू असलेल्या श्री संत तुकाराम भवन येथे श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवात चौथे पुष्प महाराष्ट्रातील ख्यातनाम शास्त्रीय गायक गंधार देशपांडे यांनी गुंफले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर ,सदस्या शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, गायक गंधार देशपांडे, स्वप्निल भिसे आणि सिध्देश बिचोलकर यांच्या हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी त्यांना तितकीच सुंदर आणि साजिशी साथसंगत तबला स्वप्नील भिसे, हार्मोनियम सिध्देश बिचोलकर, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ सुदर्शन कुंभार, तानपुरा ओम देशमुख यांनी केली. अविस्मरणीय कार्यक्रम लक्षात राहील असा झाला. सूत्रसंचालन विक्रम बिस्किटे यांनी केले. यावेळी पंढरपूर व पंढरपूर पंचक्रोशीतील कला रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



> **या रचना केल्या सादर :** सुरुवातीला अभिजात भारतीय संगीतामधील राग यमन मनमोहन शाम ताल झपतालात सादर केला. त्यानंतर गुरु आणि वडील पं.राम देशपांडे यांनी रचलेली बंदीश गणराज आयो है अप्रतिम सादर करत पंढरपूरकर रसिक श्रोत्यांना दमदार शास्त्रीय गायनाची भूरळ पाडली. त्यानंतर त्यांच्या आईनेही पद्मनाभा नारायणा आणि भेटी लागी जीवा अभंग गायन करीत विठूराया चरणी गायन सेवा अर्पित केली. त्यानंतर पुन्हा गंधार देशपांडे यांनी अबीर गुलाल उधळीत रंग, बोलावा विठ्ठल या संतरचना सादर करीत कार्यक्रमाची सांगता केली.

## 'सार्थक'च्या पहाडी आवाजाला रसिकांची मोठी दाद

**● टाळ्यांच्या कडकडाटात उदंड प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ सप्टेंबर-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने आयोजित गणेशोत्सव संगीत महोत्सव तिसरे पुष्प महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक छोटे उस्ताद सार्थक शिंदे यांनी तिसरे पुष्प गुंफले.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांच्या वतीने सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आणि सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या अथक परिश्रमातून प्रतिवर्षाप्रमाणे सुरू असलेल्या श्री संत तुकाराम भवन येथे आयोजिण्यात आलेल्या गणेशोत्सव संगीत महोत्सवात सुरुवातीला सदस्य प्रकाश महाराज जवंजाळ, सदस्या ॲड. माधवी निगडे, शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, सार्थक शिंदे आणि विजय शिंदे यांच्या हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. शेवटी मनाचिये मनी गुंफलेला शेला या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी तितकीच सुंदर साथसंगत तबला समर्थ उकरंडे, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनिअम श्रीहरी मेंदरकर, ढोलकी महेश कांबळे, स्वर व टाळा क्रांती शिंदे आणि संगीता भंडारे यांनी केली.



> **या गीतांनी घातली मोहिनी :** सुरुवातीला जगी जीवनाचे सार या पहिल्याच गाण्याने टाळ्यांचा ताल धरला. त्यानंतर या पंढरपुरात वाचत गाजत, चंद्रभागेच्या तीरी उभा विटेवरी, चल गं सखे चल गं सखे पंढरीला, चिक मोत्याची माळ, कन्हैया रे, वेढा रे वेढा पंढरी, आळंदी हे गाव पुण्यभूमी ठाव, बाजाराला निघण्या निघाली गवळणी आणि अभंगाने वातावरण भक्तीमय करत एवढ्या लहान वयात आपल्या पहाडी आवाजाने रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.



## पानगावात रंगला खेळ पैठणीचा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ सप्टेंबर-**

तालुक्यातील पानगाव येथे गौरी-गणपतीनिमित्त खास महिलांसाठी महाराष्ट्रात धुमाकुळ घालत असणारा सिनेअभिनेता क्रांतीनाना मळेगांवकर व बालगायिका टीव्ही स्टार सह्याद्री मळेगांवकर प्रस्तुत लाडक्या बहिणींसाठी होम मिनिस्टर (खेळ रंगला पैठणीचा) जागर नारी शक्तीचा रंगारंग कार्यक्रम कविता राजेंद्र राऊत यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला, याप्रसंगी पदाधिकारी यांच्या उपस्थितीत असंख्य महिलांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन या कार्यक्रमाचा आनंद लुटला.

## 'श्री भगवंत पुरवठा'ची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ सप्टेंबर-**

येथील श्री भगवंत सहकारी पुरवठा मंडळी लि. ची ७५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

प्रास्ताविक संचालक रामचंद्र गौरकर यांनी केले. अहवालाचे वाचन व्यवस्थापक रवींद्र माचवे यांनी केले. सभेपुढे चार विषय होते. ते सर्व विषय सर्व सभासदांनी एकमताने मंजूर केले. अध्यक्ष आनंद कुलकर्णी-अंबेजवळगेकर यांनी संस्थेत आजवर केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला.





सध्याच्या परिस्थितीत संस्थेचा पेट्रोल, डिझेलचा व्यवसाय कमी झाला असून सर्वत्र नवीन पंप झाल्यामुळे त्याचा विक्रीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे नफ्यावर परिणाम झाला आहे. यासाठी संस्था नवीन व्यवसायाच्या शोधात आहे. त्यासाठी कोणाच्या सुचना असतील तर त्या द्याव्यात त्याचा निश्चित विचार करु. पण लवकरच कोल्ड स्टोरेज बांधण्याचा विचार चालू असून जुनी जागा विकून नवीन जागा घेणार आहोत. तसेच इतर काही व्यवसाय करता येतील काय याचा विचारविनिमय संचालक मंडळ करीत आहे. तसेच सभासदांनी आपल्या संस्थेच्या दोन्ही पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेल खरेदी करावे, अशी विनंती त्यांनी केली.

यावेळी अध्यक्ष आनंद कुलकर्णी, उपाध्यक्ष उमेश ठोंबरे, संचालक नंदकुमार देशमुख, रामचंद्र गौरकर, शब्बीर तांबोळी, ड. राहुल देशमुख, दीपक डिंडोळे, भावना नाईकवाडी, माधुरी गोलकोंडा आदी उपस्थित होते.

यावेळी सभासदातून सुशील पाटील, संजय सोपल, अतुल दीक्षित, प्रमोद काळे यांनी आपले विचार मांडले व काही सूचना केल्या. संचालक शब्बीर तांबोळी यांनी आभार प्रदर्शन केले. पसायदानाने सभेची सांगता करण्यात आली. या सभेस मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

## प्रकट मुलाखतीतून उलगडला अभिनेते किशोर महाबोलेंचा कला प्रवास

**● प्रा. ममता बोल्लींनी घेतली मुलाखत; बार्शीतील वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ लिंगायत बोर्डिंगमध्ये कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ सप्टेंबर-**

मराठी मालिका प्रेक्षक पाहण्यासोबत आजही प्रत्येक शब्द कान देऊन ऐकतात तर हिंदी मालिका डोळ्याने पहातात. हा त्यातला मुलभूत फरक असल्याचे सांगत हिंदी चित्रपटात काम करताना मराठी कलाकारांना मान-सन्मान दिला जातो, असे मत ज्येष्ठ अभिनेते किशोर महाबोले यांनी मांडले.

ते बार्शी येथील वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ लिंगायत बोर्डिंग येथे आयोजित कार्यक्रमात निवेदिका प्रा. ममता बोल्ली यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत आपल्या कलेच्या जीवन प्रवास उलघडताना बोलत होते. यावेळी डॉ. शीतल बोफलकर, डॉ. गौरी गायकवाड, शैलजा पाटील, तुलसीभाई गव्हाणे, भगवान करजखेडे मामा, फरकांडे, बसवेश्वर गाढवे, माधव देशमुख, उपाध्यक्ष रावसाहेब मनागिरे, महिला मैत्रीण मंचचे अरुणा मनगिरे, शारदा पानगावकर, शिल्पा मठपती, वंदना देवणे, स्वाती धारुरकर, अपर्णा होनराव, माधूरी शिलवंत, उर्मिला निंबर्गीकर, अरुणा कल्याणी, प्रभा बेणे यांच्यासह पदाधिकारी व गणेशभक्त उपस्थित होते.

महाबोले म्हणाले, शाळेत ४ थीत असताना छोटीशी नाटिका केली होती. तेथून कला रुजत गेली. पुढे व्यवसायिक नाटके ३०



हुन अधिक मालिका १०० पेक्षा जास्त मराठी हिंदी चित्रपटात काम केल्याचे सांगितले. आई कुठे काय करते, पवित्र रिश्ता, अवंतिका, अवघाची संसार, सावधान इंडिया, क्राईम पेट्रोल मालिकेत भुमिका साकारल्याचे सांगत, आई कुठे काय करते या मालिकेतून स्त्रीविषयीचं जो दृष्टीकोन आहे तो अतिशय स्पष्ट व अधोरिकेत केलेला आहे. आपण आपल्या मुलीला तर मुलगी मानतो पण आपलं घर सोडून आलेल्या सुनेला मुलगी मानलं हेच महाराष्ट्राच्या जनतेला आई कुठे काय करते या मालिकेत भावलेलं असल्याचं सांगितलं.

सध्याच्या कुंटुंब पद्धतीवर बोलताना एकत्र कुटुंब पद्धती महत्वाची असुन त्यात कामे वाटली जातात. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे नवीन घरांचा जन्म झाला ते म्हणजे पाळणा घर. एकत्र कुंटुब फायदे जास्त आहेत त्याप्रमाणात तोटे फारच कमी आहेत. मात्र काही लोकांना स्वार्थापोटी किंवा नवीन प्रवाहाबरोबर लांब जायचं असेल या कारणांने ते लोक विभक्त राहत असतील. तरीदेखील महाराष्ट्रीयन माणसांच्या मनात आजही एकत्र कुटुंब पद्धती आहे. असं म्हणतात आपल पुण्यकर्म आहे ते एक पिढी सोडून येत त्यामुळेच कदाचित आजोबाची आणि नातवाचे नाते घट्ट होते हे आपण पाहतो हे त्यामागचं कारण असावं, अस वाटतं असल्याचे म्हणाले. चित्रपटात कलावंताच्या नावाने ओळख मिळते तर मालिकांमध्ये केलेल्या भुमिकेने ओळखले जाते. आज नाटक मालिका की सिनेमे श्रेष्ठ असा प्रश्न उपस्थित केला जातो.

> **कलावंत जगतात कलेसाठीच...**
>
> मालिका दैनिक वृत्तपत्र आहे, नाटक हा कांदबरी तर सिनेमा हा ग्रंथ आहे. आज अनेक कलावंत कलेसाठी जगत असतात, ते टाळ्यांचे भुकेले असतात. नवीन या कलेच्या सृष्टीत येण्यासाठी नवीन कलाकारांचे भाषेवरती कमांड शुद्ध भाषा, स्पष्ट उच्चार, वाणी अभ्यास, वाचन पाहिजे, निरीक्षण पाहिजे असे सांगत, बार्शीशी नात जुनं असून येथे नोकरी केल्याचे यावेळी सांगितले. या प्रकट मुलाखतीत महाबोले यांनी आजवर काम करताना अनेक घडलेले गंमती जमती किस्से सांगता बार्शीकर प्रक्षेकही खळखळून हसत टाळ्यांनी दाद दिली.

लातूर
दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## स्व. कऱ्हाळे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रा. डॉ. पांडुरंग मुट्ठे यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. १५ सप्टेंबर-**

येथील शिवनेरी महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभागप्रमुख , राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. पांडूरंग राजाराम मुट्ठे यांची हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील स्व. मारोतराव कऱ्हाळे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाल्याचे पत्र पुरस्काराचे संयोजक शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथील मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांनी दिले आहे. पुरस्काराचे वितरण ऑक्टोबर महिन्यात होणार आहे.



प्रा. डॉ. पांडूरंग मुट्ठे हे शिवनेरी महाविद्यालयात सन २००० पासून सम ाजशास्त्र विषयाचे अध्यापन करतात. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेऊन राष्ट्रीय पातळीवरील नामांकित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांना हा पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल संस्थाध्यक्ष प्रतापराव माने, सचिव पद्माकर मोगरगे, कोषाध्यक्ष जयेश माने, उपाध्यक्ष ॲड. सुतेज माने, प्राचार्य डॉ.ए.बी. धालगडे, सम ाजशास्त्र अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. एस. पी. घायाळ, पोलिस निरीक्षक विठ्ठलराव दराडे, आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



रेणापूर : रेणापूर येथील रवी उरगुंडे यांच्या घरी बाप्पासमोर केदारनाथ मंदिराची सुंदर प्रतिकृती बनविली आहे.

### मेहनतीच्या बळावर जीवनात मोठे बना : डॉ. विठ्ठल लहाने

**येरोळ, दि. १५ सप्टेंबर-**

डिगोळ (ता. शिरुर अनंतपाळ) ग्रामीण भागातील मुलांमध्ये उपजत एक शक्ती असते या शक्तीचा योग्य उपयोग करून आफाट कष्टातून खूप अभ्यास करून मेहनतीच्या बळावर जिवनात खूप मोठे माणूस बना, असे प्रतिपादन प्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी केले. ते डिगोळ (ता. शिरुर अनंतपाळ) येथे श्रीगणेश उत्सवानिमित्त जय भवानी जय शिवाजी गणेश मंडळाच्यावतीने आयोजित व्याख्यान कार्यक्रमात बोलताना मत व्यक्त केले. यावेळी उद्योजक उदय देशपांडे, वैजनाथ बावगे, सिध्देश्वर कोटे, धनराज चावरे, बाबूराव बोरोळे, व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. लहाने म्हणाले, प्रत्येक आई वडिलांनी स्वताच्या मुलांवर चांगले संस्कारासोबत दररोज कष्ट व मेहणत करण्याची सवय लावत त्यांच्या मनावर मेहनतीच्या गोष्टी बिबंवल्यावर मुल स्वताचे जिवन सुधारुन भविष्यात नक्कीच मोठे होतील. तरुणांनी व्यसनापासून दूर राहून आई वडिलांची सेवा करावे व आनंदी जीवन जगावे असे सांगून तरुणांनी मेहनत, सातत्य, आत्मविश्वास,गरिबीची जान,वचनबद्ध हा यशाचा पासवर्ड जतन करून स्वताचे करिअर निर्माण करावे असे आवाहन केले. यावेळी रामदास एकुर्के, रामेश्वर चावरे, सुनील दासरे, उध्दव जाजूर्णे, रमाकांत बिरादार, दिनकर टाकळगावे, राहूल गादगे, शुभम पाटील, अर्जुन पाटील,शिवहार कोटे उपस्थित होते. सूत्रसंचालन रामेश्वर चावरे यांनी केले तर रामदास एकुर्के यांनी आभार मानले.





### बाळासाहेब सूर्यवंशी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**निलंगा, दि. १५ सप्टेंबर-**

निलंगा मतदार संघातील शिरूर अनंतपाळ तालुक्यातील हलकी येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सुर्यवंशी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शनिवार दि.१४ सप्टेंबर रोजी निलंगा येथे आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते भाजपामध्ये प्रवेश केला असून आगामी विधानसभेच्या तोंडावर शिरूर अनंतपाळ तालुक्यात काँग्रेसला खिंडार पडले आहे. लातूर जिल्ह्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. आगामी विधानसभेच्या तोंडावर निलंगा विधानसभा मतदारसंघातील शिरूर-अनंतपाळ इथल्या शेकडो काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी निलंगा विधानसभेचे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या उपस्थितीत भाजप मध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे विधानसभेच्या तोंडावरच काँग्रेसला या मतदारसंघातून खिंडार पडले आहे. यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी बाळासाहेब सुर्यवंशी यांचा त्यांच्या चळवळीतील सामाजीक कार्याचे कौतुक करत समाजपयोगी प्रत्येक कार्यामध्ये साथ देण्याची ग्वाही दिली व भारतीय जनता पार्टी पक्ष तळागाळात पोहोचवण्याची अपेक्षा व्यक्त केली. आ. संभाजीराव पाटील निलंगेकर व अरविंद पाटील निलंगेकर यांच्या सामाजीक, राजकीय कार्यातून प्रेरीत होत त्यांच्या हातुन निलंगा विधानसभा मतदार संघात चालू असलेल्या विकास पर्वामध्ये आपला देखील मोलाचा सहभाग असावा व त्यांच्या चालू असलेल्या प्रगतीच्या कार्यात त्यांना साथ देण्यासाठी म्हणून आपण भाजपामध्ये प्रवेश केला असल्याची प्रतीक्रिया बाळासाहेब सूर्यवंशी हलकीकर यांनी सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने दिली. यावेळी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील युवा कार्यकर्ते बाळासाहेब सूर्यवंशी हालकिकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला त्यांच्या सोबत सत्यजित सूर्यवंशी, वैभव, राकेश बानाटे, धनराज जरीपटके यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी निलंगा येथील आ.निलंगेकर यांच्या निवासस्थानी भाजपात प्रवेश केला आहे.

## ३०९ मतदान केंद्र, ३२ झोन, ४५० पोलिस

### औसा विधानसभा निवडणूकपूर्व प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि. १५ सप्टेंबर-**

आगामी विधानसभा निवडणूक अंतर्गत औसा विधानसभा मतदार संघातील ३ लाख १ हजार ८२५ मतदारांच्या मतदानासाठी निवडणुक विभागाने तयारी सुरु केली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार घनश्याम अडसुळ व नायब तहसीलदार इंद्रजीत गरड यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय अधिकारी व पोलिस क्षेत्रीय अधिकारी यांचे औसा येथे प्रशिक्षण शिबीर झाले.

औसा विधानसभा मतदारसंघांतर्गत ३०९ मतदान केंद्र असून असून त्यासाठी एकूण ३२ झोनची निर्मिती करण्यात आली आहे. यासाठी ३२ क्षेत्रीय अधिकारी व ३२ पोलीस क्षेत्रीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. एका क्षेत्रीय अधिकारी यांचेकडे १० ते १२ मतदान केंद्राची मतदान केंद्राची जबाबदारी देण्यात आली आहे. झोनल अधिकारी प्रत्येक मतदान केंद्राना भेटी देवून असुरक्षीत मतदान केंद्राचे मैपिंग करणार आहेत. याचबरोबर मागील सार्वत्रिक निवडणूकीत तसेच स्थानिक स्वराज संस्था निवडणूकीच्या दरम्यान कुठे अनुचित प्रकार किंवा निवडणूक आचारसंहिता काळात काही गुन्हे दाखल असतील तर या बाबत तपासणी करुन असे मतदान केंद्र, गाव, ठिकाण निश्चित करण्यात येणार आहे

मतदार संघातील सर्वच मतदान केंद्राच्या इमारतीची पाहणी करुन तिथे पाणी, लाईट, फर्निचर, रैंप, स्वछता गृह अशा पायाभुत सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करण्यात येणार आहे. औसा विधानसभा मतदार संघाची अंतिम मतदार यादी ३० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झाली असून त्यानुसार ३,०१,८२५ मतदार आहेत. यामध्ये १,५९,६२९ पुरुष १,४२,१९२ महिला ४ इतर



मतदार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीतील आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी ५ स्थिर निगराणी पथक, ६ भरारी पथक, ३ व्हीडीओ पथक, १ खर्च पथक, १ जागरण पथक नेमण्यात येणार आहे. मतदार संघातील मतदान शांततेत पार पाडण्यासाठी ३०९ मतदान केंद्रावर १६०० मतदान अधिकारी ४५० पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## धर्मवीर आनंद दिघे साहेब ॲटोरिक्षा, मिटर्ड टॅक्सी नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १५ सप्टेंबर-**

राज्य शासनाने धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ॲटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी, टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केलेली आहे. या कल्याणकारी मंडळाकडून केंद्र व राज्य शासनामार्फत व राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांना देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत याबाबतची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

जीवन विमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना (रु. ५० हजारांपर्यंत), पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृध्दी योजना, ६५ वर्षावरील ॲटोरिक्षा / मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना निवृत्ती सन्मान योजने अंतर्गत सानुग्रह अनुदान, नविन ऑटो- रिक्षा तथा मिटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी घेण्यात येणारे कर्ज, राज्यस्तरीय मंडळाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या इतर कल्याणकारी योजना, शासनाने निर्देशित केलेल्या इतर कल्याणकारी योजना, या व्यतिरिक्त शासनाने घोषित केलेल्या अनुषंगिक योजना योजनांचा लाभ या मंडळाकडून दिला जाणार आहे. सर्व योजनेसंबंधीत नियम, अटी व मार्गदर्शक सुचना महाराष्ट्र ऑटो- रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडून निर्गमित करण्यात येतील. मंडळाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ मिळविण्याची चालकांनी जिल्हा कार्यालयामध्ये विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. प्रत्येक अर्ज जिल्हास्तरीय समितीकडून त्यांना दिलेल्या निकषानुसार पात्रतेसाठी तपासले जातील. मंजुर लाभ राज्यस्तरीय मंडळाने व जिल्हास्तरीय समितीने वेळोवेळी विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार वितरीत केले जातील. ऑटो-रिक्षा परवानाधारका, ऑटो रिक्षा / मिटर्ड टॅक्सी चालकांनी मंडळाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील परिवहन कार्यालयामार्फत याबाबतची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पात्र अर्जदाराच्या कुटुंबातील व्यक्ती मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असतील. तथापि, कुटुंबातील सदस्य संख्या ही चालक, जोडीदार व मुले मिळून ४ पर्यंत मर्यादित असेल. जो सभासद सलग एक वर्षापेक्षा जास्त काळ मंडळाची वर्गणी भरणार नाही. अशा सभासदाचे सभासदत्व सुनावणीची एक संधी देऊन रद्द करण्यात येईल. परवानाधारकास दिव्यांगत्व आले तरी तो परवानाधारक देखील कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील. लातूर जिल्ह्यातील सर्व ऑटोरिक्षा, मिटर्ड टॅक्सी चालकांनी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ॲटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लावावा

### जिल्हाधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १५ सप्टेंबर-**

धाराशिव जिल्ह्यात नियोजित विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लातूर विमानतळावर उतरले असता त्यांचे स्वागत जिल्हाधिकारी यांनी केले. जेवढा वेळ ते विमानतळावर होते त्या वेळेत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर जिल्हा रुग्णालय या महत्वाच्या आणि रखडलेल्या विषयाची सविस्तर माहिती देत त्यांना रुग्णालय संदर्भात माझं लातूर परिवार आणि सर्वसामान्य नागरीकांच्या तीव्र भावना अवगत करून दिल्या.

गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेला लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न माझं लातूर परिवाराने केलेले बेमुदत साखळी उपोषण आणि सततच्या पाठपुराव्यामुळे आता ऐरणीवर आला आहे. १ ऑक्टोबर २००८ रोजी जिल्हा रुग्णालयाची इमारत उपलब्ध मनुष्यबळासह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास वर्ग करण्यात आली होती. २०१२ साली राज्यशासनाने लातूर जिल्हा रुग्णालयास मान्यता देऊन बांधकामासाठी १२० कोटी रुपयांची तरतूद देखील केली होती. मात्र जागा उपलब्ध होत नसल्याने हा विषय जवळजवळ ७ वर्ष रखडला. १९ जुलै २०१९ रोजी परभणी कृषी विद्यापठांतर्गत लातूर कृषी महाविद्यालय येथील सर्व्हे नं. ३७ मधील १० एकर जमीन रुग्णालयासाठी देण्याचा निर्णय शासनाने घेतला. भूसंपादनापोटी २ कोटी ८२ लाख रुपये आरोग्य विभागाने कृषी विभागास द्यावे असा निर्णय झाला.

लालफितीत अडकलेल्या लातूर जिल्हा रूग्णालय विषयास माझं लातूर परिवाराने २ ऑक्टोबर २०२३ रोजी बेमुदत साखळी उपोषण सुरू करून पुन्हा ऐरणीवर आणले. एवढ्यावर न थांबता माझं लातूरने मंत्रालय गाठत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालकमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर केले आणि हा विषय मार्गी लावावा अशी आगृही विनंती केली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जागेचे पुनर्मूल्यांकन करण्यात आले आणि ही रक्कम ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये इतकी झाली. ज्या ज्या वेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री लातूर येथे आले त्या वेळी हा प्रश्न मार्गी लावावा यासाठी प्रयत्न केले.

अखेर १९ जून रोजी निघालेल्या शासन आदेशात जमीन हस्तांतरण निधी वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आणि ६० दिवसांच्या आत जमीन हस्तांतरण करून घेण्याचे आदेश दिले. १९ ऑगस्ट २०२४ रोजी ही मुदत संपली तरीही प्रश्न आजतागायत रखडला आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या महत्वाच्या प्रलंबित विषयास त्वरित मार्गी लावावा अशी विनंती केली आहे. याबाबत येत असलेल्या तांत्रिक अडचणीबाबत त्यांना अवगत करून दिले आहे. येत्या काही दिवसात हा प्रश्न निकाली लागेल अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरीकांतून व्यक्त केली जात आहे.


## गंजगोलाईतील अतिक्रमण काढण्याची मागणी

### जनहित युवा संघटनेने आयुक्तांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १५ सप्टेंबर-**

गंजगोलाई बाजारपेठेतील रोडवर केलेले अतिक्रमण काढून नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून मुक्त करावे बाबासाहेब बनसोडे यांनी केली.

लातूर प्रतिनिधी,-लातूर येथील नावाजलेल्या महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या विविधतेने नटलेल्या १६ रस्त्यांना जोडणारा प्रसिद्ध बाजारपेठ म्हणजे गंजगोलाई या सर्व विविध १६ रस्त्यांना जोडणारे रोड मेन रोड, कापड लाईन, भुसार लाईन, चुरमुरे मसाला लाईन, स्जिद रोड, भाजी मार्केट, नांदेड रोड, नावंदर मार्ग, नवयुग टाकी म ार्ग, शिवाजी महाराज मार्ग, सोनार लाईन, लोखंड लाईन मार्गावरील व्यापारी दुकानदाराने दुकाना व्यतिरिक्त समोर फुटपाथवर, रोडवर व्यापाऱ्यांनी टेबल व इतर साहित्य ठेऊन केलेल्या अतिक्रमणामुळे ग्राहकांना, महिला, नागरिकांना, पादचाऱ्यांना, वाहन चालकांना रहदारी करतांना मोठी कसरत करावी लागत असून जाण्यासाठी मज्जाव करीत अतिक्रमण करून अर्धा रोड चक्क दुकानदारीने बंद करून रहदारीस अडथळा निर्माण करीत आहेत यामुळे नागरिकांना अपघातांना सामोरे जावे लागत असल्याने लातूर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरेसह सी झोन क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे यांना दुकानासमोरील रोडवर केलेल्या रस्त्यावर जाण्या येण्यासाठी अडथळा निर्माण होत



असलेले अतिक्रमण तात्काळ काढावे व गंजगोलाईतील रस्त्यांनाही मोकळा श्वास द्यावा म्हणून जनहित युवा संघटनेने आज निवेदन देत आयुक्तांशी चर्चा केली. याप्रसंगी जनहित युवा संघटनेने दिलेल्या निवेदनावर अतिक्रमण तात्काळ न हटवल्यास येणाऱ्या पुढील काळात लोकशाही पद्धतीने मोठे आंदोलन करणार असल्याचेही यावेळी आयुक्तांशी चर्चा करताना सांगितले. यावेळी जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जनहित युवा संघटना महाराष्ट्र राज्य मराठवाडा अध्यक्ष दीपक गंगणे, सामाजिक कार्यकर्ते हातिम भाई शेख, नितीन चालक उपस्थित होते.

## राज्यस्तरीय वाद्य पुरस्काराने पांडुरंग मुकडे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १५ सप्टेंबर-**

तबला वादनातील गेल्या ५० वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर औसा तालुक्यातील उजनी येथील सुपुत्र सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेले पंडित पांडुरंग मुकडे यांना महाराष्ट्र शासनाचा २०२४ मधील राज्यस्तरीय वाद्य संगीत पुरस्काराने राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. उजनी येथील सर्वसाम ान्य शेतकरी कुटुंबात पांडुरंग मुकडे यांचा जन्म झाला . लहानपणापासूनच संगीताची आवड होती. शालेय शिक्षणासाठी सोलापुर येथील दयानंद महाविद्यालयात प्रवेश घेतला. या काळात सोलापुर येथील भीमराव कनकदर यांच्याकडून संगीतातील काही धडे घेतले .पण संगीतातील ताल व सुरांचा मनातील घोळ कायम होता. या काळात सोलापुर येथे सदाशिवराव जाधव यांचे शास्त्रीय संगीत गायन ऐकले.आणि पुढील शिक्षण घेण्यासाठी थेट पुणे गाठले.संगीतातील शिक्षण घेऊन पं. भीमसेन जोशी, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. माणिक वर्मा, पं. प्रभा अत्रे अशा अनेक दिग्गज कलाकारांना तबल्याची साथसंगत दिली. तबला शिकताना हार्मोनियममध्येही त्यांनी विशारद केले. त्याचबरोबर गायनामध्ये सुद्धा त्यांचे विशारद पूर्ण झाले. संगीतातील गोडी कायम टिकुन रहावी. यासाठी संगीत शिक्षक म्हणून नोकरीही केली. या काळात शिक्षक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर संगीत शिक्षक व विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन केले. संगीत क्षेत्रातील त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय वाद्य संगीत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## गणेशोत्सवानिमित्त लातूर वाहतूक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १५ सप्टेंबर-**

दि. १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर लातूर वाहतूक मार्गामध्ये बदल करण्यात आला आहे. येथील पी. व्ही. आर चौकातून छत्रपती शिवाजी महाराज चौक व शहरात येणारे एस. टी. बसेस पी. व्ही. आर. चौकातून रिंगरोडने नवीन रेणापूर नाका मार्गे जुना रेणापूर नाका येथिल बसस्टॅन्डचा वापर करतील. बाकी सर्व वाहने जुना रेल्वे लाईनच्या पॅरलल रोडचा वापर करतील.

औसा रोडने शहरात येणाऱ्या एस.टी.बसेस या वाडा हॉटेल येथून रिंग रोडने, खाडगाव टी पॉईंट, पिव्हिआर चौक, रेल्वे स्टेशन चौक, नविन रेणापूर नाका मार्गे जुना रेणापूर नाका येथील बसस्थानक क्र २ चा वापर करतील. तसेच चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने जुना औसा रोड एल.आय.सी.कॉलनी, नाईक चौक,सुतमील रोड या मार्गाचा वापर करतील.

रेणापूर रोडने शहरात येणाऱ्या एस.टी.बसेस जुना रेणापूर नाका येथील बसस्थानकाचाच वापर करतील. रेणापूर रोडने येणारी चार चाकी,तीन चाकी व दोन चाकी वाहने ही जुना रेणापूर नाका बालाजी मंदीर व खोरी गल्ली या मार्गाचा वापर करतील. गंजगोलाई-सुभाष चौक-दयाराम रोड मार्गे-खडक हनुमान-सिध्देश्वर मंदिर या मिरवणुक मार्गावर सर्व वाहनास सदरचा रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.



नांदेड रोडने शहरात येणाऱ्या एस.टी.बसेस या गरुड चौक, सिद्धेश्वर चौक, नवीन रेणापूर नाकामार्गे जुना रेणापुर नाका येथिल बसस्थानकाचा वापर करतील. तसेच शहरातील वाहतुकीसाठी जनतेस १) राजस्थान विद्यालय ते दयानंद गेट या पॅरलल रोडचा २) गांधी चौक ते बसवेश्वर महाविद्यालय- रमा चित्रपटगृह-खोरी गल्ली-शिवनेरी लॉज या मार्गाचाच अवलंब करावा. जुना रेणापूर नाका बसस्थानक येथे येणाए-या व जाणाऱ्या सर्व बसेस परत त्याच मार्गे रिंग रोडने जातील. तरी सर्व नागरिकांनी दि.१७ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० ते २३.५० वाजेपर्यंत पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळून प्रशासनास सहकार्य करावे.

## त्रिवेणीबाई चिल्लर्गे यांचे निधन

**देवणी, दि. १५ सप्टेंबर-**

तालुक्यातील वडमुरंबी त्रिवेणीबाई बंडेप्पा चिल्लर्गे यांचे दि.१४ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता स्वगृही



वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, नातू-पंतू असा परिवार आहे. ते समाज सेवक धोंडीबा चिल्लर्गे यांच्या मातोश्री आणि प्राध्यापक बस्वराज चिल्लर्गे आणि संगमेश चिल्लर्गे यांच्या आजी होते.

## संक्षिप्त वृत्त



### मनसेच्या तालुका उपाध्यक्षपदी शशिकांत भातमोडे यांची निवड

**औसा, दि. १५ सप्टेंबर-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या औसा तालुका उपाध्यक्षपदी खरोसा येथील शशिकांत भातमोडे औसा येथे निवड करण्यात आली. मनसेचे लातूर जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे यांच्या हस्ते निवडीचे प्रमाणपत्र देण्यात आले. औसा येथे झालेल्या बैठकीत जिल्हा सचिव धनराज गिरी, विधानसभा संघटक महेश बनसोडे, तालुका अध्यक्ष मुकेश देशमाने, कृषी जिल्हा अध्यक्ष प्रवीण चव्हाण, शहराध्यक्ष प्रवीण कठारे, गोविंद चव्हाण, अमोल थोरात, अनंत भिसे, विकास लांडगे, प्रवीण पोतदार, शिवराज सांडुर, सचिन सूर्यवंशी, प्रकाश गोरे, चंद्रकांत जाधव, आदित्य डोके, गोपाळ सांडूर, आदित्य साळुंके, रोहन व्हारांगळे, अजय जावळे प्रद्युम्न बिराजदार यांची उपस्थित होते.




### गजानन अंबर यांचा तहसील कार्यालयात सत्कार

**लातूर, दि. १५ सप्टेंबर-**

लातूर तहसीलमध्ये कार्यरत अभ्यासू गजानन अंबर यांची शासनाच्या वतीने लातूर तालुका पुरवठा निरीक्षकपदी नियुक्त केल्याबद्दल लातूर येथील तहसील कार्यालयात सामाजिक कार्यकर्ते महेंद्र कांबळे व त्यांच्या मित्र परिवाराकडून शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी महेंद्र कांबळे, रुपेश गायकवाड, शेख जावेद, परमेश्वर कांबळे, आयुब बागवान, महादेव गिरी, रत्ननपा कुर्डे, शेख अल्ताफ, उत्तम कांबळे, गौतम साबळे, देवा कांबळे,गौस मणियार, प्रेमनाथ अंकुशे आदी मोठया संख्येने उपस्थित होते.



### आ. अमित देशमुख यांच्या हस्ते श्री सार्वजनिक मंडळाच्या गणेशाची आरती

**लातूर, दि. १५ सप्टेंबर-**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण,सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते लातूर शहरातील शिवछत्रपती मार्केट यार्डातील श्री सार्वजनिक गणेश मंडळाच्या श्रीगणेशाची आरती करण्यात आली. यावेळी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सर्वांना गणेश उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललित शहा, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, सचिव अरविंद पाटील, सार्वजनिक गणेश मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत खंदाडे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, अशोक (गट्टूशेठ)अग्रवाल, आत असोसिएशन अध्यक्ष चंद्रकांत पाटील, गुमास्ता मंडळाचे अध्यक्ष तुळशीराम गंभीरे, कामगार मंडळ अध्यक्ष बालाजी जाधव, सुरेश धानूरे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सर्वश्री बालाप्रसाद बिदादा, सुधीर गोजमगुंडे सुभाष घोडके,बळवंत पाटील आनंद पाटील, श्रीनिवास शेळके,आनंद मालू, सुरेश धानुरे अनंत पाटील, अनंत पवार, शिवाजी देशमुख, बालाजी वाघमारे, युवराज जाधव, लक्ष्मण पाटील, तुकाराम गोडसे, रमेश सूर्यवंशी, बालाजी बेजगमवार आदींसह हमाल मापाडी गुमास्ता आडते शेतकरी उपस्थित होते.




### बिर्ला ओपन माईंडस् इंटरनॅशनल स्कूलमध्ये गणेश विसर्जन

**उदगीर, दि. १५ सप्टेंबर-**

बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूल उदगीर शाळेमध्ये गणेशचतुर्थीनिमित्त दि. ७ सप्टेंबर रोजी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब राठोड यांच्या हस्ते गणपतीची विधिवत स्थापना करण्यात आली होती. यानिमित्त शाळेमध्ये सात दिवस बाप्पाची उत्साहात रोज विधीवत पूजा करून विद्यार्थ्यांना पौष्टिक प्रसादाचे वाटप करण्यात आले. संस्थेचे सचिव अमित राठोड यांच्या संकल्पनेतून पर्यावणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच नदी-नाले, विहिरी व तलावात होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालण्याकरिता बिर्ला ओपन माईडस इंटरनॅशनल स्कूल शाळेमध्ये शांततेत, फुलांची उधळण करीत गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात ईको फ्रेंडली पद्धतीने अत्यंत भक्तीभावाने श्री गणेशाचे विसर्जन करण्यात आले. शाळेच्या परिसरात गणपती विसर्जनासाठी कृत्रिम हौद बांधण्यात आले होते व त्या हौदातच गणेशाचे विसर्जन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्षा ज्योती राठोड, सचिव अमित राठोड, प्राचार्य ऋत्विक भट्टाचार्य, शालेय विभाग प्रमुख सचिन साळुंके उपस्थित होते. श्रीगणेश उत्सव व विसर्जन उत्साहात पार पाडण्यासाठी स्वाती भांगे, सविता कोडगे, अर्शद खान यांनी परिश्रम घेतले.

# सात दिवसांच्या बाप्पाचे विसर्जन

## साकोळ येथील मिरवणुकीत पहिल्यांदाच महिलांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. १५ सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ, डिगोळ येथील सात दिवसांच्या गणरायाचे महिलांच्या विशेष सहभागातून शांततापूर्ण वातावरणात

दिनांक १३ सप्टेंबर रोजी गणरायाचे शांततेत विसर्जन करण्यात आले.

तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या साकोळ येथील मानाचा गणपती असलेल्या सरदार वल्लभाई पटेल गणेश मंडळासह येथील मोठ्या दहा गणरायाचे शांततापूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. काल पोलीस प्रशासनाच्या निगराणीखाली येथील जय बजरंग गणेश मंडळ, विवेकानंद गणेश मंडळ, महादेव माळ गणेश मंडळ, साकोळचा राजा गणेश मंडळ, शिवशक्ती गणेश मंडळ, जय हनुमान गणेश मंडळ, रोकडोबा गणेश मंडळ, बस्वेश्वर गणेश मंडळ, भोलेनाथ गणेश मंडळाकडून विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करत तर शिवशक्ती गणेश मंडळ व भोलेनाथ गणेश मंडळानी टाळ मृदंगाच्या गजरात मोठ्याप्रमाणात महिलांना घेऊन चक्क महात्मा बसवेश्वर चौकात टाळ मृदुंग वाजवित रिंगण सोहळा आयोजित करून साकोळवासीयांचे मन जिंकून घेतले.

या यावर्षीच्या गणेश विसर्जनामध्ये पहिल्यांदाच महिलांचा सहभाग खूप मोठ्या प्रमाणात दिसून आला याचप्रमाणे शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ, डिगोळ येथील सात दिवसांच्या गणरायाचे महिलांच्या विशेष सहभागातून शांततापूर्ण वातावरणात विसर्जन सोहळा पार पडला.

साकोळ ग्रामपंचायत व पोलीस स्टेशन शिरूर अनंतपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने साकोळ येथील सर्व गणेश मंडळाचे व मंळाच्या अध्यक्षाचे स्वागत करण्यात आले. गणेश मंडळाकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सकाळपासूनच शिरूरअनंतपाळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखाली ३० ते ३५ पोलीस कर्मचा-यांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




## पंडित सुंदरलाल कमिशनच्या शिफारसीची अंमलबजावणी करा

### एमआयएमची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि. १५ सप्टेंबर-**

स्वातंत्र काळात हैद्राबाद संस्थानचे भारतात विलीनीकरण झाल्यानंतर पोलीस कारवाईच्या नावावर बहुसंख्याक मुस्लीम समुदायाचे झालेले नुकसान आणि हिंदु-मुस्लीमात निर्माण झालेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर देशाचे पहिले पंतप्रधान यांनी केंद्र सरकारच्या वतीने मा. पंडित सुंदरलाल कमिशनची स्थापना केली होती या कमिशनने हैद्राबादसह मराठवाडा विभागाचा दौरा करुन केंद्र सरकारला आपला अहवाल सादर केला होता. या अहवालातील शिफारशीची अंमलबजावणी आजूनही रखडली असून तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी एम आयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी केली आहे .

हैद्राबाद संस्थानचे १९४८ साली भारतात विलीनीकरण झाले. त्या काळात केंद्र सरकारने पोलीस अक्शन कारवाई केली होती. या कारवाईच्या काळात समाज कंटकाकडून मुस्लीम समाजाच्या जिवीताचे व मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

पोलीस अक्शनच्या काळात मृत्यू झालेल्या लोकांचे मृत्यूप्रमाणपत्र नगर पालिकेकडून देण्यात यावे. यासंबंधीच्या सूचना नगर पालिका व ग्रामपंचायत यांना करण्यात यावी, अशी मागणी गेल्या १४-१५ वर्षापासून करीत आहोत. परंतु अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही.असे या निवेदनात म्हटले आहे. एम आयएम व पिडीतांच्या वतीने औसा तहसीलदार मार्फत राष्ट्रपती यांना पंडित सुंदरलाल कमिटीच्या शिफारशीची अंमलबजावणी करावी अशी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. एमआयएम औसा प्रमुख सय्यद मुजफ्फर अली इनामदार, मौला पठाण, हारुणखॉ पठाण, इस्माईल बागवान, सय्यद शाहबोद्दीन, शेख नय्युम यांची उपस्थिती होती.

## जवळगा येथे ट्रक्टरची बॅटरी, टेपची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि.१५ सप्टेंबर-**

तालुक्यातील जवळगा येथे ट्रॅक्टरची बॅटरी व टेप चोरी करणाऱ्या अरोपीस ट्रक्टर मालकाने पकडुन केले पोलीसांच्या स्वाधीन. दि १४ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास ट्रक्टर पाहणी करण्यासाठी प्लाटवर गेले असता एक इसम ट्रकटर जवळून कांहीं तरी सामान घेऊन जात असल्याचे दिसल्याने ट्रकटर मालकाने व त्यांच्या मित्राने इसमाचा पाठलाग केला. व त्याचा पाठलाग करून त्यास पकडले असता तो गावातील राजकूमार नरसिंग वाघमारे हा होता.

त्याने ट्रकटरची बॅटरी ज्याची किंमत अंदाजे ९,००० रूपये व टेपची किंमत अंदाजे १०,००० रूपये घेऊन जाताना निदर्शनास आले तर त्यास पकडून पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले.

मकबूल शरफोदीन सय्यद रा जवळगा ता देवणी यांच्या फिर्यादीवरून राजकूमार नरसिंग वाघमारे यांच्या विरोधात भारतीय न्याय संहीता ( बी एन एस) २०२३ कलम ३०३(२) नूसार गून्हा नोंद करण्यात आला आहे.पूढील तपास पोकॉ देविदास किंवडे हे करीत आहेत.

## विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी संभाजी रेकुळगे

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि.१५ सप्टेंबर-**

चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी निवृत्त केंद्रप्रमुख तथा जेष्ठ संचालक संभाजी वैजनाथप्पा रेकुळगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

वडवळ नागनाथ येथील सेवा सोसायटीचे विद्यमान उपाध्यक्ष हणमंतराव पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते. सोसायटीच्या उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत आचवले यांच्या उपस्थितीत नुकतीच सोसायटीच्या सभागृहात सर्व संचालकांची एक बैठक घेण्यात आली. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक संभाजी रेकुळगे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

चाकूर तालुक्यातील सर्वात मोठी सेवा सोसायटी असलेल्या येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे एक हजार ५७४ सभासद आहेत. त्यातल्या ६२८ सभासदांना तीन कोटी सत्तावन लाख रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले असून, सोसायटीचा 'ब' दर्जा असल्याचे अध्यक्ष उमाकांत आचवले यांनी सांगितले. दरम्यान सोसायटीचे ज्येष्ठ संचालक रेकुळगे यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नूतन उपाध्यक्ष संभाजी रेकुळगे यांचा संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ संचालक तथा माजी उपाध्यक्ष हणमंतराव पाटील, आजमत पटेल, संचालक वैजनाथप्पा नंदागवळे, शशिकांत चिंतलवार, संतराम वाघमारे, बाबु भोजने, अशोक बेंडके, संस्थेचे गटसचिव आर.आर.कुसनुरे, लिपिक रामकिसन केंद्रे उपस्थितीत होते. या निवडीबद्दल ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच बालाजी गंदगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच श्रीराम मित्रमंडळाचे अध्यक्ष गणेश निटुरे, पत्रकार मित्रमंडळाचे भरतसिंह ठाकूर, संतोष आचवले, शिवशंकर टाक, राजकुमार मोहनाळे, मोरया गणेश मित्र मंडळ, यांच्या वतीने विविध ठिकाणी सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.



## रेल्वे कोच फॅक्टरीमध्ये स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात

### खासदार डॉ. शिवाजी काळगे यांची सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १५ सप्टेंबर-**

लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी लातूर एमआयडीसीतील लातूर रेल्वे कोच फॅक्टरीला भेट देऊन पाहणी केली. फॅक्टरी मधील सद्यस्थितीचे अवलोकन केल्यानंतर या ठिकाणी स्थानिक लोकांच्या हाताला काम मिळावे, अशी त्यांनी तेथील व्यवस्थापनाला सूचना केली आहे.

लातूर एमआयडीसी परिसरात लातूर कोच फॅक्टरी उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. ही फॅक्टरी लवकरच सुरू होईल, असे अनेक वेळा सांगितले गेले. फॅक्टरीच्या शुभारंभाचे कार्यक्रमही झाले. मात्र अद्याप येथून कोचची निर्मिती झालेली नाही. रशियन व्यवस्थापनाच्या माध्यमातून ही फॅक्टरी आता चालवली जाणार



आहे अशी चर्चा आहे या संदर्भाने शुक्रवारी लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉक्टर शिवाजी काळगे यांनी सदरील फॅक्टरीला भेट देऊन, तेथील सद्यस्थितीची पाहणी केली, फॅक्टरी उभारणीच्या वेळी स्थानिक लोकांच्या हाताला काम मिळेल असे केंद्र आणि राज्य शासनाकडून आश्वासन देण्यात आले होते, आता ही फॅक्टरी रशियन व्यवस्थापनाच्या अधिपत्याखाली चालवली जाणार अशी चर्चा आहे, या पार्श्वभूमिवर या फॅक्टरीत स्थानिक तरुणांना नोकरी व रोजगार मिळावा, येथील एमआयडीसील पूरक उद्योगांना साहित्य पुरवठ्याची संधी देण्यात यावी, अशी अपेक्षा डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी व्यवस्थापणाकडे व्यक्त केली. लातूर येथील आयटीआय व इतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये, लातूर कोच फॅक्टरीला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करणारे कोर्सेस सुरू करण्यात यावेत व प्राधान्याने स्थानिकांना हे प्रशिक्षण देण्यात यावे, अशी सूचनाही यावी डॉ. शिवाजी काळगे आणि केली आहे.

## वलांडीतील ईद-ए-मिलाद १८ सप्टेंबरला

**वलांडी, दि. १५ सप्टेंबर-**

तालुक्यातील वलांडी येथे प्रतिवर्षी ईद ए मिलादून्नबी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. कारण मूस्लिम समाजाचे प्रेशित मूहम्मद हे पेगंम्बर आहेत. सध्या हिंदु बांधवाचा गणेश उत्सव चालू आहे. त्या निमित्ताने वलांडी येथे १६ सप्टेंबर रोजी ईद ए मिलाद साजरी न करता १८ सप्टेंबर रोजी साजरी करण्यात येणार असल्याचे ईद-ए-मिलाद उत्सव समितीचे अध्यक्ष बाबुलाल पठाण यांनी सांगीतले. कारण गणेश विसर्जन हे १७ सप्टेंबर रोजी आहे त्यानिमित्ताने मूस्लिम समाज बांधवाने कोणतेही अणूसूचित प्रकार घडू नये यासाठी गणेश विसर्जन झाल्यानंतर मिरवणूक काढू असा एक हिंदू मुस्लिम एकतेचे संदेश देणारा निर्णय घेतला आहे. ईद ए मिलाद निमित्त प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही ईरादूल्ला शाह कादरी दर्गाह परीसरातून मोटर सायकल रॅली निघणार व ही रॅलीची सांगता जामा मस्जिद वलांडी येथे होणार व तेथुन लगेच विविध मान्यवरांच्या हस्ते ईद ए मिलाद मिरवणुकीची सूरुवात बुधवार सायंकाळी ५ वाजता फित कापून करण्यात येणार आहे.व मिरवणूक ही जामा मस्जिद ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक होत छ, शिवाजी महाराज चौक व ईरादूल्लाह शाह कादरी दर्गाह परीसरात आल्यानंतर मिरवणूकीची सांगता होईल. ईद ए मिलाद निमित्ताने गावांमध्ये जागोजागी मुस्लिम बांधवांच्यावतीने शरबत वाटप व शिरा वाटप करण्यात येणार आहे.

## लिंगायत समाजाच्या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधी, प्रशासनाचे दुर्लक्ष : प्रा. बिरादार

**तभा वृत्तसेवा,**
**निलगा, दि. १५ सप्टेंबर-**

निलंगा तालुक्यातील लिंगायत समाजाच्या अनेक गावाच्या प्रश्नाकडे प्रशासन व लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष झाले असल्याचा आरोप निलंगा येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत लिंगायत महासंघाचे प्रांत अध्यक्ष प्रा. सुदर्शन बिराजदार यांनी केले .

पुढे बोलताना प्रा बिरादार म्हणाले, निलंगा तालुक्यातील कोराळी गावातील सोमलिंगेश्वर मंदिराची ३६. ६ एकर जागा तलाठ्यांनी परस्पर इतरांच्या नावे करून दिली आहे. वरिष्ठाच्या आदेशाने असे केल्याचे तलाठी यांनी गावकऱ्यांना सांगितले. तलाठी यांना आदेश देणारे ते वरिष्ठ अधिकारी कोण याचा शोध ग्रामस्थ घेत आहेत. सोमलिंगेश्वर मंदिराची



जमीन जी बळकावण्यात आली आहे ती परत देवालयाच्या नावे करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी तहसीलदार उपजिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. अनेक दिवसापासून त्यांच्याकडून कसलाही प्रतिसाद आला नाही म्हणून ग्रामस्थांनी आज लिंगायत महासंघाच्या वतीने ही पत्रकार परिषद घेतली.

गाव तेथे स्मशानभूमी मिळावी अशी सरकारची भूमिका असतानाही लिंगायत समाजाला स्मशानभूमीपासून वंचित ठेवले जात आहे तसेच निलंगा शहरात महात्मा बसवेश्वरांचा अश्वारूढ पुतळा उभा करण्याचे ठरवून अनेक वर्षे झाली तरी हा पुतळा अद्याप उभा टाकला नाही हा पुतळा उभा करावा तसेच लिंगायत आरक्षण व महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाच्या विषयावर ही प्राध्यापक सुदर्शन बिराजदार यांनी अनेक मागण्या मांडल्या व या प्रश्नाकडे प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्याकडून सकारात्मक हालचाली पंधरा दिवसांत नाही झाल्यास लिंगायत महासंघाकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ही प्रा सुदर्शनराव बिरादार यांनी दिला.

या पत्रकार परिषदेस लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष करीबसवेश्वर पाटील, लिंगायत महासंघाचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत डांगे, सरचिटणीस अशोक काडादी, सरचिटणीस रामेश्वर तेली, समाजाचे मार्गदर्शक सूर्यकांत पत्रे, एन आर स्वामी गुरुजी, नागनाथअप्पा निला, परमेश्वर कटाळे, रामेश्वर चेटके, अजय पाटील, श्रीकांत अष्टुरे, चंद्रकांत दुधभाते, संजय लादे, अजय पाटील, लिंगायत महासंघाच्या महिला सरचिटणीस वैशाली व्हनाळे, लिंगायत महासंघाच्या महिला अध्यक्ष संगीता भुसनुरे, पंचायत समिती सदस्य गोकर्णाताई पाटील यावेळी उपस्थित होते.

# कलिका स्टीलने 'क्रिएट' स्पर्धेतून विद्यार्थ्यांना दिली नवकल्पनांना चालना

## पुण्याच्या डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर विमेन च्या विद्यार्थ्यांनी 'कराटे' स्पर्धा जिंकली, ज्यामध्ये महाराष्ट्रभरातून १००० विद्यार्थ्यांचा सहभाग होता

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी




महाराष्ट्र – १५ सप्टेंबर २०२४: कलिका स्टीलने 'घीशरींश' नावाची स्पर्धा आयोजित केली, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांना संयुक्त राष्ट्रांच्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार (डऊॠ) व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहन देणे हा होता. ही स्पर्धा रविवारी आयोजित केली गेली आणि यात महाराष्ट्रभरातील सिव्हिल इंजिनीअरिंग व आर्किटेक्चरचे विद्यार्थी सहभागी झाले होते. 'डळषश ळप डींशशश्र: डींी- ीरळपरलश्रश ऊर्शींशश्रेशिपीं त्रेश्रश्री' या थीमवर आधारित, या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्टीलचा वापर करून जागतिक शाश्वत विकासाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवीन उपाय सादर केले.

या स्पर्धेत २०० महाविद्यालयांमधून एकूण १००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि ४८ संघांनी त्यांच्या मॉडेल्सचे प्रदर्शन केले. कलिका स्टीलचे संचालक गोविंद गोयल यांनी सांगितले, जी कल्पना लहान स्वरूपात होती, ती आज इतक्या मोठ्या कार्यक्रमात परिवर्तित झाली आहे. घीशरींश चा प्रवास हा कलिका स्टीलच्या प्रवासासारखा आहे – लहान सुरुवातीपासून ते मोठ्या यशापर्यंत. विद्यार्थ्यांनी आमच्या स्टील ढचढ बार्सचा वापर करून आश्चर्यकारक शाश्वत मॉडेल्स तयार केली आहेत हे पाहणे खूप प्रेरणादायक आहे. येथे प्रत्येक टीम विजयी आहे कारण त्यांनी खूप मेहनत घेतली आहे.

या स्पर्धेचे परीक्षण नामांकित आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स आणि बिल्डर्सनी केले. तीन विजेत्या संघांना रोख पारितोषिक देण्यात आले. पहिल्या क्रमांकाचे बक्षीस, १ लाख रुपये, पुण्याच्या इछउ- कॉलेजच्या शगुन शाह, सुदिक्षा अनंथारामन, रेहान देशमुख आणि मौसुमी टाटिया यांना मिळाले. दुसरे बक्षीस, ७५,००० रुपये, कोल्हापूरच्या डझड चइक्ड कॉलेजच्या रंजना तुरे, शांभवी जोशी, शर्वत हवाल आणि आयुष मिरजकर यांना मिळाले. तिसरे बक्षीस, ५०,००० रुपये, नाशिकच्या चझतड कॉलेजच्या श्रावणी रापुट, परी बिरार, आर्या धकने आणि मनस गायकवाड यांनी जिंकले.

विद्यार्थ्यांनी न्याय, शांती, स्वच्छ पाणी, लैंगिक समानता आणि गरिबी निर्मूलन यांसारख्या विविध विषयांवर प्रकल्प सादर केले. कलिका स्टीलचे घनश्याम गोयल, अरुण अग्रवाल, अनिल गोयल, गोपाल गोयल आणि मनोज जिन्दाल यांच्यासह गोविंद गोयल, अनुज बन्सल, आदित्य जिन्दाल आणि यश गोयल उप-स्थित होते आणि त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. घीशरींश ही स्पर्धा कलिका स्टीलच्या शाश्वत विकास आणि नवकल्पना वाढवण्याच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

# आ.बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून ५३ ग्रामपंचायत इमारतीसाठी १० कोटी ९५ लक्ष रूपयांचा निधी

तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी



गाव पातळीवर ग्रामीण भागातील जनतेचे कामे सुरळीतपणे पार पडावी यासाठी परतूर मंठा जालना ग्रामीण मधील नवीन ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींना मंजुरी भेटली असून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. पुढे या पत्रकात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना, सरपंच उपसरपंच सदस्य व प्रशासकीय अधिकाऱ्यांना काम करण्यासाठी उत्तम व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी या नवीन इमारतीचा उपयोग होणार असून या माध्यमातून गाव गाड्यांचा कारभार जलद गतीने चालावा अशी अपेक्षा असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रकार नमूद केले आहे. मंठा तालुक्यातील अर्डा खारी (२०) लक्ष, कटाळा बुद्रुक(२०) लक्ष जांभरुण(२०) लक्ष ठेंगेवडगाव (२०) लक्ष पोखरी टकले (२०) लक्ष केंदळे पोखरी(२०) माळकिनी(२०) लक्ष रामतीर्थ (२०) लक्ष वाटुर तांडा(२०) हनवत खेडा(२०) अंभोरा शेळके( २०) लक्ष केहाळ वडगाव (२०) कीर्तापूर(२०) लक्ष करणावळ (२०) लक्ष गुळखंड (२०) लक्ष टोकवाडी (२०) लक्ष टाकळखोपा(२०) लक्ष तळतोंडी (२०) लक्ष दहा (२०) लक्ष पाडळी दुधा (२०) लक्ष गडदे पांगरा (२०) लावणी(२०) लक्ष लिंबे वडगाव (२०) लक्ष वीरगव्हाण(२०)लक्ष वाघोडा तांडा (२०) सोनूनकरवाडी (२०) लक्ष दहिफळ खंदारे (२५) लक्ष पांगरी बुद्रुक(२५) लक्ष माळेगाव (२५) लक्ष शिवनगिरी(२५) हेलस (२५) लक्ष तर परतूर तालुक्यातील बामणी (२०) हनुवडी(२०) लक्ष श्रीधर जवळा (२०) अंगलगाव (२०) आसनगाव (२०) लक्ष सावरगाव बुद्रुक (२०) माव पाटोदा (२०) लक्ष चांगतपुरी (२०) लक्ष फुलवाडी (२०) लक्ष मापेगाव बुद्रुक (२०) लक्ष डोलारा (२०) लक्ष परतवाडी (२०) तर जालना ग्रामीण तालुक्यातील नेर शेवली भागातील शंभू सावरगाव (२०)लक्ष सोनदेव (२०) लक्ष ढगी (२०)लक्ष पळसखेडा (२०) लक्ष काकडा (२०) लक्ष डांबरी (२०) लक्ष रुपयांचा निधी मंजूर झालेला असून लवकरच नवीन ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे.

## संक्षिप्त

# तपा शिवाय मुक्ती नाही हे – श्रम्रण मुनिश्री विशेषसागर



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड १५ सप्टेंबर उत्तम तपाचा दिवस आहे. तपाचा अर्थ असा आहे, ज्यामधुन आत्माला तपवले जाते त्याचे नाव आहे तप. तपा शिवाय कर्माचे खंण्डण, निर्जरा आणि मोक्ष संभव नाही. तपाचा अर्थ आहे जो सम्यकदर्शन, सम्यकज्ञान आणि सम्यकचारित्र सोबत कर्माचे क्षय करण्यासाठी तप करतो तेच खरे सम्यक तप आहे. ख्याती, पुजा व सन्मानासाठी जो तप करतो, ते तप नाही कुतप आहे. उक्त उद् गार पं.पू. गणाचार्य १०८ श्री विरागसागरजी महाराज के सुशिष्य पं.पू. श्रम्रण मुनिश्री १०८ विशेषसागरजी महाराजीनी श्री १००८ शांतिनाथ भगवान जैन मंदिर अंबड येथेपर्युषण पर्वातील दशलक्षण धर्मातील उत्तम तप धर्म बद्दल प्रवचनामध्ये बोलताना सांगितले आपल्या प्रवचनात सांगितले. आज उत्तम तपाचा दिवस आहे. तपाचा अर्थ असा आहे, ज्यामधुन आत्माला तपवले जाते त्याचे नाव आहे तप. तपा शिवाय कर्माचे खंण्डण, निर्जरा आणि मोक्ष संभव नाही. तपाचा अर्थ आहे जो सम्यकदर्शन, सम्यकज्ञान आणि सम्यकचारित्र सोबत कर्माचे क्षय करण्यासाठी तप करतो तेच खरे सम्यक तप आहे. ख्याती, पुजा व सन्मानासाठी जो तप करतो, ते तप नाही कुतप आहे. उक्त उद् गार पं.पू. गणाचार्य १०८ श्री विरागसागरजी महाराज के सुशिष्य पं.पू. श्रम्रण मुनिश्री १०८ विशेषसागरजी महाराजीनी श्री १००८ शांतिनाथ जैन मंदिर अंबड येथे आपल्या प्रवचनात सांगितले. पं.पू. श्रम्रण मुनिश्री नी पुढे सांगीतले की, चार ज्ञान धारण तीर्थकर का असो ना त्यांना सुध्दा तपश्चर्या केल्या शिवाय सिध्दी प्राप्त होऊ शकत नाही. दिगंबर दिक्षा घेऊन त्यांना देखिल तप करावेच लागते. तेव्हाच मुक्तीची प्राप्ती होते. आकांशाचा निषेध करणे हेच सर्वात मोठे तप आहे. शुध्द आत्माची चर्चा केल्यावर शुध्दत्माची प्राप्ती होत नाही. तप करावेच लागते. इच्छाचा विरोध करणे हेच सगळ्यात मोठे तप आहे. इच्छा वाढत जाणे आणि आपण तपस्या करत जाणे म्हणजे ते फुटलेल्या मडक्या प्रमाणे होते. ही भारताची भुमि कणा कणामध्ये तपस्वीच्या पाऊलांनी पावन झालेली आहे. तपाची प्रशंसा फक्त मनुष्य किंवा विद् वाना कडुन देखिल होते. देव सुध्दा तपस्वीयांची स्तुती करतात. तप फक्त मनुष्य गतिमध्येच संभव आहे. गृहस्थ सुध्दा घरात राहुन यथाशक्ती तप करु शकतात. आचार्य भगवान म्हणतात, जो पर्यंत शरिर स्वास्थ आहे. इंद्रिय सम्पदा आहे. तप करण्याची क्षमता आहे. तो पर्यंत तप केले पाहिजे. कारण वृध्दावस्था मध्ये जेव्हा शरिर साथ देत नाही. इंद्रिय काम करणे कमी

# वडगाव पवार तांडा येथील युवकांचा राष्ट्रवादीत प्रवेश



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना तालुक्यातील मौजे वडगांव ग्रा. पं. सदस्य राजू गुलाब राठोड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रवादीत प्रवेश केला. यावेळी पवार तांडयामधील अनेक युवक कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला. याप्रसंगी विष्णू पवार, गणेश पवार, संजय राठोड, रवी पवार, बबन पवार, गजानन पवार, संदीप राठोड यांनी प्रवेश केला. यावेळी जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, जेष्ठ कार्यकर्ते विष्णूदादा भुतेकर, रायुकाँचे तालुका कार्याध्यक्ष समाधान राठोड,माजी सरपंच भानुदास राठोड, गोरख राठोड,संदीप राठोड, भोरू पवार, बिसन पवार, उत्तम राठोड यांच्या सह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पत्रकार बालाजी कुलकर्णी यांना मातृशोक

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी



उमरखेडा (ता.मंठा) येथील सौ रेखाताई रंगनाथराव कुलकर्णी यांचे रविवार ता. १५ रोजी सकाळी सहा वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. त्यांच्यावर उमरखेडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व प्रमुख पक्षाचे राजकीय पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, आप्तेष्ट – नातेवाईक व ग्रामस्थांची उपस्थिती होती. मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव रंगनाथराव कुलकर्णी यांच्या पत्नी तर पत्रकार बालाजी कुलकर्णी यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.



जालना : सुप्रसिद्ध सिनेअभिनेते नानाजी पाटेकर यांच्या सिहगड पुणे येथील घरच्या गणपतीचे शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी मनोभावे दर्शन घेतले व नानाजींचा सत्कार केला याप्रसंगी त्याच्या समवेत शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले ,अमोल कारंजेकर, रामेश्वर दराडे ,पांडुशेठ खैरे यांची उपस्थीती होती

# कोदोली येथील भाजप पदाधिकाऱ्यांचा काँग्रेस मध्ये प्रवेश

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी



भोकरदन तालुक्यातील कोदोली येथील कार्यकर्त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेस पक्षाच्या ध्येय धोरणांवर व काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा मा. नगराध्यक्ष श्री. राजाभाऊ देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आज भोकरदन तालुक्यातील कोदोली गावातील ग्रामस्थांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

यावेळी ज्ञानेश्वर पाटील गिरणारे, सुरेश गिरणारे, परमेश्वर गिरणारे, गजानन शिंदे, दिलीप मगरे, सुनील गिरणारे, समाधान मगरे, दत्तू ल गिरणारे, भागवत गिरणारे, प्रभाकर गिरणारे, संजय गिरणारे, दादाराव गिरणारे, प्रवीण गिरणारे, भरत मगरे, राजू मगरे, अरुण गिरणारे, सखाराम गिरणारे, अशोक गिरणारे, शेषराव गिरणारे, विश्वास गिरणारे, नारायण गिरणारे, माणिकराव गिरणारे, नामदेव गिरणारे, नायबराव गिरणारे, आनंदा वाघ व शेषराव पाटील गिरणारे यांनी काँग्रेस पक्षाचा झेंडा हाती घेतला. प्रवेश प्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, युवक जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख, मा नगरसेवक रमेश जाधव यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# विश्वेश्वरअय्या यांच्याप्रमाणे महान कार्य करून नावलौकीक वाढवावा –अभय कुलकर्णी



जालना/प्रतिनिधी

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेशरैया यांची जयंती दि. १५ सप्टेंबर रोजी क्रेडाई जालनातर्फे अभियंता दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी होते. अध्यक्ष भाषणात ते म्हणाले की, सर विश्वेश्वरअय्या यांनी जे महान कार्य केले, तशाच पद्धतीने अभियंत्यांनी काम करून आपला नावलौकीक वाढवावा. अभियंता रविंद्र हुशे यांनी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेशरअय्या यांचे जीवन चरित्र व त्यानी केलेल्या कामा विषयी माहीती विषद केली. याप्रसंगी क्रेडाईचे सदस्य असलेल्या सर्व अभियंत्यासह क्रेडाईचे सचिव अविनाश भोसले, माजी अध्यक्ष संजय मुथा, सहसचिव शरद जैस्वाल, दिपक अंभोरे, अकींत आबड, नितीन सातपुते, सुशील पितांबरे, सत्कारमूर्ती रितेश मंत्री, विनोद यादव, सय्यद महेबुब, कैलास पवार, गोपाल पवार, अनुराग अग्रवाल, पकेंश खुरूद, अवेश नाथानी, शरद बारगजे, वैभव बंब, संदीप राठी, दिपक बदर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रेडाई जालनाचे उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांनी केले.

# १५ वर्षापासून प्रलंबित असलेले शेतरस्ते 'समृद्धी' ने केले दुरुस्त

## स्वखर्चातून रस्ते तयार केल्याने शेतकऱ्यांनी मानले सतीश घाटगेंचे आभार



तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

अंबड दि १४ सप्टेंबर गेल्या पंधरा वर्षापासून शेकडो शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला अंबड तालुक्यातील धाकलगाव ते नावडे वस्ती व घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा शेत रस्ता नादुरुस्त होता. वारंवार हे रस्ते दुरुस्त करण्याची मागणी शेतकरी करत होते.

परंतु त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. पाच वेळा स्थानिक आमदाराने या रस्त्यावर नारळ फोडले पण काम काही केले अन्ही. शेवटी समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी स्वखर्चातून हे दोन्ही रस्ते शुक्रवारी तयार करायला सुरुवात केली. यामुळे दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले. घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा रस्ता नादुरुस्त असल्याने येथील शाळकरी मुलांना शाळेत जाता येत नव्हते. तसेच शेतकऱ्यांना शेतात जाणे जिकरीचे बनले होते. अशीच स्थिती धाकलगाव ते नावडे वस्ती या रस्त्यामुळे दाखल गाव येथील शेतकऱ्यांची होती या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाडगे यांची भेट घेऊन हे रस्ते दुरुस्त करून देण्याची मागणी दोन दिवसापूर्वी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेऊन सतीश घाटगे यांनी या दोन्ही रस्त्याचे काम स्वखर्चातून सुरू केले अगोदर काम सुरू करून नंतर या रस्त्याचे उद्घाटन त्यांनी केले. यावेळी दोन्ही गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उप-स्थित होते. अनेक वर्षापासूनची मागणी दोन दिवसात पूर्ण केल्यामुळे सर्व शेतकरी आनंदी झाले. त्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.

# नागापूर व वैजोडा पाडळी वस्ती येथील ग्रामस्थांच्या वतीने भाजपा प्रदेश सचिव पदी निवड झाल्याबद्दल राहुल लोणीकर यांचा सत्कार

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी



देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या माध्यमातून भारत देश हा विकसित देशांच्या यादीत जाऊन बसला असून, राज्यातील शिंदे फडणवीस अजित पवार यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने युवक युवतींसाठी मोठ्या प्रमाणावर योजना कार्यान्वित केल्या असून या माध्यमातून युवक युवतींना रोजगार उपलब्ध होत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

ते नागपूर व वैजोडा पाडळी वस्ती येथे संपन्न झालेल्या सत्कार कार्यक्रमाला उत्तर देताना बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले पुढे बोलताना ते म्हणाले की परतुर विधानसभा मतदारसंघासाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी गेल्या पंचवीस तीस वर्षापासून सातत्याने संघर्ष करत मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणत मतदार संघाचा कायापालट केला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की देशासह राज्यातील व मतदार संघातील युवक वर्ग हा खऱ्या अर्थाने भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी असून भाजपामध्ये रोज येणारे युवकांचे लोंढे हे येणाऱ्या विधानसभेत विजयाची नांदी ठरणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले, यावेळी गावकऱ्यांच्या वतीने प्रदेश सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल राहुल लोणीकर यांचा सत्कार केला यावेळी शत्रुघ्न कणसे, पद्माकर कवडे भगवान पाटोळे विष्णू डोने, राहुल काळे काकासाहेब शिंदे रामा चव्हाण अरुण वाघमारे, संदीप तनपुरे सुनील गुजर विठ्ठल महाराज जाधव सुनील महाराज बोराडे दत्ता रोकडे उद्धव मांडगे, माऊली शिंदे एकनाथ खामकर गजानन वैद्य कृष्णा रोकडे गोविंद यादव, तुकाराम चव्हाण, आकाश रोकडे, दत्ता जाधव दौलत जाधव विष्णू टोणपे, संतोष बोराडे नारायण दत्ता मांडगे विठ्ठल रायकर, अनंत तुमचे अनंत टोणपे, अर्जुन मांडगे एकनाथ रोकडे कांता गायकवाड, विठ्ठल मस्के बाळू मस्के पिंटू बोराडे पप्पू मस्के राजेश काकडे हनुमान बोबडे रामचंद्र टोणपे अनिल गुजर विठ्ठल पवार राजू वाघ कैलास जगताप यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

# सोन्याच्या दिवसांवरून खा.काळे, आ.गोरंट्याल यांची टोलेबाजी!

## अनोखा : साई दरबार,नाग–नागीन नृत्य, गंगेचा जीवंत देखावा

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी



श्री अनोखा गणेश मंडळाने यंदा चांदीच्या मूर्तीला सोन्याचा मुलावा दिल्यानंतर जिल्ह्याला सोनियाचे दिवस आले आहेत. सर्व गणेश भक्तांची दुःखे, संकटे ,विघ्न दूर व्हावीत आणि प्रत्येकाच्या आयुष्यात सोन्याचे दिवस यावेत अशी प्रार्थना खा. डॉ. कल्याण काळे यांनी विघ्नहर्ता गणरायाच्या चरणी केली. तर सोन्याचे दिवस कोणाचे येतील हा येणारा काळ ठरवेल. असे सूचक विधान करत आ. कैलास गोरंट्याल यांनी आपल्या स्टाईल मध्ये चांगलाच षटकार मारला.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारका जवळील श्री अनोखा गणेश मंडळातर्फे आयोजित गणेशोत्सवात शनिवारी ( ता. १४) खा. डॉ. कल्याण काळे ,आ. कैलास गोरंट्याल,माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंट्याल, शिवसेना उबाठाचे नेते डॉ. संजय लाखे पाटील यांच्या हस्ते श्रींची महाआरती करण्यात आली. यावेळी गौतमसिंह मुणोत,राम सावंत,राजेंद्र राख,शरद देशमुख,सुनील गोयल, श्रावण भुरेवाल,जीवन सले, हरेश देवावाले,संजय भगत, रमेश गोरक्षक, दुर्गेश काठोठीवाले, राजेंद्र जाधव, मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल, योगेश मानधना, संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम),धीरेंद्र मेहरा, आशीष जेथलिया,धर्मेंद्र भानुशाली,अनिल लदनिया,राजेश ( पापा) लुणिया,राहुल अग्रवाल,किशोर अग्रवाल, हर्षद चोरडिया, राजेश अग्रवाल ( रूपम),पुरूषोत्तम भक्कड, गौरीशंकर देविदान,जगदीश मुंदडा, राजकुमार दायमा ( सरकार),महेश सारस्वत, गणेश तिवारी, रोहित भुरेवाल,रवी अग्रवाल,आलोक गोरंट्याल,गणेश भुरेवाल, मनोज बंब, सज्जन सकलेचा, सचिन लोढा,महावीर मरलेचा,दीपक पंच, आदींची उपस्थिती होती. मंडळाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.तसेच भाविकांना साबुदाणा खिचडी चे वाटप करण्यात आले. हरियाणा येथील सुनील – अनिल तिलकधारी आर्ट्स ग्रुपच्या कलापथकाने भगवान शंकराचे अर्धनारेश्वर रूप, साईबाबांचा दरबार, पाण्यात पेटवलेला दिवा, गंगेचा उगम ,तिच्या भावना, नाग- नागीन नृत्य, जिवंतपणे साकारत भाविकांना वेगळा अनुभव दिला. डम , ,डम,,डमरू बाजे ...., गौराजी के सन्मुख शंकर झुमे, नाचे...,शिर्डीवाले साईबाबा...बंदा गरीब है..., मानो तो मै गंगा हू..., ओम नमः शिवाय,,,तीन शब्द मे सृष्टी का सार समाया ......, या गीतांवर एकापेक्षा एक बहारदार नृत्यांचे सादरीकरण केले. तसेच नाग- नागिन च्या वेशात कलावंतांनी मेरे ढोलना....सून....,छेड मिलन के गीत....! या गीतांवर कसदार अभिनयाने सादरीकरण करून उपस्थितांना मोहित केले. सप्तसुरांच्या तालावर नाग -नागिन यांच्या चित्तथरारक जुगलबंदीला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# चोरीची खोटी तक्रार देणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**

रोख रक्कम लुटून नेल्याची खोटी तक्रार करणाऱ्या एकाविरुध्द अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील मालेगाव रोड अयोध्यानगरी येथील विनायक पुंडलिक कदम यांनी वडिलाने दिलेले दोन लाख ६५ हजार रुपये साखर कारखान्याच्या चेअरमनकडे घेवून जात असताना पिंपळगाव ते येहळेगाव रोडवर अज्ञात तीन जणांनी जबरदस्तीने चोरुन नेल्याची तक्रार अर्धापूर पोलीस ठाण्यात केली होती. दरम्यान त्यांच्या या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांना संशय आल्याने त्यांनी पोलीस उपनिरीक्षक भोसले व पोहेकॉ.आडे यांना या तक्रारीची खात्री करण्याची सूचना केल्यानंतर पोलिसांनी या तक्रारीची शहानिशा केली असता हि तक्रार खोटी असल्याचे आढळून आले. वडिलाने दिलेले दोन लाख ६५ हजार रुपये कारखान्याच्या चेअरमनकडे न देता स्वतःवर झालेले कर्ज फेडण्यासाठी नविन मोंढा येथील जयस्वाल यांना दिले असल्याचे विनायक कदम यांनी पोलिसांना सांगितले. तक्रार खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर खोटी तक्रार देणाऱ्या विनायक पुंडलिक कदम याच्या विरोधात अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ. विक्रम देशमुख यांच्या नेतृवाखाली संतोष वाघमारे यांचासह असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी अजीत पवार गटामध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. १५ सप्टेंबर -**

उमरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजीत दादा गटाच्या पक्ष कार्यालयात पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी व सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब सोनकांबळे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी चे तालुका अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली वचींत बहुजन आघाडीचे नेते संतोष वाघमारे यांनी व यांच्या सोबत असंख्य कार्यकर्त्यानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला आहे

उमरी तालुक्यातील निमटेक भायेगाव हातनी बेलदारा येथील कार्यकरत्याचा समावेश आहे पक्ष प्रवेशा नंतर या प्रसंगी संतोष वाघमारे यांना तालुका कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे , रमेश हैबते यांना सामाजिक न्याय विभाग जिल्हा उपाध्क्ष पदी, व साहेबराव गायकवाड निमटेक यांना सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष पदी ,बालाजी माधवराव आनेराये यांना राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी तालुका उपाध्यक्ष पदी नियुक्तीचे पत्र डॉ विक्रम देशमुख यांच्या हस्ते देण्यात आले

या कार्यक्रमास अंकुश हणमंते ता अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग नायगाव तालुका अध्यक्ष, कार्याध्यक्ष यादव गाजभारे यांची उपस्थिती होती येणाऱ्या आगामी निवडणूक काळात लोकसभा असो कि विधानसभा भक्कम पणे उमरी तालुक्यात राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी



मित्र पक्षा सोबत राहुन लोकसभा उमेदवार विधानसभा आमदार राजेश पवार यांच्या सोबत राहून प्रचंड मतानी निवडुन आणु असा विश्वास डॉ विक्रम देशमुख आपल्या मार्गदर्शन करतानां सर्वाना शब्द दिला आहे ,या कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी बाबद शेतकऱ्यांना तत्काळ विमा अतिवृष्टी अनुदान घर पडीचे पंचनामे करून तालुक्यातील वीज वितरण व्यवस्था तत्काळ पूर्ववत करण्याच्या मागणीचे निवेदन तहसीलदार उमरी मार्फत शासनास देण्यात आले या वेळी रा कॉ पार्टी जिल्हा उपाध्यक्ष अमृत पवार ज्ञानेश्वर पाटिल कदम शेलगावकर राष्ट्रवादी ता कार्यध्यक्ष, बालाजी पाटिल पवार यु जिल्हा उपाध्यक्ष, रावसाहेब पाटिल वडजे ता उपाध्यक्ष, अविनास पाटिल,संतोष गुंटे, व्यंटैश पाटिल ढगे, बेलदारा सरपंच पिराजी गायकवाड, माजी सरपंच गंगाधर शिगले, लक्ष्मन जांगेवड, मारोती आरटवाड, रा कॉ शहर अध्यक्ष महेश पडोळे देविदास दशरथवाड,पदाधीकारी उपस्थित होते

## संक्षिप्त वृत्त

### कसूरदार शिक्षकांवर कार्यवाही करा; पालकांनी दिला आत्मदहनाचा इशारा

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील सरेगांव येथील रहिवाशी चक्रधर कळणे पाटील यांनी मुख्याध्यापक व कसूरदार शिक्षक यांची रीतसर चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून आजपर्यंत संबधित कार्यालयास १०२ निवेदन दिले आहेत व दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हा परिषद कार्यालया समोर अमरण उपोषण आणि दि. १८ जुन २०२४ रोजी पंचायत समिती कार्यालय मुदखेड येथे अमरण उपोषणाला बसले होते. एवढे करूनही त्या शिक्षकांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्याने निवेदनकर्ते चक्रधर



शामराव कळणे पाटील यांनी दि. ०५ सप्टेंबर रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय नांदेड येथे निवेदन दिले आहे.त्यांची या निवेदनाद्वारे अशी मागणी आहे की कर्तव्यात कसुरदार मुख्याध्यापकांवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर व त्यांच्या सोबत संगनमतानी काम करणाऱ्या सहशिक्षकांवर तात्काळ गुन्हे दाखल करून एका पाल्याच्या पालकाला न्याय मिळवुन द्यावा. न्याय नाही मिळाला तर आपल्या कार्यालया समोर दि. १७ सप्टेंबर रोजी आत्मदहन करणार असल्याचे चक्रधर कळणे पाटील यांनी निवेदनात नमुद केले आहे.

### श्रुती किन्हाळकरचे वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत घवघवीत यश



**नायगाव -** किनाळा येथील रहिवासी कु. श्रुती माधवराव किन्हाळकर विद्यार्थ्यांनी ने आपल्या परिश्रम जिद्द व अभ्यासाच्या बळा वर ई.सन. २४-२५ या वर्षामध्ये घेण्यात आलेल्या निट परिक्षेत ६७१ मार्कघेऊन घवघवीत यश प्राप्त करून क्षेत्रात प्रवेश प्राप्त केले. तालुक्यातील किनाळा येथील कु. श्रुती माधवराव किन्हाळकर ह्या विद्यार्थ्यांनी ने प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत. परंतु घरात शैक्षणिक वारसा लाभला असुन आपल्या अथक परिश्रम,जिद्द चिकाटी व अभ्यासाच्या बळावर एस.एस.सी. बोर्डाच्या परिक्षेत तिने ९९ टक्के टक्के घेऊन तालुक्या मधून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला तर एच.एस.सी.च्या लातूर बोर्डाच्या परीक्षेत विज्ञान शाखेतून ९५ टक्के घेवून केंद्रातून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे. तर ई.सन. २४-२५ या वर्षांमध्ये घेण्यात आलेल्या निट परिक्षेत अथक परिश्रम जिद्द अभ्यासाच्या बळावर दुसऱ्या प्रयत्ना मध्ये ६७१ मार्क घेऊन घवघवीत यश संपादित करीत वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत नॅशनल मेडिकल कॉलेज नायर (टोपीवाला) मुंबई येथील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश प्राप्त केला आहे. तिच्या या बद्दल तालुक्यातील पोष्ट बेसिक ज्यू कॉलेज चे प्राचार्य विजय कुमार देशमुख ,सहशिक्षक आनंदराव सुर्यवंशी सह, प्राध्यापक काशिनाथ बन, सौ भारती बन, विश्वनाथ स्वामी, पांडुरंग येवले, सरपंच प्रतिनिधी तथा प्रा. यादवराव कोरनुळे, माधवराव वाघमारे, उच्य माध्यमिक ज्यूनियर कॉलेजचे प्राध्यापक गणेश मारताळे कर, शंकर राठोड, शिवशंकर कोरे, दिलीप माने, प्रदिप लापशेटवार सह आदि प्राध्यापक वृदांच्या वतीने श्रुती किन्हाळकराचा व आई वडीलचा पुष्पहार घालून यथोचित सन्मान करुन पुढील वैद्यकीय क्षेत्रातील वाट चालीस शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील पोष्ट बेसीक ज्यू व उच्च माध्यमिक ज्यू कॉलेजचे प्राचार्य सह सर्व प्राध्यापकांच्या वतीने श्रुती किन्हाळकरांचा यथोचित सन्मान करुन पुढील वैद्यकीय क्षेत्रातील वाट चालीस शुभेच्छा दिल्या

### अविनाश वाघमारे यांची जिल्हा प्रसिध्दीप्रमूखपदी निवड

**भोकर** -येथील सामाजीक कार्यकर्ते अविनाश वाघमारे यांची भारतीय जनता पार्टी नांदेड उत्तर अनुसुचित जाती मोर्चा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदि निवड करण्यात आली. भोकर येथील सामाजीक कार्यकर्ते अविनाश वाघमारे यांनी मागील अनेक वर्षापासून सामाजीक धार्मिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी आजपर्यंत केलेल्या सामाजीक कार्याची दखल घेवून त्यांची भाजपा नांदेड उत्तर अनूसूचित जाती मोर्चा जिल्हा प्रसिध्दीप्रमूख पदी नियूक्ती करण्यात आली जिल्हाध्यक्ष विलास साबळे यांनी तसे नियूक्ती पत्र दिले. वाघमारे यांच्या निवडीबद्यल मित्र परिवाराकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



### ईद-ए-मिलाद सणानिमित्त सुटी कायम

**नांदेड-** मुस्लिम बांधवांना ईद-ए-मिलाद हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी नांदेड जिल्ह्यासाठी सोमवार १६ सप्टेंबर २०२४ रोजीची सार्वजनिक सुटी जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी कायम ठेवली आहे. यासंदर्भात जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी अधिसूचना जारी केली असून सोमवार १६ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद या सणाची सुटी असेल असे सर्वांना सूचित केले आहे.

### प्रकाश वीर लोहगांवकर यांचे निधन



**नांदेड**-शहरातील पोर्णिमा नगर येथील रहीवाशी प्रकाश गोपाळराव वीर लोहगावकर यांचे दि. १४ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व मुलगा, तीन भाऊ असा परिवार आहे. विजय लोहगावकर,राजेश लोहगावकर व सामाजिक कार्यकर्ते पवन वीर लोहगावकर यांचे ते बंधू होत.

# मुदखेड तालुक्यातील ४० गावच्या दिड हजार जेष्ठ नागरीकांचे अर्ज समाज कल्यान विभागाकडे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. १५ सप्टेंबर -**

मुख्यमंत्री वयोश्री योजनाचा लाभ मिळवा म्हणून तालुक्यातील चाळीसगावच्या १५०० लाभधारकांनी केले समाज कल्याण कडे अर्ज

मुदखेड तालुक्यातील चाळीस गावच्या १५०० जेष्ठ नागरिकांनी महाराष्ट्र शासनाची नव्याने सुरू झालेली मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घेण्यासाठी समाज कल्याण विभागाकडे माजी नगरसेवक संजय आऊलवार यांच्या मार्गदर्शनाखाली अर्ज सादर केली आहेत.

महाराष्ट्र शासनाने लाडकी बहीण योजनेसह वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनाही चालू केली असून या अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी तालुका महामंत्री पुरुषोत्तम चांडक,माजी नगरसेवक तथा भाजपाचे शहर समन्वयक संजय आऊलवार, शहराध्यक्ष संजय सोनटके, शहर महामंत्री, प्रभाकर पांचाळ, माजी नगरसेवक गंगाधर डांगे, सुशिल मुंगल , व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुदखेड तालुक्यातील चाळीस गावांमध्ये जाऊन जेष्ठ नागरिकांची भेट घेत त्यांच्याकडून सर्व कागदपत्रांची पूर्तता करून घेत अर्ज पूर्ण करून घेतले व नांदेड येथील समाज कल्याण विभागाकडे ही सर्व अर्ज सादर केली आहेत. त्यामुळे संजय आऊलवार यांचे मुदखेड तालुक्यातून मोठे कौतुक होत आहे. यामध्ये मुदखेड तालुक्यातील चिकाळा तांडा पांढरगाव कांमळज निवघा बोरगाव सीता सरेगाव वरदडा तांडा कोल्हा माळकौठा मुगट वाडी नियम तुलापुर हजापूर पिंपळकोठा मगरे न्याहाळी खुजडा डोणगाव मुदखेड पिंपळकोठा चोर वासरी दरेगाव वाडी हजापूर राजवाडी वैजापूर पार्डी मेंडका रोही पिंपळगाव पिंपळगाव तांडा टाकळी होंडा डोरली तांडा शेंबोली ईजळी या गावांसह उमरी तालुक्यातील शेलगाव शिंदी या सह ४० गावातून ज्येष्ठ नागरिकांची अर्ज भरून घेण्यात आली आहे व ही सर्व अर्ज नांदेड समाज कल्याण विभागाकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. तसेच मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचे सुद्धा फार्म भरुन देणे चालु आहे . यात मुदखेड शहरातुन गोविंद गड्डमवार, ऋषी पारवेकर, विठ्ठल आचार्य, यांनी ही प्रभागातुन अर्ज करून समाज कल्यानकडे सुपूर्द केली.

# किनवट वासीयांच्या समृद्धीसाठी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांचे गणेशाला साकडे

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १५ सप्टेंबर -**

किनवट वासीयांच्या समृद्धीसाठी व सनातनी हिंदू धर्मातील तरुणांना व्यसनमुक्त करून सुआरोग्य प्राप्त कावे यासाठी येथील बालकोंडा गल्ली (भोई गल्ली ) येथील श्रीकृष्णा गणेश मंडळात माजी नगराध्यक्षांनी गणेश याग करून प्रार्थना केली .

बालकोंडा गल्ली (भोई गल्ली ) च्या न्यु श्रीकृष्णा गणेश मंडळाची मागील ३५ वर्षाची गणेश उत्सव परंपरा आहे. सनातनी हिंदू धर्मातील तरुण व्यसनाधिन होत आहेत. हे तरूण व्यसनी होऊ नये. किनवट वासीयांच्या समृद्धीसाठी , तरुण व धर्मप्रेमी यांना सुआरोग्य प्राप्त व्हावे, यासाठी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी श्री गणेशाला



गणेश याग करून प्रार्थना केली. समर्थ भक्त दिनेश कुलकर्णी छ. संभाजीनगर व सहकारी मंडळी व भाविक- भक्तांनी ही पुजा संपन्न केली.

या कार्यक्रमाला आमदार भीमराव केराम, बाबुराव केंद्रे, स्वागत आयनेनीवार, दत्ता आडे, अजय चाडावार , रवि पवार, संतोष राजुरकर , दीपक चाडावार, सुनिल मच्छेवार, मारोती भरकड, आशुतोष नाईक , आशुतोष बेंद्रे, शिवाजी आंधळे, भूमन्ना बल्लेवार, श्रीनिवास गटलेवार, विनोद कर्णेवार, राजु गटलेवार, गणेश बिटेवार, आशीष पवार , गणेश गटलेवार आतिष राजुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## प्रा. सोनसळे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**

आंबेडकरी चळवळीतील सक्षम युवा नेतृत्व प्रा. राजू सोनसळे यांनी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबई येथे रिपब्लिकन सेनेत प्रवेश केला. यावेळी प्रा. सोनसळे यांची नांदेड उत्तर जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय सचिव संजय बोधनकर, प्रदेश अध्यक्ष काकासाहेब खंबाळकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

नांदेड जिल्ह्यात गेल्या वीस वर्षापासून आंबेडकरी चळवळीत सक्षमपणे काम करणारे युवा नेतृत्व म्हणून प्रा. राजू सोनसळे यांची ओळख आहे. विद्यार्थी दशेपासून आंबेडकरी चळवळीत स्वतःला वाहून घेतलेल्या प्रा. सोनसळे यांनी अनेक आंदोलने उभारली.

# पंचशील हायस्कूलच्या मैदानावर पावसाळी क्रीडा स्पर्धाचे समारोप

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १५ सप्टेंबर -**

शहरातील पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयाच्या प्रांगणात पावसाळी खो-खो क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

या प्रसंगी विद्यालयाचे सचिव सुनील सोनुले,गटशिक्षणाधिकारी किशन फोले,पोलीस निरीक्षक राजेश पुरी,तालुका क्रीडा संयोजक प्रा.अजय चौधरी,निवृत्त क्रीडा संयोजक बळीराम काळे,शाळेचे मुख्याध्यापक , उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक,

निवृत्त उपमुख्याध्यापक तथा क्रीडा शिक्षक भारत ताडेवाड आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत मुलांचे एकूण सोळा संघ सहभागी झाले होते त्यात १४ वर्ष वयोगटातील खरटवाडी येथील संघ प्रथम आला असून १७ वर्ष वयोगटात शहरातील पंचशील हायस्कूलचा संघ प्रथम आला तर १९ वर्ष वयोगटात शहरातील विवेकानंद हायस्कूलचा संघ प्रथम आला आहे. मुलिंच्या खो-खो क्रीडा स्पर्धेत १४ वयोगटात खरटवाडी प्रथम तर १७ व १९ वर्ष वयोगटात कोंडबाराव पाटील विद्यालय वाळकी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या क्रीडा यशस्वी करण्यासाठी कदम,प्रा.अजय चौधरी, श्रीसागर, संतोष वाकोडे, दत्ता मिराशे, ओकार पवार, तवर,दीपक हूलकानेसह पंचशीलच्या सर्व शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन निवृत्त शिक्षक भाऊराव डोरले यांनी केले.

# फ्लॅश आऊट ऑपरेशन अंतर्गत ४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या फ्लॅश आऊट ऑपरेशन अंतर्गत जिल्हाभरात विविध ठिकाणी कारवाई सुरु असून, नुकतेच विशेष पथकाने उमरी तळेगाव रोडवर स्वस्त धान्यांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



उमरी तळेगाव मार्गावर वाहनातून धान्याचा काळाबाजार होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिसांच्या विशेष पथकाने आयचर ट्रक क्र.एमएच-२६-बीई-७३३७ याची तपासणी केली असता यामध्ये चार लाख रुपये किंमतीचे राशनचे गहू आढळून आले तर ट्रक क्र.एमएच-२६-बीई-७८३५ यामध्ये एक लाख रुपये किंमतीचे तांदुळ आढळून आले. पोलिसांनी धान्य व वाहन असा एकूण ४५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हा मुद्देमाल जप्त करुन पुरवठा विभागास कळविण्यात आले आहे. हि कारवाई विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक बी.एम.हालशे, पोका. पी.एम.जुन्ने, एम.बी. कांबळे, बी.डी.लामतुरे, आर.के.मुळे, महाचंद्रमुनी कांबळे, सहायक पोलीस निरीक्षक अंकुश माने, पोलीस उपनिरीक्षक सचिन आरमळ, बी.एम.जाधव, टी.व्ही.केंद्रे, आर.पी.जाधव, ए.व्ही.हैबतकर, अब्दुल रियाज, सय्यद अजमल, दत्तात्रय गुरुपवार यांनी केली.

## अण्णा भाऊ साठेंच्या पुतळ्यास दररोज अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**

समाज बांधवांच्या वतीने नवीन नांदेड सिडको येथील डॉ. अण्णा भाऊ साठे ह्यांच्या पुतळ्यास दररोज अभिवादन करण्याचा उपक्रम अखंडितपणे सुरु असून १५ सप्टेंबर रोजी या अभिवादन उपक्रमास सहा महिने पूर्ण झाले आहेत. याचे औचित्य साधून नवीन नांदेड सिडको येथील इंदिरा गांधी हायस्कूलचे सहशिक्षक सखारामजी गजले, अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे जिल्हाध्यक्ष नामदेव काळे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी डी.के. डोंपले, अण्णा भाऊ साठे समाज भूषण पुरस्कारप्राप्त आर. जे. वाघमारे आणि प्रा. यशवंत गादेकर यांनी उपस्थित राहून अभिवादन कर्ते बबन बुचडे यांच्या समवेत विशेष रूपाने अभिवादन केले.

# आ. श्यामसुंदर शिंदे यांचे पानशेवडी ग्रामपंचायतवर वर्चस्व कायम

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि. १५ सप्टेंबर -**

कंधार तालुक्यातील मौजे पानशेवडी येथील पूर्वीचे सरपंच सौ. गेनुबाई चव्हाण यांनी राजीनामा दिल्यामुळे सरपंच पद रिक्त झाले होते. त्यामुळे कंधारचे तहसीलदार गोरे यांनी आदेश पारीत करत सरपंच निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला, दि.१२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मंडळाधिकारी शेख एम. एन.व ग्रामसेवक बालाजी भायेगावे यांच्या प्रमुख उपस्थित ग्रामपंचायत कार्यालय पानशेवडी येथे विशेष बैठक घेण्यात आली, सरपंच पदासाठी श्रीमती उज्वलाबाई मोरे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध सरपंच म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी गेनुबाई चव्हाण, कचरूबाई मोरे, ॲड शिवाजी मोरे, चंद्रकांत मोरे, उषा बसवंते, नागीनबाई भालेराव, सुमित्रा नरवडे, हे सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. श्रीमती उज्वला मोरे ह्या आमदार श्यामसुंदर शिंदे व सामाजिक कार्यकर्त्या

सौ. आशाताई शिंदे यांचे कट्टर समर्थक कोंडीबा मोरे यांच्या त्या मातोश्री आहेत.यावेळी बोलताना नवनिर्वाचित सरपंच श्रीमती उज्वलाबाई मोरे म्हणाल्या की आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून पानशेवडी गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कट्टीबंध असल्याचे सांगितले, यावेळी

मोरे यांच्या निवडीचे आमदार श्यामसुंदर शिंदे, सौ.आशाताई शिंदे,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे, आंबड चे तहसीलदार विजय चव्हाण,माजी सभापती ज्ञानेश्वर पा.चोंडे, भगवान पाटील मोरे, जळबा पाटील मोरे आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# हे गणराया, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येऊ दे!

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. १५ सप्टेंबर -**

किनवट- माहूर विधानसभेचे माजी आमदार प्रदीप नाईक यांनी भावी राजकारणातील वारस, तरुणाईच्या गळ्यातील ताईत,त्यांचे लाडके पुत्र कपिल नाईक यांचे समवेत तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह माहूर शहरासह तालुक्यातील वाई बाजार,

वानोळा आदींसह ग्रामीण भागात स्थापना झालेल्या सार्वजनिक गणेश मंडळांना सहृदयवंदन भेट देत श्रीच्या मुर्तीचे दर्शन घेण्याचा कार्यक्रम सुरू केला असून, दि.१३ रोजी त्यांनी शहरासह ग्रामीण भागातील गणरायाची स्थापना झालेल्या विविध गणेश मंडळांनाभेटी देऊन श्रीचा आशिर्वाद घेतला. यावेळी त्यांनी,हे गणराया !सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना सुखी व समाधानी ठेव ! अशी प्रार्थना करत आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार येऊ दे! असे श्री चरणी साकडे घातले.

## माजी आ. प्रदीप नाईक यांचे गणेशाला साकडे

ग्रामीण भागातील नागरिकांतून माजी आमदार प्रदीप नाईक यांचे पुत्र कपिल नाईक यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक



होत आहे. माहूर शहरात श्री गणेश भक्तांकडून एकूण १४ ठिकाणी सार्वजनिक मंडळाच्या श्री गणेश मुर्ती शची स्थापना करण्यात आली असून, तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी एक गाव एक गणपती या अभिनंदनीय उपक्रमांतर्गत ५४ ठिकाणी श्री गणेश स्थापना करण्यात आलेली आहे.

या सर्व ठिकाणी माजी आमदार प्रदीप नाईक यांचे सह त्यांचे पुत्र कपिल नाईक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष मेघराज जाधव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव,नगराध्यक्ष फिरोज दोसानी, दत्तराव मोहिते, बंडू नाईक,मनोज कीर्तने,विनोद राठोड, बिट्टू जोगदंड यांचेसह नगरसेवक व कार्यकर्ते भेटी देत असून, दिनांक १३ रोजी माहूर शहरातील सर्व गणेश मंडळांना भेटी देण्यात आल्या. यावेळी ब्राह्मण गल्ली येथील नवयुवक गणेश मंडळ येथे भेट दिली असता माजी नाईक यांचा गणेश मंडळाचे सदस्य तथा वृत्तपत्र विक्रेता कृष्णा बेलखोडे,विपुल कान्नव,मंगेश कान्नव,देशपांडे बंधू यांचेसह सर्व मंडळाच्या पदाधिकारी यांच्या वतीने आ. नाईक यांचा सत्कार करण्या आला. माहूर शहरातील सर्व गणेश मंडळांना माजी आमदार प्रदीप नाईक यांनी भेटी दिल्याने नागरिकांतून त्यांचे अभिनंदन होत होते.